
त्याचे राज्य ताब्यात घेतले गेले. परंतु तो ते परत घेत आहे.

# गौरवाचा राजा

बायबलच्या कथा व संदेश चा 70 दृश्यांमध्ये आशय दिला आहे


पी. डी. ब्रॅमसन
- द्वारे
एक परमेश्वर एक संदेशचे लेखक

आर्मिंडा सॅन मार्टिन
- द्वारे स्पष्टीकरण

त्याचे राज्य ताब्यात घेतले गेले
परंतु तो ते परत घेत आहे.

# गौरवाचा राजा



**पवित्र शास्त्रा**
मधून

**पी. डी. ब्रॅमसन**
- द्वारे कथन केले

**आर्मिंडा सॅन मार्टिन**
- द्वारे स्पष्टीकरण

Relief Opportunity & Care for Kids
ROCK INTERNATIONAL
Resources Of Crucial Knowledge

**Marathi  Edition of KING of GLORY**

KING of GLORY
By P. D. Bramsen
Illustrated by Arminda San Martín
Translator: Samson Lankeshwar

Copyright © 2011, 2020 ROCK International. All rights reserved.

**ROCK International**

• **R**elief, **O**pportunity & **C**are for **K**ids
• **R**esources **O**f **C**rucial **K**nowledge
P.O. Box 4766, Greenville, SC 29608, USA
resources@rockintl.org
www.rockintl.org
**www.king-of-glory.com**

**King of Glory - Marathi**
By P. D. Bramsen
Illustrated by Arminda San Martín
Copyright © 2022 ROCK International. All rights reserved.

ISBN 978-81-7820-493-2

Unless otherwise marked, Scripture quotations used in this book are taken from BSI Bible
All rights reserved.

**गौरवाचा राजा**
पी. डी. ब्रॅमसन द्वारे
आर्मिंडा सॅन मार्टिन द्वारे स्पष्टीकरण
हक्क राखीव © 2022, **रॉक आंतरराष्ट्रीय**.
सर्व हक्क राखीव.

बुक रॉयल्टी रॉक इंटरनॅशनल कार्यात पुन्हा गुंतवली आहे. गौरवाचा राजा किंवा इतर रॉक प्रकाशनांचे भाषांतर करणे आणि प्रसारण करण्यासाठी, संपर्कः resources@ rockintl.org

**लेखका बद्दलः** पॉल डॅन ब्रॅमसन यांचा जन्म कॅलिफोर्निया येथे झाला. त्यांनी व त्यांच्या पत्नीने त्यांच्या तीन लेकरांना सेनेगल, पश्चिम आफ्रिका - बहुसंख्य मुस्लिम देश - सहाराच्या काठावर वाढविले. ब्रॅमसन आंतरराष्ट्रीय श्रोत्यांसाठी बहुविध-माध्यमे, बहुविध-भाषा स्त्रोत निर्माण करून लिहितात जे कथा सांगतात आणि बायबलसंबंधी भविष्यवक्त्यांचे संदेश कालक्रमाने स्पष्ट करतात. www. rockintl.org/resources.

**कलाकारा बद्दलः** अर्जेन्टिनाचे आर्मिंडा सान मार्टिन लिहितातः ‘‘जितके मी आठवण करू शकतो, मी रेखाचित्र काढत आहे. देवाने दिलेले माझे सर्व कौशल्य मी ‘‘गौरवाचा राजा’’ ची चित्रे काढण्यांत वापरले आहे. माझ्यासाठी हा प्रकल्प एक स्वप्न खरे व्हावे असे आहे, जीवनात एकदाच मिळणारी संधी. या संधीसाठी मी प्रभुचे पुरेसे आभार मानू शकत नाही. आर्मिंडा सध्या अनेक प्रकाशनांसाठी स्पष्टीकरण करणारी म्हणून कार्य करते.

Published in Association with:
GLS Publishing
250-D Udyog Bhavan,
Worli, Mumbai – 400030, India


Printed in India





# प्रत्येक राष्ट्रामध्ये राजाचे गौरव व सर्व वयोगटातील लेकरांच्या आशीर्वादसाठी





*"सुरक्षितता? सुरक्षिततेविषयी काहीही कोणी सांगितले आहे? अभ्यासक्रमात तो सुरक्षित नाही. परंतु तो चांगला आहे. मी तुम्हाला सांगतो, तो राजा आहे."*

-सिंह, चेटकीण, व कपाट कडून- सी. एस. लेवीस द्वारे











# दृश्याची निवड


**दृश्यांच्या मागे** ........................................ 8

**सुरुवात** ........................................ 11

1 • राजा आणि त्याचे राज्य

2 • राजा आणि त्याचे संदेष्टे

3 • राजा आणि त्याचे विश्व

**भाग 1 - राजा त्याच्या योजनेविषयी भाकीत करतो** ........................................ 19

| | |
|---|---|
| 4 • पहिला दिवस | उत्पत्ती 1 |
| 5 • एक परिपूर्ण जग | उत्पत्ति 1-2 |
| 6 • पहिला मनुष्य | उत्पत्ति 1-2 |
| 7 • एक परिपूर्ण घर | उत्पत्ति 2 |
| 8 • पाप आणि मृत्यूचा नियम | उत्पत्ति 2 |
| 9 • पहिली स्त्री | उत्पत्ति 2 |
| 10 • प्रकाशाचे राज्य | प्रकटीकरण 4-5 |
| 11 • अंधाराचे राज्य | यशया 14; यहेज्केल 28 |
| 12 • सर्प | उत्पत्ती 3 |
| 13 • निवड | उत्पत्ती 3 |
| 14 • पाप आणि लाज | उत्पत्ती 3 |
| 15 • आध्यात्मिकदृष्टया मृत | उत्पत्ती 3 |
| 16 • शाप | उत्पत्ती 3 |
| 17 • अभिवचन | उत्पत्ती 3 |
| 18 • पहिले बलिदान | उत्पत्ती 3 |
| 19 • हद्दपार करणे | उत्पत्ती 3 |
| 20 • प्रथम लेकरे | उत्पत्ती 4 |
| 21 • पाप्यांची उपासना | उत्पत्ती 4 |
| 22 • पापार्पणाचा नियम | उत्पत्ती 4 |
| 23 • स्वीकारले व नाकारले | उत्पत्ती 4 |
| 24 • पहिला खून | उत्पत्ती 4-5 |

25 • धीर आणि न्याय उत्पत्ती 6-7
26 • एक नवी सुरुवात उत्पत्ती 8-9
27 • गर्वाचा बुरुज उत्पत्ती 11
28 • देव अब्राहामला बोलावतो उत्पत्ती 12
29 • अभिवचन पाळणारा उत्पत्ती 15
30 • सर्वोच्च कसोटी उत्पत्ती 22
31 • दोषी पुत्र उत्पत्ती 22
32 • चित्रे आणि भविष्यवाणी उत्पत्ती 22
33 • विश्वासयोग्य आणि पवित्र देव निर्गम 19-20
34 • दहा आज्ञा निर्गम 20
35 • अधिक चित्रे निर्गम 20, 24
36 • अधिक भविष्यवाण्या स्तोत्रसंहिता आणि संदेष्ट्ये
**भाग-2 राजा आपली योजना परिपूर्ण करतो** ........ 87
37 • राजाची कथा पुढे सुरू राहते मत्तय 1
38 • मरीयेची कथा लूक 1
39 • योसेफाची कथा मत्तय 1
40 • आगमन लूक 2
41 • मेंढपाळांची कथा लूक 2
42 • मागी लोकांची कथा मत्तय 2
43 • एक परिपूर्ण बाळ लूक 2
44 • देवाचा कोकरा योहान 1
45 • परिपूर्ण पुत्र मत्तय 3
46 • दुसरा मनुष्य मत्तय 4
47 • मशीहा- राजा लूक 4
48 • दुरात्मे आणि आजार यांवर सत्ता लूक 4
49 • वारा आणि लाटा यांवर सत्ता मार्क 4
50 • पापावर सत्ता मार्क 2
51 • मृत्यूवर सत्ता लूक 7; योहान 11
52 • पुरवठा करणारा योहान 6
53 • शिक्षक मत्तय 5-7

| | |
|---|---|
| 54 • त्याचे वैभव | मत्तय 17 |
| 55 • त्याचे नियुक्त सेवाकार्य | मत्तय 16, 20 |
| 56 • राजा यरूशलेमेत प्रवेश करतो | मार्क 11 |
| 57 • राजाला प्रश्न विचारण्यात आले | लूक 20 |
| 58 • राजाला अटक करण्यात आली | मार्क 14 |
| 59 • राजाला दोषी ठरविण्यात आले | योहान 18 |
| 60 • राजाला मुकुट घालण्यात आला | मत्तय 27 |
| 61 • राजाला वधस्तंभी खिळण्यात आले | लूक 23 |
| 62 • तारण करणारा राजा | लूक 23 |
| 63 • शेवटले बलिदान | मत्तय 27 |
| 64 • राजाला पुरण्यात आले | मत्तय 27 |
| 65 • रिकामी कबर | मत्तय 28 |
| 66 • संदेष्टयांचा संदेश | लूक 24 |
| 67 • परिवर्तित झालेले शरीर | योहान 20 |
| 68 • प्रस्थान | प्रेषित 1 |
| 69 • विजयाचा उत्सव | स्तोत्र 24, प्रकटीकरण 5 |
| 70 • राजा परत येत आहे | प्रकटीकरण 19-22 |

**समाप्ती** ........................................................................................................ 157

• त्यानंतर ते सदैव आनंदात?

• वाईट बातमी

• चांगली बातमी

• राजाला तुमचा प्रतिसाद

**लाभदायक वैशिष्ट्ये** ........................................................................................ 167

• दृश्यांच्या उजळणीची प्रश्ने

• संदर्भ

• सखोल जाणे

• चित्रपट मालिकेतील एका भागाचे मार्गदर्शक

# दृश्यांच्या मागे

नदी किनारी आपल्या बहिणीच्या शेजारी बसून, व करण्यास काहीही नसल्यामुळे, ॲलीस आता थकली होती; मग तिची बहिण जे पुस्तक वाचत होती त्यामध्ये एकदा किंवा दोनदा तिने डोकावून पाहिले, परंतु पुस्तकामध्ये कोणतेही चित्र किंवा संभाषण नव्हते, "आणि अशा पुस्तकाचा काय उपयोग, "ॲलीस" ने विचार केला. चित्रेही नाही किंवा संभाषणही नाही?"

— लेवीस कॅरेल, 1865 द्वारे वंडरलैंड मधील ॲलीसचे साहस मधील सुरुवातीच्या ओळी

पुस्तक जे तुम्ही आता वाचणार आहात ते चित्रे व संभाषण द्वारे भरलेले आहे, परंतु ॲलीस इन वंडरलैंड[1] या उत्कृष्ट काल्पनिक कथेसारखे नाही, गौरवाचा राजामधील चित्रे व संभाषणे ही कथेपासून येतात जी प्रत्यक्षात घडली आहेत.[2]

सर्वात महान कथा जी कधी सांगितली गेली तिच्याविषयी चित्रांसह एक पुस्तक बनविण्याचा निर्णय मी काही द्विधा मनस्थितीत केला होता.

काही वर्षांपूर्वी, पश्चिम आफ्रिकेमध्ये राहत असताना, रेडीओ कार्यक्रम निर्माणमध्ये मी एक प्रशिक्षण घेण्यास सुरु केले. वर्गाच्या पहिल्या दिवशी प्राध्यापकाने विचारले, "रेडीओपेक्षा टेलीव्हिजनमध्ये कोणता एक मुख्य फायदा आहे?" त्याच्या उत्तराने आम्हाला आश्चर्यचकित केले.


"ते आम्हाला उत्तम चित्र पुरविते."

खरे आहे.

जास्त-पैसे निवेश केलेली प्रसिद्ध चीत्रपटे सुद्धा मानवी मनाच्या क्षमतेची बरोबरी करण्यात संघर्ष करतात की सरळ शब्दांना हुबेहूब मानसिक प्रतिमांमध्ये भाषांतरित करावे. संदेष्ट्यांचे प्राचीन पवित्रशास्त्र हे शेकडो शब्द-चित्रे रंगवितात जे कोणताही चित्रपट समाधानकारकरित्या दाखवू शकत नाही, की कोणताही मानवी कलाकार त्यास पूर्णपणे स्पष्ट करू शकत नाही.

म्हणून मी हे मान्य करतो. सर्वात उत्तम कथा जी कधी सांगितली गेली त्यास कोणतीही कलाकृती पूर्णपणे चित्रित करू शकत नाही. तरीही, तसा प्रयत्न करणे ही एक मौज होती.





आर्मिंडा सान मार्टिन, अर्जेन्टिनाच्या आमच्या प्रतिभासंपन्न व कृपावंत कलाकाराने शब्दापासून ते  चित्रित करण्यापर्यंत पवित्र शास्त्रातील कथा भाषांतरित करण्याचे अद्‌भुत व अचूक काम केले आहे. डिजिटल पेन व ब्रश सह, आर्मिंडाने केवळ चौदा महिन्यात सुरुवातीची रूपरेखा व अंतिम चित्र पूर्ण केले आहे. मला आशा आहे की माझ्यासारखे तुम्ही सुद्धा तिच्या कामाने रोमांचित होऊन जाल.

आता ह्याविषयी विचार करा.

जर आपण एक कथा पुस्तक वाचतो, आपण कोठे सुरुवात करतो? मध्यभागी? नाही, आपण सुरुवातीपासून सुरु करतो. केवळ तेव्हाच मग आपण कथा समजू शकणार. त्याप्रमाणे, पवित्र शास्त्र समजण्यासाठी, आपण सुरुवातीपासून सुरु केले पाहिजे आणि त्या कथेला त्याच्या तर्कमय व समाधानकारक निष्कर्षापर्यंत पाहिले पाहिजे.

संदेष्ट्यांच्या लिखाणात शेकडो लहान कथा आहेत ज्या सर्व एकत्र व्यवस्थित रचल्या आहेत की एक कथा बनवावी. गौरवाचा राजा लिहिण्यामध्ये, मला एखादया फुलाच्या व्यापारी सारखे वाटले ज्यास नियुक्त केले आहे की त्याने असंख्य फुले असलेल्या एका विशाल बागेमध्ये जावे, काही डझनभर निवडावे, आणि त्यांना एका पुष्पगुच्छ मध्ये रचावे जे संपूर्ण बागेचे वैभव प्रदर्शित करते. ह्या पुस्तकासाठी, पवित्र शास्त्रामधून मी काही डझनभर महत्वाच्या कथा निवडल्या आहेत आणि त्यांना 70-दृश्य नाटकामध्ये रचले आहे हा प्रयत्न करीत की सार्वकालिक राजाचे गौरव प्रदर्शित करावे ज्याने मानवी इतिहासात स्वतःला प्रकट केले होते.

माझी प्रार्थना ही आहे की ही सत्य कथा दाखविणे व सांगणे हे सर्व युगातील प्रेक्षकांना प्रेरित करेल की संदेष्ट्यांच्या लिखाणात हर्ष करावा, त्याच्यासह प्रेमात पडावे ज्याच्याविषयी ते बोलतात, आणि आनंदी राज्यात सहभागी होतात ज्याचा कधी शेवट होणार नाही.

स्पष्ट चित्रा साठी,

Paul D. Bramsen

# सुरुवात

एका उमद्या शीर्षका द्वारे माझे अंतःकरण गदगदून गेले आहे
जेव्हा मी राजासाठी माझ्या वचनांचे पठण करतो;
माझी जीभ ही एका कुशल लेखकाची लेखणी आहे.
तुझ्या वैभवात सत्य, विनम्रता व धार्मिकते खातर विजयासह पुढे
वाटचाल कर; असे होवो की तुझा उजवा हात अद्‌भुत कृत्ये
प्रदर्शित करो.

— संदेष्ट्यांच्या पवित्र शास्त्रातून (स्तोत्रसंहिता 45:1, 4)

## दृश्य 1
# राजा व त्याचे राज्य

जगाची सुरुवात होण्याच्या खूप वर्षा पूर्वी, तेथे एक राजा होता, गौरवाचा राजा.

हा राजा तुम्ही किंवा मी कल्पना करू शकतो त्या कशाही किंवा कोणाहीपेक्षा फारच श्रेष्ठ व अत्युच्च होता. सार्वकालिकतेच्या असीमितपणामध्ये तोच केवळ राजा होता आणि त्याचे राज्य हेच केवळ राज्य होते, परिपूर्ण ज्ञान, प्रीति, आनंद व शांतीचा एक स्तर. राज्यास सूर्य किंवा ताऱ्यांची गरज नव्हती कारण राजा स्वतः त्याचा प्रकाश होता.

ज्यावेळेस राज्य त्याच्या आकारात असीमित होते, ते त्याच्या प्रजेमध्ये सीमित होते. काही म्हणतात राजाकडे काहीही प्रजा नव्हती.

किंवा त्यास होती काय?

ह्या राजाचे प्रारंभीचे एक रहस्य हे की जरी जेव्हा तो एकटा अस्तित्वात होता, तो कधीही एकटा नव्हता.

तरीही, त्याचे जीवन इतर बुद्धिमान अस्तित्वांबरोबर त्यास सहभागी करावयाचे होते.

म्हणून ह्या चांगल्या व ज्ञानी राजाने लाखो तेजस्वी, अत्यंत-बुद्धिमान आत्म्याचे अस्तित्व ज्यास देवदूत म्हणतात त्यांच्यासह एक स्वर्गीय प्रांत बनविला. तो त्या सर्वांना नावाने ओळखत होता आणि त्यास पाहिजे होते की त्यांनी सुद्धा त्यास ओळखावे. राजाबरोबर जीवन अविरत साहस होते.

परंतु राजाला देवदूतांपेक्षा अधिक पाहिजे होते. म्हणून त्याने समय, अवकाश व भौतिक वस्तूचे स्तर निर्माण केले-चकाकणाऱ्या ग्रहा सह मन-हेलावून सोडणारे विश्व जे अद्‌भुत निर्मिती ज्यास मानव म्हणतात त्याच्या एका समाजाचे घर होईल.

देवदूतांपेक्षा वेगळे, केवळ दोन अस्तित्व, एक पुरुष व एक स्त्री सह मानवी कुटुंब सुरु झाले. जसे देवदूताबरोबर सहभागी केले होते, राजाला त्याचे जीवन त्यांच्याबरोबर सुद्धा सहभागी करावयाचे होते.

मग काहीतरी घडले, काहीतरी भयानक. राज्यात बंड उद्‌भवला, प्रथम स्वर्गात, मग पृथ्वीवर.

एका बंडखोर देवदूताने पृथ्वीचे राज्य त्यातील मनुष्यावर ताबा मिळविण्याद्वारे हिसकावून घेतले. परंतु राजा त्यामुळे आश्चर्यचकित झाला नाही.

राजाच्या सखोल अंतःकरणात सोडविण्याची एक योजना होती इतकी महान, इतकी रहस्यमय, इतकी विलक्षण, इतकी कल्पने-पलीकडील, की ते पूर्ण करण्यासाठी त्यास हजारो व हजारो वर्षे लागतील.

सार्वकालिकतेच्या राजाकडून तुम्ही अजून कशाची अपेक्षा कराल?

तो समया पलीकडे जगतो.





## दृश्य 2

# राजा आणि त्याचे संदेष्ट्ये

राजा व त्याची योजना जाणण्यासाठी, तुम्हाला त्याचे पुस्तक जाणले पाहिजे.

15 शतकांपेक्षा जास्त  काळापूर्वी राजाने 40 लोक निवडले की त्याची कथा व संदेशाची नोंद करावी. त्यांना संदेष्ट्ये म्हणतात. राजाने त्यांना त्याचे वचन दिले, जे त्यांनी गुंडाळीवर लिहिले की, त्याची नकल, वाटप केले जावे व भविष्यातील पिढीसाठी ठेवले जावे. जरी अधिकतर संदेष्ट्ये एकमेकांना कधी ओळखत नव्हते, त्यांची लिखाणे एक सातत्यपूर्ण कथा व संदेश सांगते.

संदेष्ट्यांच्या लिखाणास पवित्र शास्त्र म्हणतात. पवित्र शास्त्राशिवाय आपण केवळ अंदाज लावू शकतो की आपण कोठून आलो आहोत, आपण येथे का आहोत, आणि आपण कोठे जात आहोत. बरोबर उत्तर जाणण्यासाठी आपल्याला राजाच्या पुस्तकाची गरज आहे.

जवळजवळ 3,500 वर्षांपूर्वी, राजाने एक संदेष्टा ज्याचे नांव मोशे यास लिहिण्यास प्रेरित केले,

मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल. (अनुवाद 8:3)

राजाचे शब्द हे एक पुस्तक, पवित्र शास्त्रात आज एकत्र केले गेलेले आहे. पवित्र याचा अर्थ शुद्ध किंवा इतरांपेक्षा वेगळे केलेले. बायबल याचा अर्थ पुस्तक किंवा पुस्तकांचा संच. बायबल हे जगातील सर्वात अधिक विकले गेलेले आणि सर्वात अधिक भाषांमध्ये भाषांतरित केलेले आहे. पॅपीरस आणि चामड्याच्या हजारो गुंडाळी हे दाखवितात की हे इतर सर्व प्राचीन लेखांपेक्षा अधिक उत्तमरित्या जतन केलेले आहे.[3]

पवित्र शास्त्राला दोन मुख्य भाग आहेत.

पहिला भाग हा जुना करार (तोरह, स्तोत्रसंहिता, वगैरे) जेथे राजा त्याच्या योजनेविषयी भाकीत करतो.

दुसरा भाग हा नवा करार (शुभवर्तमान, प्रेषितांची कृत्ये, वगैरे) जेथे राजा त्याची योजना पूर्ण करतो.

करार याचा अर्थ करारपत्र, करारनामा किंवा संमती. जुना करार देवाने काय करण्याची योजना केली आहे त्याचे भाकीत करते. नवीन करार त्याच्या योजनेच्या पूर्ण करण्याची नोंद करते. केवळ परमेश्वरच इतिहास घडण्याअगोदर  ते लिहू शकतो.

जुना व नवीन करार यामधील फरक हा एका महान राजाने तुम्हाला पत्रे व चित्रे देऊन पाठविणे-आणि त्याच राजाने तुमच्याकडे एक व्यक्तिमध्ये येऊन भेट दयावी यामधील फरक आहे.

पवित्र शास्त्र हे प्रथम मध्य पूर्वीय भाग, आफ्रिका, आशिया व युरोप मध्ये आले, मग नंतर अमेरिका व त्याहीपलीकडे गेले. संदेष्ट्ये हे मध्य पूर्वीय भागातून आले, परंतु कथा व संदेश जे त्यांनी लिहिले हे सर्व राष्ट्रांसाठी आहे. प्रत्येक कुटुंबांसाठी. प्रत्येक व्यक्तीसाठी.

तुमच्या साठी.





## दृश्य 3
# राजा आणि त्याचे विश्व

जर आपण समय व अवकाश द्वारे, येथे लोकं, ग्रह, किंवा तारे असण्यापूर्वी, मागे, मागे, फार मागे प्रवास करू शकलो, तर आपण पवित्र शास्त्रातील प्रथम शब्दा मागील सामर्थ्य व गौरवाची साक्ष देऊ शकणारः

प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली. (उत्पत्ति 1:1)

आज, अनेक लोक विचार करतात की जग आणि त्याची आश्चर्ये ही सर्व-ज्ञानी निर्माणकर्त्यावाचून अस्तित्वात आली आहेत. परंतु त्यांचे सिद्धांत विश्वाच्या ह्या गुंतागुंतीची रचना व भविष्यसूचक व्यवस्था समाधानकारकपणे स्पष्ट करू शकत नाही.

त्याच्या पुस्तकात, राजा म्हणतो,
आकाश देवाचा महिमा वर्णिते; अंतरीक्ष त्याची हस्तकृती दर्शविते. (स्तोत्रसंहिता 19:1)

हाता विषयी बोलताना, तुमच्या स्वतःच्या हाताकडे पाहा. तुमचे अंगठे फिरवा. एक पुस्तक, झाडू, किंवा हातोडी त्याच्या शिवाय धरण्याचा प्रयत्न करा. बोटाची नखे, जोड, आणि त्वचेकडे पाहा. तुमच्या हाता द्वारे तुम्ही काही महत्वाचे काम करीत आहात त्याचा विचार करा. कोण परंतु एक स्वामी कारागीर अशा साधनाची रचना करू शकतो?

कोणत्या प्रकारचे ज्ञान व सामर्थ्याची गरज लागेल की करोडो नक्षत्रे बनवावी? किंवा एक जिवंत पेशी त्याच्या लाखो जटील भागांसह निर्माण करावी? किंवा आनुवंशिक सुत्रासह सूक्ष्म वेटोळे असलेल्या दोऱ्याप्रमाणे एका पेशीला एकत्र विणावे जे तुम्हाला घडवते?

काही तीन हजार वर्षांपूवी, एक संदेष्टा व राजा ज्याचे नांव दावीद याने लिहिले, ......तूच माझ्या आईच्या उदरी माझी घडण केली. भयप्रद व अद्‌भुत रीतीने माझी घडण झाली आहे म्हणून मी तुझे उपकारस्मरण करितो....
(स्तोत्रसंहिता 139:13-14)

कोणाला त्यास भेटावयास आवडेल ज्याने तुम्हाला घडविले आहे? नक्षत्रांचा निर्माणकर्ता व स्वामीबरोबर कोणाला कायमचे राहण्यास आवडेल? तुम्ही राहू शकता. त्याने स्वतःला प्रकट केले आहे. त्यास पाहिजे की तुम्ही त्यास ओळखावे. त्यास पाहिजे की तुमचे कुटुंब व समाजाने सुद्धा त्यास ओळखावे. तो तुम्हाला आमंत्रण देतो की त्याची योजना समजावी, त्याची प्रीति अनुभवावी, त्याचे वैभव पाहावे, त्याच्या शासनाच्या अधीन व्हावे, आणि त्याच्या गौरवासाठी जगावे. परंतु त्याची प्रजा होण्यासाठी तो तुमच्यावर दबाव आणणार नाही.

सरते शेवटी, तो केवळ एक राजा नाही. तोच एकमेव राजा आहे. गौरवाचा राजा.

ही त्याची कथा आहे.



# भाग 1

## राजा त्याच्या योजनेविषयी भाकीत करतो

— जुना करार —



## दृश्य 4

# पहिला दिवस

परमेश्वराचे पुस्तक राजाला शोभेल अशा मार्गाने सुरु होते. तो आपल्याला सांगतो की आपण काय ओळखावे आणि जास्त काही नाही हे त्यास पाहिजे.

> प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली. (उत्पत्ति 1:1)

जे सर्व काही आपण पाहतो व स्पर्श करतो त्यास सुरुवात आहे, परंतु विश्वाचा निर्माणकर्ता व स्वामीला सुरुवात किंवा शेवट नाही. तो अदृश्य, सार्वकालिक आत्मा आहे जो एकाच वेळी सर्वत्र असू शकतो. तो सर्व काही पाहतो व जाणतो.

तुम्हाला त्याचे नांव ठाऊक आहे काय? परमेश्वराला अनेक नांवे आहेत, परंतु त्याचे सर्वात प्रसिद्ध नांव हे प्रभु आहे. देवाच्या पुस्तकाच्या मूळ भाषेमध्ये, त्याचे नांव याव्हे आहे, ज्याचा अर्थ *एक जो आहे, किंवा सरळपणे मी आहे.*

मूळ पृथ्वीच्या राजाच्या वर्णनासह सृष्टि निर्माण कथा सुरु राहते.

> आणि पृथ्वी आकारविरहित व शून्य होती, जलनिधीच्या पृष्ठभागावर अंधकार होता आणि देवाचा आत्मा जलावर तळपत राहिला होता. (उत्पत्ति 1:2)

ही वेळ होती की लोकांसाठी एक ग्रह तयार करावे.

आणि देव बोलला, 'प्रकाश होवो, आणि प्रकाश झाला.

> देवाने प्रकाश पाहिला की तो चांगला आहे; आणि देवाने प्रकाश व अंधकार हे एकमेकांपासून वेगळे केले. देवाने प्रकाशाला दिवस व अंधकाराला रात्र म्हटले; आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली- हा पहिला दिवस. (उत्पत्ति 1:3-5)

देवाने सृष्टि निर्माण करण्याच्या पहिल्या दिवशी काय केले? त्याने प्रकाशाला आदेश दिला की अंधाराला भेदून जावे. नंतर सूर्याने पृथ्वीवर प्रज्वलित व्हावे, परंतु पहिल्या दिवशी नाही. देवाला पाहिजे की आपण हे ओळखावे की तोच केवळ प्रकाशाचे स्त्रोत आहे.

> देव प्रकाश आहे आणि त्याच्या ठायी मुळीच अंधार नाही. (1 योहान 1:5)


देव प्रकाशाप्रमाणे, शुद्ध आहे. त्यास दूषित केले जाऊ शकत नाही. जरी जेव्हा प्रकाश हा अगदी वाईट गोष्टींवर चमकतो, तरी तो शुद्ध आहे. देव परिपूर्ण आहे. देव पवित्र आहे.

तुम्ही हे लक्षात घेतले काय सृष्टि निर्माण करण्याच्या स्थळी देवाबरोबर कोण होता? त्याचा पवित्र आत्मा तेथे होता, जलावर तळपत होता. त्याचा शब्द सुद्धा तेथे होता, बोलत होता.

> प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. सर्व काही त्याच्याद्वारे झाले आणि जे काही झाले ......(योहान 1:1-3)

देवाचा पवित्र आत्मा व शब्द हे नेहमीच एका सत्य देवा बरोबर होते. त्यामुळेच राजाविषयी असे म्हटले जाऊ शकते:

*जरी जेव्हा तो एकटेच अस्तित्वात होता, तो कधीही एकटा नव्हता.*





# दृश्य 5
# एक परिपूर्ण जग

सहा व्यवस्थित क्रमवार दिवसात, राजाने एक सुंदर, अद्‌भुत जग निर्माण केले. देवाने सरळपणे बोलले, आणि परिपूर्णपणे-रचलेले आश्चर्य प्रकट झाले.

पहिल्या दिवशी देवाने म्हटले, “प्रकाश होवो!, आणि प्रकाश झाला.

दुसऱ्या दिवशी देवाने निळे आकाश जे आपण पाहतो आणि अदृश्य हवा जी आपण श्वास घेतो त्यासह पृथ्वीचे वातावरण बनविले. देवाने आकाशाला जीवनाच्या एका परिपूर्ण मिश्रणासह रचले-ज्यात आधारभूत अनेक वायू होते, जसे ऑक्सिजन व नाईट्रोजन.

तिसऱ्या दिवशी देवाने म्हटले, “कोरडी जमीन दृष्टीस पडो!” आणि तेच काय ते घडले. मग देव बोलला, “जमिनीने वनस्पती उपजावी!” ताबडतोब, गवत, रोपटे, फुले व फळ वाढू लागले, प्रत्येक सबीज होते.

चवथ्या दिवशी देवाने  सूर्य व चंद्राला चमकण्यास आणि पृथ्वीचे वर्ष, महिने व दिवसास चिन्हित करावे हा आदेश दिला. त्याने तारे सुद्धा बनविले.

पाचव्या दिवशी देव बोलला, “असे होवो की पाणी मासे व इतर जीवजंतूसह भरून जावो! असे होवो की प्रत्येक प्रकारच्या पक्षांद्वारे आकाश भरून जावो!” आणि तेच काय ते घडले.

सहाव्या दिवशी देव बोलला, “असे होवो की पृथ्वीने प्रत्येक प्रकारचे प्राणी निर्माण करावेत-ग्रामपशु, रांगणारे प्राणी व वनपशु!” देवाने प्रत्येक जीवित प्राण्यांस त्यांच्या सारखीच उत्पत्ति करण्यास आणि त्यांच्या उत्पतीची काळजी घेण्यास  समर्थ केले.

देवाने पाहिले की हे चांगले आहे. (उत्पत्ति 1:25)

शांतीने राज्य केले. सुरुवातीला सर्व प्राणी मित्रत्वात होते. ते एकमेकांस जिवंत मारत व खात नव्हते. वनस्पती त्यांना त्यांचे भोजन पुरवित होते.


व्यवस्थेने राज्य केले. घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे, सूर्य पृथ्वी पासून योग्य अंतर ठेवून असे. चंद्र हा नवीन चंद्र ते संपूर्ण चंद्रापर्यंत बदलत असे. पृथ्वी त्याची हवा, पाणी व निकामी पदार्थास पुन्हा उपयोगात आणत होती. जर योग्यपणे शासन केले असते, तर पृथ्वीवरील राज्यात कोणत्याही चांगल्या गोष्टीची उणीव कधीही पडली नसती. मानवासाठी ते एक आदर्श घर राहिले असते.

सृष्टि निर्माण करण्याचा प्रत्येक दिवस आपल्याला एक सुगावा देतो की परमेश्वर हा कशा समान आहे.[4]

दिवस 1. आपल्याला दाखवितो की परमेश्वर *पवित्र* आहे. तो प्रकाशाप्रमाणे परिपूर्ण व शुद्ध आहे.
दिवस 2. परमेश्वर *सर्व-शक्तिमान* आहे. त्याने वातावरण निर्माण केले व त्यास तो सांभाळतो.
दिवस 3. परमेश्वर *चांगला* आहे. त्याने आपल्यासाठी हजारो वनस्पती व भोजन निर्माण केले.
दिवस 4. परमेश्वर *विश्वसनीय* आहे. सूर्य व चंद्र त्यांच्या कक्षेमध्येच राहतात.
दिवस 5. परमेश्वर *जीवन* आहे. त्याने समुद्रात मासे व आकाशात पक्षी ठेवले आहेत.
दिवस 6. परमेश्वर *प्रीति* आहे. परमेश्वराने प्राणी निर्माण केल्यानंतर, ही ती वेळ होती की त्याने एक सृष्ट व्यक्ति निर्माण करावा ज्यावर तो त्याची प्रीति करू शकेन.

ही ती वेळ होती की त्या विशेष सत्वाला निर्माण करावे जो त्याची पवित्रता, सामर्थ्य, चांगुलपणा, विश्वासूपणा, जीवन आणि प्रीति प्रदर्शित करू शकेन.





## दृश्य 6
# पहिला मनुष्य

सृष्टि निर्माण करण्याच्या सहाव्या दिवशी, राजा स्वतःशीच बोलला (परमेश्वर, त्याचा पवित्र आत्मा, आणि त्याचा शब्द), हे म्हणत,'

आपल्या प्रतिरुपाचा[5] व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू, आणि त्यांस सर्व पृथ्वी, व संपूर्ण सृष्टीवर शासन करू दयावे....'

म्हणून देवाने आपल्या प्रतिरुपाचा मनुष्य निर्माण केला; देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला. नर व नारी अशी ती निर्माण केली. (उत्पत्ति 1:26-27)

जेव्हा पवित्र शास्त्र सांगते की देवाने त्याच्या स्वतःच्या प्रतिरूप लोकांस निर्माण केले, याचा अर्थ हा नाही की परमेश्वर आपल्यासारखा आहे. याचा अर्थ हा आहे की त्याचा स्वभाव आणि व्यक्तित्व आपल्याला प्रदर्शित करावयाचे आहे. जसे रोमन पैसे हे नंतर सम्राटच्या प्रतिमेसह शिक्का मारले जात होते, तसेच देवाची प्रतिमा ही मानवावर शिक्कामोर्तब केली आहे. पहिला मनुष्य व स्त्री ह्यांस त्यांच्या निर्माणकर्त्याप्रमाणे विचार करणे, प्रीति व बोलण्याच्या योग्यतेसह निर्माण केले गेले जेणेकरून त्याच्याबरोबर घनिष्ठ संबंधाचा आनंद त्यांनी घेऊ शकावे. लोकांना देवाचे गुलाम म्हणून नाही, परंतु देवाचे मित्र बनविण्यात आले.

मानवांस त्याच्या स्वतःच्या स्वरूपामध्ये निर्माण करून, देवाने त्यांना सत्ता दिली. लोकांनी उत्पत्ति निर्माण करावी आणि चांगल्यासाठी पृथ्वीवर शासन करावे, की त्याचे रहस्य शोधावे आणि त्याचे स्त्रोत बुद्धिमानपणे वापरावे. अशा क्षमतेने मानवास प्राणीमात्रांपेक्षा वेगळे केले.

प्राण्यांस, देवाने दोन परिमाण दिलेः शरीर व जीव. मानवांस, देवाने तीन परिमाण दिलेः शरीर, जीव व आत्मा.

> मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडीला व त्याच्या नाकपुड्यात जीवनाचा श्वास फुंकिला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला. (उत्पत्ति 2:7)

शरीर हे केवळ एक घर किंवा तंबू होते, ज्यामध्ये देवाने मनुष्याचा जीव व आत्मा फुंकिला.

जीव हा मनुष्याची व्यक्तिगत बुद्धिमत्ता, भावना व इच्छा होता, ज्याने मानवास विचार करणे, भावना, व निवड करण्यासाठी शक्य केले.

आत्म्याने मनुष्याला देवाबरोबर जोडले होते. तर त्याचवेळी शरीराने मनुष्यास तयार केले होते की दृश्य जगाबरोबर जुळावे, आत्म्याने मनुष्यास तयार केले होते की अदृश्य देवाबरोबर जुळावे. परमेश्वराला पाहिजे होते की मनुष्याने त्यास ओळखावे.

लोक हे देवाचे विशेष खजिना होते. कारण देवाने त्यांना निर्माण केले होते, तो केवळ त्यांचा निर्माणकर्ता नव्हता, परंतु त्यांचा स्वामी सुद्धा होता.

परमेश्वर देवाने पहिल्या मनुष्याला आदाम हे नाव दिले, याचा अर्थ पृथ्वीपासून, किंवा सरळपणे मनुष्य. नंतर देवाने पहिल्या स्त्रीला निर्माण केले, परंतु त्याअगोदर तेथे काही तयारी करण्याची गरज होती.

आदामाला एक घर व एक कामाची गरज होती.





दृश्य 7

# एक परिपूर्ण घर

पहिले मानवी शरीर  मातीपासून[6] बनविल्यानंतर आणि त्यामध्ये श्वास फुंकल्यावर, परमेश्वराने एदेन मध्ये, मध्य पूर्व भागात कोठेतरी, एक बाग निर्माण केली.

बागेच्या मध्य भागातून पारदर्शक नदी वाहत होती.

आणि परमेश्वर देवाने जमिनीतून सर्व जातीच्या झाडांना वाढविले-झाडे जी डोळ्यांना सुख देणारी व अन्ना साठी चांगली होती. बागेच्या मध्यभागी जीवनाचे झाड व चांगले व वाईटाचे ज्ञान करून देणारे झाड होते.

परमेश्वर देवाने मनुष्यास घेतले आणि त्यास एदेन बागेमध्ये ठेवले की तेथे काम करावे व त्याची काळजी घ्यावी. (उत्पत्ति 2:9, 15)

परमेश्वर देवाने आदामाला विचारले नाही की त्यास एदेनमध्ये राहावयाचे आहे की नाही. देव हा मनुष्याचा निर्माणकर्ता-स्वामी होता. मनुष्यासाठी काय उत्तम आहे हे त्यास ठाऊक होते.

आदामाचे बगीच्याचे घर हे असीमित हर्षाने भरलेले होते-गोष्टी ज्या पाहाव्या, ऐकाव्या, वास घ्यावा, स्पर्श करावा व स्वाद घ्यावा. चकाकणारे ओढे. गाणारे पक्षी. सुगंधित फुले. केसाळ सृष्ट जीव. रसभरीत फळे. कुरकुरीत भाज्या. गोड बेरीची फळे. गूढ जंगल. रंगीत खडक. मनोहर जीवजंतू. आणि इतर अब्जावधी अद्‌भुते त्यांचा शोध लावण्याची वाट पाहत आहेत.

परंतु मनुष्याला शोध लावणे आणि खाणे यापेक्षा अधिक मोठया गोष्टीसाठी बनविले आहे. देवाने आदामाला मानवी वंशाचा प्रमुख म्हणून बनविले आहे. देवाला पाहिजे होते की आदाम व त्याच्या कुटुंबाने त्याच्याबरोबर कायमचे राज्य करावे. परंतु लहान उद्धीष्टासह ज्यांच्यावरच केवळ भरंवसा केला जाऊ शकतो त्यांनाच मोठी उद्धीष्ट्ये दिली जाऊ शकतात.

म्हणून देवाने आदामाला त्याचे पहिले काम दिलेः बागेची देखरेख करावी.

ही बाग हे एक परिपूर्ण ठिकाण होते. त्यात कांटे किंवा कुसळ किंवा वाईट कीटक नव्हते. वातावरण हे आदर्श होते आणि जमीन ही सुपीक होती, अजून येथे पाऊस पडला नव्हता. त्याऐवजी, पृथ्वीपासून जे धुके वर आले होते आणि जमिनीवर पाणी देत होते.

देवाने आदामाला आणखी एक काम दिलेः प्राण्यांस नावे दयावी.

परमेश्वराने त्या सृष्ट जिवांस त्याच्याकडे आणले की पाहावे की तो त्यांस काय नांवे देतो. त्या दृश्याची कल्पना करा. हलणारे आयाळ व  शक्तिशाली पाय जे धावत आहेत त्यासह प्राण्यांची जोडी. आदामाने त्यांचा अभ्यास केला, त्यांच्या पाठीवर थाप दिली, आणि त्यांना घोडे नांव दिले. निर्माणकर्त्याच्या बोलाविण्यावर, एक विशाल पक्षी ज्याची  वक्र चोंच आणि मोठया पंखाने खाली आला. 'गरुड'! आदाम बोलला. पुढे,  एक श्वापद नारंगी कवच काळ्या पट्ट्यासह तेथून जातो. आदामाने त्यास काय म्हटले असेन असे तुम्हाला वाटते?

आदामाने सर्व ग्रामपशु, आकाशातील पक्षी व सर्व वनपशु, यांस नांवे दिली. (उत्पत्ति 2:20)

एदेन हे मनुष्यासाठी एक परिपूर्ण ठिकाण होते की त्याच्या निर्माणकर्त्याला ओळखावे.

ही वेळ होती की आदामाला विश्रांती दयावी.





## दृश्य 8
# पाप आणि मृत्यूचा नियम

सुरुवातीपासून, देव व मनुष्य मित्र होते, परंतु त्या मित्रत्वाची परीक्षा घेण्याची गरज होती. विश्वाचा राजा त्याचे राज्य त्या प्रजेने भरणार नाही ज्यांना त्याच्या अधीन होण्यास दबाव केला गेला आहे.देवाने आदामावर प्रीति केली आणि त्याच्या व त्याच्या भविष्यातील कुटुंबासाठी अद्‌भुत योजना होती. कारण देवाला लोक पाहिजे होते आणि बाहुले नाहीत, त्याने आदामाला आज्ञा पाळण्यास एक नियम दिला.

परमेश्वर देवाने मनुष्याला आज्ञा दिली, “बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ यथेच्छ खा; पण बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तूं खाशील त्या दिवशी तूं खास मरशील.” (उत्पत्ति 2:16-17)

> ही काही कठीण आज्ञा नव्हती. एकाला सोडून बागेतील कोणतेही फळ आदाम खाऊ शकत होता. हा सरळ नियम पाळण्याद्वारे, आदाम त्याच्या निर्माणकर्त्यावर भरंवसा ठेवतो हे दाखवू शकला असता की त्याच्यासाठी उत्तम काय आहे हे जाणावे.आदामाला काय होईल असे देवाने म्हटले होते जर त्याने हा नियम मोडला?

देवाने आदामाला असे बोलले काय जर त्याने प्रतिबंधित फळ खाल्ले तर त्याने धार्मिक विधी करण्यास सुरुवात करावी, प्रार्थना मणी वापराव्या, उपास करावा, दानधर्म करावे, चर्च, सभागृह, मंदिर किंवा मस्जिद मध्ये जावे, आणि पुरेशी चांगली कृत्ये करण्याचा प्रयत्न करावा की वाईट कृत्यांचे संतुलन करावे? हेच काय ते देवाने म्हटले काय?

नाही, हेच काय ते देव बोलला नाही. देवाने आदामाला बोलले, “जेव्हा तू त्याचे फळ खाशील, तेव्हा तूं खास मरशील.”

देवाच्या नियमाचे उल्लंघन यास पाप म्हणतात. देवाचे नियम मोडण्यासाठी शिक्षा ही मृत्यु होऊ शकतो. त्याच्या पुस्तकात, राजा यास “पाप आणि मृत्यूचा नियम” म्हणत आहे (रोम. 8:2).

राजाचा नियम म्हणतो की पापाला मृत्यूसह शिक्षा केली पाहिजे.

मृत्यूचा अर्थ वेगळे होणे. जर आदामाने देवाचा एक नियम मोडला, तो तेव्हा एका तुटलेल्या शाखे सारखा होईल जी सुकू लागते आणि ताबडतोब मरते जेव्हा तिला जीवनाच्या स्त्रोतपासून वेगळे केले जाते.

विश्वाच्या राजाने जे करण्यास सांगितले होते त्याऐवजी जर आदामाने जे त्यास करावयाचे पाहिजे होते ते करण्याचा निर्णय घेतला, तर ते बंडखोरीचे कृत्य असेल; जे पाप होईल.

देवाबरोबरच्या मनुष्याच्या मित्रत्वाला पाप संपवेल. पाप हे मनुष्याच्या शरीराला वृद्ध होणे व मरणाकडे नेईल. पाप हे मनुष्याचा आत्मा, जीव व शरीराला देवापासून कायमचे वेगळे करील. पाप हे प्राणघातक आहे.





## दृश्य 9
# पहिली स्त्री

देवाने पहिल्या मनुष्याला एक काम करण्यास व एक नियम पाळण्यास दिल्यानंतर, ही वेळ होती की पहिल्या स्त्रीला निर्माण करावे.

> परमेश्वर देवाने बोलले, "मनुष्य एकटा असावा हे बरे नाही; तर त्याच्यासाठी अनुरूप साहाय्यक मी करीन."
>
> मग परमेश्वर देवाने आदामाला गाढ निद्रा आणिली; आणि तो झोपला तेव्हा त्याने त्याची एक फासळी काढून घेतली, तिची जागा मांसाने भरून आली; परमेश्वर देवाने आदामाची फासळी काढून तिची स्त्री बनविली आणि तिला आदामाकडे नेले.
>
> तेव्हा आदाम म्हणाला, आता ही मात्र माझ्या हाडांतले हाड व मांसातले मांस आहे; हिला नारी म्हणावे, कारण ही नरापासून बनविली आहे." (उत्पत्ति 2:18, 21-23)

तुम्ही लक्षात घेतले काय की पहिली शस्त्रक्रिया कोणी केली-आणि कोणी पहिला विवाह आयोजित केला? होय, तो परमेश्वर होता.

नारीचा अर्थ नरापासून. नंतर, आदामाने त्याच्या पत्नीला हव्वा म्हटले, याचा अर्थ सर्वांची आई. जेव्हा देवाने त्यांना वेगवेगळ्या भूमिका दिल्या, त्याने पुरुष व स्त्रीला मुल्यामध्ये समान असे केले. आदामा प्रमाणे, हव्वेला देवाच्या स्वरूपामध्ये निर्माण केले होते. तिला सुद्धा तीचा निर्माणकर्ता-स्वामी ला ओळखावे, त्याचे चारित्र्य प्रतिबिंबित करावे, आणि त्याच्याबरोबर कायमचे एक आनंदी संबंध उपभोगावे यासाठी निर्माण केले होते.

> देवाने जे सर्व काही बनविले होते ते पाहिले, आणि ते फार चांगले होते. आणि संध्याकाळ झाली, आणि मग सकाळ झाली- हा सहावा दिवस.
>
> देवाने केलेले आपले काम सातव्या दिवशी संपविले, केलेल्या सर्व कामापासून त्याने सातव्या दिवशी विसावा घेतला. (उत्पत्ति 1:31; 2:2)


देवाने सातव्या दिवशी विसावा का घेतला? कारण त्याचे काम संपले होते. तसेच, आपले जग सहा दिवसांत निर्माण केल्याद्वारे, आणि सातव्या दिवशी विसावा घेतल्याद्वारे, देवाने सात-दिवसाचा आठवडा स्थापित केला-काम-विसावा चक्र जे आजही जगभर आचरले जाते.

परमेश्वर देवाने आदाम व हव्वेची एका ज्ञानी व प्रेमळ पित्याप्रमाणे काळजी घेतली. प्रत्येक संध्याकाळी, तो त्या बागेमध्ये येत असे की त्यांच्याबरोबर चालावे व बोलावे. ते त्याच्या सान्निध्यात आनंदी व समाधानी होते.

> पुरुष व त्याची पत्नी हे दोघेही नग्न होते, आणि त्यांस संकोच वाटत नसे. (उत्पत्ति 2:25)

एक परिपूर्ण जोडपे त्यांच्या परिपूर्ण निर्माणकर्त्यासह घनिष्ठ संबंधा द्वारे एका परिपूर्ण जगात राहत होते याची कल्पना करा. प्रारंभा मध्ये गोष्टी ह्या अशाच काय त्या होत्या.

कोठे चूक झाली?





## दृश्य 10

# प्रकाशाचे राज्य

पृथ्वीवर काय चूक झाली हे आपण शोधण्यापूर्वी, आपल्याला स्वर्गाविषयी काही गोष्टी समजण्याची गरज आहे.

ह्या इतर जगाला, स्वर्ग सुद्धा म्हटले आहे, ते शुद्ध प्रकाश, मोहक रंग, रोमहर्षक संगीत, समाधानी बोलणे, आणि रहस्ये उघड करण्याचे ठिकाण आहे. स्वर्गाची साधारण कृत्ये पृथ्वीच्या महान सुखविलासपेक्षा अधिक वरचढ आहेत. स्वर्ग हे आणखी एक परिमाण आहे.

स्वर्ग हे राजाचे घर आहे.

ह्या आनंदी ठिकाणाचे सर्वात मोठे आकर्षण हे राजा स्वयं आहे. स्वर्गीय नगराचा प्रत्येक कोपरा हा त्याचे वैभव प्रतिबिंबित करण्यास रचला गेला आहे.

> नगरी शुद्ध कांचेसारखी शुद्ध सोनेच होती. (प्रकटीकरण 21:18)

स्वर्गाचे सर्वात सविस्तर वर्णन हे पवित्र शास्त्राचे शेवटचे पुस्तक, प्रकटीकरण, मध्ये नोंदलेले आहे. देवाने संदेष्टा योहान यांस स्वर्गाचा दृष्टांत दिला आणि त्यास म्हटले की जे त्याने पाहिले आहे ते लिहून ठेवावे.

> तो पाहा, स्वर्गात राजासन मांडलेले होते आणि त्या राजासनावर कोणीएक बसलेला होता.....राजासनाच्या आतून 'विजा, वाणी व मेघगर्जना निघत होत्या.....राजासनापुढे "स्फटिकासारखा" जणू काय काचेचा समुद्र होता.
>
> तेव्हा मी पाहिले आणि अनेक देवदूतांची वाणी एकू आली; आणि त्यांची संख्या "अयुतांची अयुते व सहस्त्रांची सहस्रे होती. ते राजासनाच्या भोवती होते....ते हे म्हणण्याचे कधीही थांबत नाहीत: "पवित्र, पवित्र, पवित्र, जो होता," जो आहे, व जो येणार तो "सर्वसमर्थ प्रभु देव आहे." (प्रकटीकरण 4:2-3, 5-6; 5:11; 4:8)


देवदूत याचा अर्थ संदेशवाहक किंवा सेवक. देवदूत हे आत्मिक अस्तित्व आहेत. त्यांच्या निर्माणकर्त्या प्रमाणे, देवदूत हे मनुष्याला अदृश्य आहेत, केवळ तेव्हा जेव्हा त्यांना मिशन कार्यावर पाठविले जाते जेथे त्यांना दिसण्याची गरज असते.

स्वर्गाच्या राजाने मानव घडविण्याअगोदर देवदूतांना बनविले आहे. त्याच्या पुस्तकात, तो आपल्याला सांगतो की "सर्व देवदूतांनी जयजयकार केला" (ईयोब 38:7) जेव्हा त्यांनी त्यास जग निर्माण करताना पाहिले.

देवाने त्याच्या दूतांना समजणे, आज्ञा पाळणे, त्याची कायम स्तुति व सेवा करण्याची क्षमता दिली आहे. देवदूत हे देवाचे गुलाम नाहीत. जसे मनुष्यासह आहे, देवाने त्यांना त्याच्या अधीन होण्यास दबाव केला नाही. त्यास आनंदी, इच्छूक सेवक पाहिजेत.

पवित्र शास्त्र एका उच्च-पदावरील देवदूताविषयी सांगते ज्यांस देवाने महान बुद्धिमत्ता, सुंदरता, आणि सामर्थ्य दिले होते. जर तुम्हांला ह्या देवदूताची कथा ठाऊक आहे, तर मग तुम्हांला ठाऊक होईल की वाईट हे कोठून आले.





## दृश्य 11
# अंधाराचे राज्य

लुसिफर हा देवाचा एक प्रमुख देवदूत होता. त्याच्या नांवाचा अर्थ चमकणारा. संदेष्ट्यांचे पवित्र शास्त्र लुसिफरचे वर्णन “पूर्णतेची मुद्रा, ज्ञानपूर्ण व सर्वांगसुंदर” असे करते (यहेज्केल 28:12).[7]

मग लुसिफर त्याच्या महान निर्माणकर्त्या-राजा ऐवजी स्वतःकडे पाहू लागला. सर्वात प्रथम असे कधी घडले असेन, एक निर्मित गोष्ट स्वतःविषयी गर्विष्ठ झाली! त्याच्या स्वतःचे सौंदर्य व बुद्धीमत्ते द्वारे आंधळे होऊन, आणि हे विसरून की त्यास कोणी घडिले आहे, लुसिफरने त्याच्या हृदयात म्हटले,

> “मी आकाशांत चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च करीन, ......
> मी मेघांवर आरोहण करीन;
> मी परात्परासमान होईन.” (यशया 14:13-14)

लुसिफरला पाहिजे होते की राजा व्हावे. त्यास पाहिजे होते की देवाच्या इच्छे ऐवजी त्याची इच्छा पूर्ण केली जावी.

पापाने विश्वामध्ये प्रवेश केला.

लुसिफरने एक-तृतीयांश दूतांना पटवून सांगितले की त्याच्या ह्या बंडखोरीमध्ये येऊन मिळावे, परंतु परमेश्वर, जो पाप सहन करू शकत नाही, त्याने त्यांना त्याच्या स्वर्गीय घरातून काढून टाकले.

लुसिफरचे नांव सैतान असे बदलले, याचा अर्थ दोष देणारा. त्यास भूत देखील म्हणतात, याचा अर्थ फसविणारा. वाईट दूतांना पिशाच्च असे म्हटले आहे.

अंधाऱ्या गुप्त स्थळी, परमेश्वराने भूत व त्याच्या पिशाच्च साठी एक बंदिगृह तयार केले आहे. त्या स्थळास नरक व अग्नीचे सरोवर म्हणतात. हे देवापासून कायमचे वेगळे होण्याचे स्थळ आहे, एक स्थळ जेथे बंडखोर जास्त काही त्रास निर्माण करू शकणार नाहीत. एके दिवशी सैतान व त्याच्या सर्व पिशाच्चांना कायमचे बंदिगृहात कैद करण्यात येईल, परंतु ते सर्व अजून तेथे गेले नाहीत.

मग देवाने त्यांना बाहेर हाकलून दिल्यावर हे वाईट आत्मे कोठे गेले?

ते पृथ्वीच्या वातावरणात गेले. तेथे सैतानाने त्याच्या दूतांना पदा मध्ये संघटीत केले आहे. जर तो स्वर्गात शासन करू शकला नाही तर तो पृथ्वीवर शासन करणार आहे! त्यामुळेच पवित्र शास्त्र सैतानाला “अंतरीक्षातील राज्याचा अधिपती म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपती” असे म्हणते (इफिस. 2:2).

सैतान व त्याची भुते ही आपल्याला अदृश्य अशी आहेत, परंतु खरी आहेत. जरी आपल्याला हे ठाऊक नाही की ती कशी दिसतात, आपल्याला त्यांचे अंधारे व वाईट उद्देश अवश्य ठाऊक आहेत. ते सर्व प्रकारची फसवणूक वापरतील की लोकांना त्यांच्या अंधाऱ्या व नाश होणाऱ्या राज्यात जुळवून घ्यावे. तुमचा नाश करण्यासाठी ते सर्वोतोपरी प्रयत्न करीत राहतील.

> सैतान स्वतः तेजस्वी देवदूताचे सोंग घेतो. (2 करिंथ. 11:14)
> तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधीत फिरतो. (1 पेत्र 5:8)

आता चला आपण आपल्या पहिल्या आई-वडिलांच्या कथेकडे वळू या.





## दृश्य 12
# सर्प

आदाम व हव्वेचे जीवन हे साहस व उद्देशाने भरलेले होते.

प्रत्येक दिवस हा अद्‌भुते द्वारे भरलेला होता जेव्हा ते त्यांच्या विशाल बागेत फिरत होते, त्याच्या सृष्ट जीव व वनस्पतीची काळजी घेत होते आणि त्याच्या अन्नाला नमुना करीत होते.

प्रत्येक संध्याकाळ ही अधिकच अद्‌भुत होती जेव्हा त्यांचा निर्माणकर्ता-स्वामी व्यक्तिगत भेटी सह त्यांचा सन्मान करीत होता. त्याच्याबरोबर चालणे व बोलणे हे त्यांना किती आवडत होते! पुरुष व त्याची स्त्री त्यांच्या बागेतील घरामध्ये आनंदी होते.

परंतु सैतान हा आनंदी नव्हता. तो देवाचा द्वेष करीत होता व ह्या दोन निर्मित व्यक्तींचा द्वेष करीत होता जे देवाचे स्वरूप प्रतिबिंबित करीत होते

म्हणून सैतान, जो स्वर्गाचे राज्य हस्तगत करण्यात चुकला होता, त्याने पृथ्वीचे राज्य मिळविण्याची योजना आखली. जर केवळ तो आदामाला हस्तगत करू शकला, जो मानवी वंशाचा प्रमुख, की देवाचा नियम मोडण्याचे निवडावे. परंतु तो आदामाला सरळपणे परीक्षेत टाकू शकणार नव्हता....

एके दिवशी हव्वेने एक वाणी ऐकली.<br>
तो आदाम नव्हता. तो परमेश्वर नव्हता.<br>
तो एक सर्प होता!

हव्वे साठी, एक सरपटणाऱ्या जीवाने बोलावे हा एक नवीन शोध होता. तिला काही कल्पना नव्हती की परमेश्वराचा शत्रू सर्पाचा उपयोग करीत आहे. ना ही तिला हे ठाऊक होते की सैतानाला पाहिजे होते की देवाचे नियम मोडण्यासाठी आदामास परीक्षेत टाकण्यास तीचा उपयोग करावा.

सर्पाने संयम ठेवून वाट पाहिली, त्याची कटाक्ष नजर स्त्रीवर लक्ष ठेवून होती. मग, एका संधीच्या क्षणी, त्याने तीजजवळ फूत्कार टाकला,

> "तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांस सांगितले हे खरे काय?" (उत्पत्ति 3:1)
>
> सैतानाला पाहिजे होते की हव्वेने देवाच्या वचनावर शंका घ्यावी. त्यास हे सुद्धा पाहिजे होते की तिने विचार करावा की परमेश्वर ती व तिच्या पतीपासून काहीतरी चांगले राखून ठेवत आहे.
>
> स्त्रीने सर्पास म्हटले, "बागेतल्या झाडांची फळे खाण्याची आम्हांला मोकळीक आहे. पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडाच्या फळाविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शही करू नका, कराल तर मराल."
>
> "सर्प स्त्रीला म्हणाला, तुम्ही खरोखर मरणार नाही; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील, आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल." (उत्पत्ति 3:2-5)

हव्वेने काय केले?





## दृश्य 13
# निवड

देवाने आदाम व हव्वेला स्वातंत्र्य  दिले होते की त्याची इच्छा किंवा त्यांच्या स्वतःची इच्छा पूर्ण करण्यामध्ये निवड करावी.

परमेश्वराला ठाऊक होते की त्याच्या स्वतःच्या स्वरुपात त्याने घडविलेल्या ह्या विशेष निर्मितीसाठी काय उत्तम आहे. त्यास पाहिजे होते की आदाम व हव्वेने त्याच्यावर भरंवसा ठेवावा, जरी जेव्हा ते त्याच्या नियमा मागील कारण समजणार नाहीत.

केवळ परमेश्वरच वाईटाचे भयानक, मर्यादेबाहेरील परिणाम पाहू शकत होता, त्यामुळेच त्याने आदामाला बोलले,

> "बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ तूं खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तूं खाशील त्या दिवशी तूं खास मरशील." (उत्पत्ति 2:16-17)

परंतु आता सर्पाने हव्वेला म्हटले, "तुम्ही खरोखर मरणार नाही." (उत्पत्ति 3:4)

हव्वेने कोणावर भरंवसा ठेवला पाहिजे होता-तीच्या निर्माणकर्त्यावर किंवा एका निर्मितीवर?

हेच काय ते घडले:

> त्या झाडाचे फळ खाण्यास चांगले, दिसण्यात मनोहर आणि शहाणे करण्यास इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले;
> तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले व आपल्याबरोबर आपल्या पतीसही ते दिले;
> व त्याने ते खाल्ले. (उत्पत्ति 3:6)

तिने ते खाल्ले! त्याने ते खाल्ले!

हव्वेने मनाई केलेले फळ खाल्ले कारण ती सैतानाच्या चालाकी द्वारे फसविली गेली. आदामाने ते खाल्ले कारण त्याने देवाच्या मार्गा ऐवजी त्याच्या स्वतःच्या मार्गाने जाण्याचे जाणूनबुजून निवडले.

त्यांच्या पवित्र व प्रेमळ निर्माणकर्त्याच्या अधीन होण्याऐवजी, मानवजात शत्रूला शरण गेली.

आपल्या प्रथम आई-वडिलांनी पाप केले.





## दृश्य 14

# पाप व लाज

आदाम हा मानवी वंशाचा नियुक्त केलेला प्रमुख होता. हे त्यालाच देवाने ती आज्ञा दिली होती की बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको. नियमबाह्य फळ आदाम जोपर्यंत खात नाही तोच तो व त्याच्या पत्नीला त्यांच्या निवडीच्या भयानक परिणामाचा भास होऊ लागला होता.

> तेव्हा त्या उभयतांचे डोळे उघडले आणि आपण नग्न आहो असे त्यांस कळून आले; तेव्हा त्यांनी अंजिराची पाने शिवून आपणांसाठी कटिवेष्टने केली. (उत्पत्ति 3:7)

पेटलेली लाज व हृदय-भेदणाऱ्या दोषाने त्यांच्या जिवाला भरून टाकले होते. त्यांना आतून व बाहेरून अशुद्ध वाटू लागले.

पापाने लज्जा आणली.

आदाम व हव्वेने देवाचा नियम मोडण्या अगोदर, ते देवाची-जाणीव असणारे होते व त्यांना "लाज वाट त नव्हती" (उत्पत्ति 2:25). त्यांच्या निर्माणकर्त्याबरोबर असण्याने त्यांचा सन्मान केला जात होता, की त्याचे स्वरूप प्रतिबिंबित करावे आणि त्याचे मित्र होऊन राहावे.परंतु जेव्हा त्यांनी बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाल्ले, ते स्वत:विषयी विचार करणारे व लाज वाटणारे असे झाले.

लज्जेने सन्मानास बदलले.

त्यांनी त्यांची लाज अंजीराच्या पानांनी झाकण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणतेही स्वयं-प्रयत्न त्यांच्या समस्येला दुरुस्त करू शकत नव्हते. पापा पासून दूर होण्यामध्ये ते असहाय्य होते ज्याने त्यांच्या जिवामध्ये शिरकाव केला होता. सन्मान जो त्यांनी गमाविला होता त्यास पुनर्स्थापित करण्यात ते असहाय्य होते.

ही दुपारची वेळ होती.

लवकरच त्यांचा पवित्र व प्रेमळ निर्माणकर्ता त्याच्या संध्याकाळच्या भेटीला येणार होता. त्यास पाहण्याच्या विचाराने त्यांच्या शरीरामध्ये धडकी भरून गेली होती.

तो त्यांना काय बोलेल?

ते त्यास काय बोलतील?





# दृश्य 15
# आध्यात्मिकदृष्टया मृत

देवाची आज्ञा त्यांनी मोडण्याअगोदर, आदाम व हव्वा आनंदित होत  असत की त्यांचा निर्माणकर्ता-मित्र ज्या प्रत्येक वेळी त्यांना भेटण्यास येत असे.

आता ते घाबरले होते.

> यानंतर शिळोप्याचा वारा सुटला असता परमेश्वर देव बागेत फिरत होता, त्याचा आवाज त्यांस ऐकू आला, तेव्हा परमेश्वर देवाच्या दृष्टीपुढून आदाम व त्याची पत्नी  बागेतील झाडांत लपली. (उत्पत्ति 3:8)

अवज्ञा करणाऱ्या लेकरांसारखे जे त्यांच्या आई-वडिलांपासून लपण्याचा प्रयत्न करतात, आदाम व हव्वेने त्यांच्या निर्माणकर्त्यापासून लपण्याचा प्रयत्न केला.

> परंतु परमेश्वर देवाने मनुष्याला हाक मारली, "तूं कोठे आहेस?"
>
> त्याने उत्तर दिले, "मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो."
>
> देवाने म्हटले, "तूं नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तूं खाऊ नको अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तूं खाल्ले काय?"
>
> आदाम म्हणाला "जी स्त्री तूं मला सोबतीस दिली तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले."
>
> परमेश्वर देव त्या स्त्रीला म्हणाला, "हे तूं काय केले?"
>
> स्त्री म्हणाली, "सर्पाने मला भुरळ घातली म्हणून मी ते खाल्ले." (उत्पत्ति 3:9-13)

आदाम व हव्वेला देवापासून लपावयास का पाहिजे होते? कारण त्यांनी पाप केले होते. त्यांच्या पापा साठी त्यांनी एकमेकांवर दोष का लावला? कारण त्यांना लाज वाटत होती.

आदाम व हव्वा देवाचे पवित्र स्वरूप आता प्रदर्शित करू शकत नव्हते. त्यांच्या निर्माणकर्त्याची पवित्रता व प्रीति प्रतिबिंबित करण्याऐवजी, ते आता सैतानाची बंडखोरी व गर्वाला प्रतिबिंबित करीत होते.

पहिले जोडपे  हे एका जिवंत झाडापासून तुटलेल्या शाखेसारखे झाले होते. त्यांच्या पापाने विश्वाच्या राजाबरोबर त्यांचा संबंध तोडला होता.आध्यात्मिकदृष्टया, ते मृत होते. त्यांच्या पापाने त्यांना सार्वकालिक स्त्रोतपासून वेगळे केले होते.

शारीरिकदृष्टया, ते अजूनही जिवंत होते, परंतु वृद्ध होण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. मृत्यूच्या सामर्थ्याने त्यांच्या शरीरात प्रवेश केला होता.

आणि ह्या सर्व मृत्यु व विनाशचे कारण काय होते? पाप.





# दृश्य 16
# शाप

मानवी इतिहासाच्या प्रारंभी परमेश्वर व मनुष्य एकत्र होते. शांति व आनंद राज्य करीत होते. मग मनुष्याने देवाचा नियम मोडला.

आदाम व हव्वेने ज्या दिवशी पाप केले, त्याच दिवशी देवाने त्यांच्या पापाचे काही मोठया-प्रमाणाचे परिणाम घोषित केले.

स्त्रीला तो म्हणाला,

> “मी तुझे दुःख व तुझे गर्भधारण बहुगुणीत करीन, तूं क्लेशाने लेकरे प्रसवशील, तरी तुझा ओढा नवऱ्याकडे राहील आणि तो तुझ्यावर स्वामित्व चालवील.” (उत्पत्ति 3:16)

पापाने दृश्यामध्ये प्रवेश करण्याअगोदर, हव्वा तिच्या पतीच्या निस्वार्थी प्रेम व काळजी द्वारे आनंदित होती, परंतु आता पापाने-दूषित त्यांचा स्वभाव हा विवाहाच्या आनंदामध्ये भांडणे व यातना वाढविणारा होईल.

पुढे, देवाने आदामाला म्हटले,

> “तूं आपल्या स्त्रीचे ऐकले आणि ज्या झाडाचे फळ खाऊ नको म्हणून मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तूं खाल्ले; म्हणून तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे; तूं आयुष्यभर कष्ट करून तीचा उपज खाशील. ती तुला कांटे व कुसळे देईल, तूं शेतातले पीक खाशील. तूं आपल्या निढळाच्या घामाने भाकर मिळवून खाशील व अंती पुनः मातीला जाऊन मिळशील; कारण तिच्यातून तुझी उत्पत्ति आहे; तूं माती आहेस आणि मातीला परत जाऊन मिळशील.” (उत्पत्ति 3:17-19)

त्यांच्या पापाच्या कारणामुळे, आदाम व हव्वेने पृथ्वीवर सत्ता गमाविली होती. त्यांच्या जगामध्ये आता कांटे, यातना, दुःख, आजार व मृत्यु हे सर्व होते.

आपल्यापैकी काही हे अशा दुर्दैवाशी इतके निगडीत आहेत की आपण त्यास सामान्य म्हणून स्वीकार करतो. परंतु देवाच्या मूळ रचनेमध्ये एका सुगंधित गुलाबाच्या झाडांत हिंसक काटे असावेत असे होते काय? किंवा लेकरांच्या जन्म घेण्याच्या अद्‌भुततेमध्ये तीव्र यातना असाव्यात? किंवा ते ज्यांस देवाच्या स्वरुपात निर्माण केले आहे त्यांनी वृद्ध व्हावे व मरावे असे होते काय? नाही. देवाने मूळ निर्मितीला यासाठी रचले नाही की त्याच्या स्वतःविरुद्धच लढा दयावा. हे मनुष्याच्या पापाच्या कारणामुळे झाले होते की पृथ्वी ही देवाच्या शापाच्या अधीन आली होती.

मानवजातीने पाप केले आणि मानवजातीला अवश्य मेले पाहिजे. पाप आणि मृत्यूच्या नियमास याची गरज आहे

मृत्यु हे वेगळे होणे आहे. पाप तीन भयंकर वेगळेपणे निर्माण करतेः

1. आध्यात्मिक मृत्युः मनुष्याचा आत्मा देवापासून वेगळा केला जातो.
2. शारीरिक मृत्युः मनुष्याचा आत्मा व जीव हे त्याच्या शरीरापासून -आणि त्याच्या प्रियजनांपासून वेगळे केले जातात.
3. सार्वकालिक मृत्युः मनुष्याचा आत्मा, जीव व शरीर देवापासून कायमचे वेगळे केले जातात- अग्नीच्या सरोवरात.[8]

पापाच्या शापापासून मनुष्याला स्वतःला वाचविण्याचा काहीही मार्ग नाही.

येथे कोणती आशा होती काय?





## दृश्य 17
# अभिवचन

सैतानाने राजाचा विशेष खजिना चोरला होता, परंतु राजाकडे एक गुप्त योजना होती की तो परत विकत घ्यावा. कारण की खंडणी किंमत जी राजाने देण्याची योजना केली होती ती विचारांच्या पलीकडे अत्युच्च होती, ना भुते ना ही मानव जो पर्यंत ते पूर्ण केले जात नाही तोपर्यंत त्याच्या योजनेस समजू शकणार नाही.

त्याच दिवशी सैतानाने मानवी वंशाला बंदिस्त केले, देवाने सर्पाला म्हटले,

> "कारण तूं हे केले आहे म्हणून सर्व ग्रामपशु व वनचर यांपेक्षा तूं शापग्रस्त हो; तूं पोटाने चालशील आणि आयुष्यभर माती खाशील." (उत्पत्ति 3:14)

जेव्हा देवाने सर्पांना निर्माण केले होते तेव्हा त्यांना पाय होते. कारण सर्पांना सैताना द्वारे वापरले गेले की मानवजातीला पापात पाडावे, देवाने त्यास जमिनीवर सरपटण्याचा शाप दिला. (तुम्हांला हे ठाऊक आहे काय की अजगर आणि अजगर सारखा सरपटणारा जीवजंतू यांना त्यांच्या त्वचे खाली सूक्ष्म गोळा आहे जेथे कधी पाय होते?) सर्पास श्वापदामधील सर्वात खालच्या दर्जाचे करण्याद्वारे, देवाने मानवी कुटुंबाला एक दृश्य स्मरण दिले की, त्याच्या वेळे मध्ये, तो "त्या प्राचीन सर्पास कुचलेल ज्यास भूत किंवा सैतान म्हणतात, जो संपूर्ण जगाला भटकवित आहे" (प्रकटीकरण 12:9).

मग देवाने सैतानाला बोलले, ज्याने सर्पाचा वापर केला होता,

> "तूं व स्त्री, तुझी संतति व तिची संतति यांमध्ये मी परस्पर वैर स्थापीन; ती तुझे डोके फोडील, व तूं तिची टाच फोडिशील." (उत्पत्ति 3:15)

अनेक भविष्यवाणीमधील ही प्रथम होती ज्यामध्ये देवाने, थोडे थोडे, त्याची गुप्त योजना स्पष्ट केली की लोकांना सैतान, पाप व मृत्युपासून सोडवावे. परंतु त्या योजनेला सैतान व त्याच्या अनुयायांपासून लपविण्यासाठी, राजाने भविष्यवाणी संकेत लिपी मध्ये दिली.

परमेश्वराने पृथ्वीवर एक तारणारा- स्त्रीचे वंशज पाठविण्याचे अभिवचन दिले. तारणाऱ्यास एक मानवी आई असेन, परंतु मानवी पिता नाही. मशीहा म्हणून तो ओळखला जाईल, याचा अर्थ निवडलेला एकमेव जण. सैतान हा मशीहाच्या टाचेवर वार करेल, परंतु मशीहा हा सैतानाचे डोके ठेचेल.

या सर्वांचा अर्थ काय आहे? नंतर राजा त्यास स्पष्ट करेन, परंतु सध्या साठी देवाने आदाम व हव्वे ला आशेचे किरण दिले आहे.

हजारो वर्षा नंतर, राजाचा एक संदेष्टा हे लिहीन,

> "अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला......कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचे नांव इम्मानुएल म्हणतील-आमच्या सान्निध्य देव." (यशया 9:2; 7:14)

राजा त्याचा विशेष खजिना खंडणी[9] देऊन घेईल. परंतु त्यासाठी किती किंमत दयावी लागेल?





## दृश्य 18

# पहिले बलिदान

तुम्हाला आठवते काय की आदाम व हव्वेने मनाई केलेले फळ खाल्ल्यावर काय केले? त्यांनी अंजीराच्या पानांनी कटिवेष्टन बनविले.

त्यांच्या पांघरुणाने त्यांना त्यांचा निर्माणकर्ता-न्यायाधीशच्या उपस्थितीत समाधानी वाटू दिले काय? नाही! त्यांना लाज व दोषी आहोत असे वाटले. त्यांच्याकडे काहीही मार्ग नव्हता की देवाबरोबर स्वतःला योग्य असे करावे.

म्हणून देवाने त्यांच्यासाठी काहीतरी केले.

> देवाने आदाम व त्याच्या पत्नीसाठी चर्म वस्त्र बनविले आणि त्यांना घातले. (उत्पत्ति 3:21)

पहिले प्राणी बलिदान सर्वात अगोदर कोणी केले? देवाने केले.

परमेश्वराने काही प्राण्यांना जिवंत मारले, त्यांच्या कातडीने झगा बनविला, आणि आदाम व हव्वेला नेसविले. असे करण्याने, परमेश्वर त्यांना त्याच्या न्याय, दया, आणि कृपेविषयी काही मुलभूत धडे शिकवीत होता.

चला आपण ह्या तीन महत्वाच्या शब्दांवर विचार करू.

> *न्याय.* मृत प्राण्याकडे पाहा. देवाने त्याचे बलिदान का दिले?
> त्याने असे केले की आदाम व हव्वेला हे दाखवावे की पाप व मृत्युच्या नियमास जपले पाहिजे. त्यांच्या पापास मृत्यू द्वारे शिक्षा केली पाहिजे. तो न्याय आहे.
>
> *दया.* आदाम व हव्वेकडे पाहा. देवाने त्यांना जिवंत मारले काय? नाही. देवाने त्यांच्याऐवजी मरण्यास प्राणी पुरविला. हा देवाचा मार्ग होता की त्यांना शिक्षा दिल्याशिवाय पापास शिक्षा करावी. ती दया आहे.
>
> कृपा. आता आदाम व हव्वेच्या सुंदर वस्त्रांकडे पाहा. नियम-मोडणारे हे दोघे ह्या बक्षीससाठी पात्र होते काय? नाही, परंतु देवाने बलिदान केलेल्या प्राण्यांच्या त्वचेमध्ये पोषाख देण्याद्वारे त्यांना दया दाखविली. ती कृपा आहे.

परमेश्वराने त्यांच्यासाठी काय केले याकारणामुळे, आदाम व हव्वा हे देवाबरोबर पुन्हा असण्याने आनंदी होते!


प्राण्यांच्या रक्ताने त्यांच्या पापाला पांघरून घातले होते. आदाम व हव्वा त्या दिवशी मरण्यास पात्र होते, परंतु त्यांच्या ठिकाणी निष्पाप प्राणी मरण पावले.

प्राण्यांच्या त्वचेच्या झग्याने त्यांची लाज झाकली होती. पुन्हा एकदा, आदाम व हव्वेला देवाच्या सान्निध्यात समाधानी वाटले.

हजारो वर्षानंतर देवाच्या एका संदेष्ट्याने लिहिले,

> मी परमेश्वराच्या ठायी अत्यंत हर्ष पावतो! कारण त्याने मला तारणाची वस्त्रे नेसविली आहेत; मला धार्मिकतेच्या झग्याने आच्छादिले आहे. (यशया 61:10)

केवळ देवाकडे मार्ग आहे की पाप्यांना पुन्हा एकदा योग्य बनवावे.





## दृश्य 19

# हद्दपार करणे

जेव्हा देवाने स्वर्गातून बंडखोर दूतांना काढून टाकले होते, त्यांचा विनाश हा मुद्रित केला गेला होता. हे आत्मिक अस्तित्व जे स्वर्गाच्या तेजस्वी प्रकाशात जगले होते त्यांच्याकडे त्यांच्या पापासाठी काही बहाणा नव्हता. परंतु पापाने-दूषित झालेल्या मानवासाठी, परमेश्वराकडे योजना होती की त्यांना परत मिळवावे जर ते त्याच्यावर भरंवसा करतील.

अजूनही, पापाचा परिणाम आहे. जसे देवाने लुसिफर व वाईट दूतांना आकाशातील स्वर्गातून बाहेर काढून टाकले होते, तसे आता देवाने मनुष्य व त्याच्या पत्नीला पृथ्वीवरील स्वर्गातून बाहेर काढले होते.

> त्यांना बागेमधून हद्दपार केल्यावर, परमेश्वर देवाने एदेन बागेच्या पूर्वेला एक सामर्थी दूतासारख्या अस्तित्वाचा पहारा ठेवला. आणि गरगर फिरणारी ज्वालारूप तरवार ठेविली, जी जीवनाच्या झाडाच्या मार्गाचे रक्षण करीत होती. (उत्पत्ति 3:24)

जीवनाचे झाड हे आणखी एक विशेष झाड होते जे बागेच्या मध्यभागी होते. केवळ परिपूर्ण लोक त्यातून खाऊ शकत होते. आदाम व हव्वा आता परिपूर्ण राहिलेले नव्हते. त्यांनी पाप केले होते आणि त्यांना आता वृद्ध होणे व मरावयाचे होते.

आपला महान निर्माणकर्ता देव पवित्र आहे. याचा अर्थ तो शुद्ध, स्वच्छ, परिपूर्ण आणि नीतिमान आहे. त्याचा पवित्र स्वभाव व पवित्र नियमाच्या कारणामुळे, त्याने पापास मृत्यु- जीवनाच्या स्त्रोतपासून वेगळे होणे यासह दंड दिला पाहिजे.

काही लोक विचार करतात की परमेश्वर इतका "महान" आहे की नियम ज्याचा आदेश त्याने दिला आहे त्याकडे तो दुर्लक्ष करू शकतो. एका न्यायालयाची कल्पना करा जेथे न्यायाधीश राष्ट्राच्या नियमास लागू करण्यास नकार देत आहे. तुम्ही हे म्हणू शकता काय असा न्यायाधीश हा महान आहे? एका फुटबॉल स्पर्धेची कल्पना करा जेथे प्रमुख पंच खेळाच्या नियमाकडे दुर्लक्ष करीत आहे. तुम्ही त्यास एक महान पंच किंवा एक वाईट पंच म्हणाल काय?

सैतानाला पाहिजे होते की हव्वेने विश्वास ठेवावा की तीचा निर्माणकर्ता त्याच्या नियमास लागू करणार नाही, की तो नियम-मोडणाऱ्यास मृत्यू सह दंडित करणार नाही. परंतु नीतिमान राजा व विश्वाचा न्यायाधीश नेहमीच त्याचे वचन पाळतो.

परमेश्वर महान आहे. तुम्ही त्याजवर भरंवसा ठेवू शकता.

> नीति व न्याय ही तुझ्या राजासनाचा पाया आहेत. दया व सत्य तुझे सेवक आहेत. (स्तोत्रसंहिता 89:14)

पाहा जर तुम्ही ह्या कोड्याचे उत्तर देऊ शकता: *सैतान व मनुष्य काय करू शकतात जे परमेश्वर देव करू शकत नाही?*

येथे देवाचे स्वतःचे उत्तर आहे:

> "मी आपला करार मोडणार नाही; माझ्या मुखातून जे निघाले ते मी बदलणार नाही......माझ्या पवित्रते मध्ये मी खोटे बोलणार नाही." (स्तोत्रसंहिता 89:34-35)

विश्वाचा राजा त्याच्या वचनाच्या उलट जाऊ शकत नाही.





## दृश्य 20

# प्रथम लेकरे

बागेच्या बाहेर, जग हे तरीही एक सुंदर ठिकाण होते, परंतु त्यामध्ये वाईट गोष्टी जसे टोचणारे कांटे, चावणारे ढेकुण, लटपटणारे गुडघे, आणि कोंदट नाक हे सर्व त्यात होते. अनेक प्राणी आता मैत्रीपूर्ण नव्हते. अन्न शोधणे हे आता सोपे नव्हते. आदाम व हव्वेला कठीण परिश्रम करावे लागत होते केवळ त्यांच्या भुकेल्या पोटास भरावे.

त्यांना आनंद व हर्षाचे क्षण सुद्धा होते.

> आदामाने आपली स्त्री हव्वा हिला जाणिले; ती गर्भवती होऊन तिने काइनास जन्म दिला; ती म्हणाली, "परमेश्वराच्या सहाय्याने मला पुरुषसंतान लाभले आहे." (उत्पत्ति 4:1)

हव्वेने जगाच्या पहिल्या बाळाचे नांव काइन ठेवले, याचा अर्थ संपत्ति. देवाकडून काय हा अनमोल खजिना! कदाचित तिने विचार केला की तीचा पुत्र हा अभिवचन दिलेला तारणारा असेल, परंतु लवकरच तिला हे कळले की तीचे सुंदर लहान बाळ हे उद्धट व स्वार्थी आहे-त्याच्या आई-वडिलांसारखे!

नंतर, जेव्हा त्यांचा दुसरा पुत्र जन्मला, हव्वेने त्याचे नांव हाबेल ठेवले, याचा अर्थ व्यर्थता किंवा शून्यता. स्पष्टपणे, आदाम व हव्वा निष्पाप वंशज निर्माण करू शकले नाही जो लोकांचे त्यांच्या पापांपासून तारण करेल.

देवाच्या पवित्र प्रतिमेस प्रतिबिंबित करण्याऐवजी, आदाम व हव्वेच्या वंशजांनी त्यांचे पापा कडे-झुकाव असलेला स्वभाव प्रतिबिंबित केला.

> आदामाला ....पुत्र व कन्या झाल्या.....त्याच्या सदृश, त्याच्या प्रतीरुपात. (उत्पत्ति 5:4, 3)

चित्राकडे पाहा. काइन त्याच्या लहान भावाकडून कलिंगड हिसकावीत आहे हे तुम्ही पाहता काय? तो त्याच्या आई-वडिलांसारखा कृत्य करीत आहे, ज्यांनी ते फळ घेतले जे त्यांचे नव्हते. संसर्गजन्य आजारा सारखे, आदाम व हव्वेच्या पापाने त्यांच्या लेकरांवर संसर्ग केला होता.

> जेव्हा आदामाने पाप केले, पाप जगात आले. आदामाच्या पापाने मृत्यु आणला, आणि म्हणून मृत्यु सर्वांना पसरला, कारण सर्वांनी पाप केले आहे. (रोम. 5:12)

एक आफ्रिकन म्हण म्हणते, *उंदीर तीच उत्पत्ति निर्माण करू शकतो जे खणतात.*


एक अरब म्हण अशीच वास्तविकता उच्चारतेः *बदकाचा पुत्र हा पोहणारा आहे.*

जेव्हा आपल्या प्रथम आई-वडिलांनी पाप केले, ते एका झाडापासून तुटलेल्या शाखेसारखे झाले. ज्याप्रमाणे तुटलेल्या शाखेवरील प्रत्येक अंजीर व पानावर प्रभाव होतो, तसेच आदामाच्या कुटुंबाचा प्रत्येक सदस्य हा आदामाच्या पापा द्वारे संक्रमित झालेला आहे.

आदाम मेल्यावर खूप वर्षांनी, संदेष्टा राजा दावीद ने लिहिले,

> मी पापी असा जन्मलो-होय, ज्याक्षणापासून माझ्या आईने मला गर्भधारण केले होते. (स्तोत्रसंहिता 51:5)

आपल्याला कदाचित हे ऐकावयास आवडणार नाही, परंतु आपल्याला हे ठाऊक आहे हे सत्य आहे.





## दृश्य 21
# पाप्यांची उपासना

आदाम व हव्वेला अनेक पुत्र व कन्या होत्या, परंतु पवित्र शास्त्र त्यांच्या प्रथम दोन पुत्रांच्या कथेवर लक्ष केंद्रित करते.

हाबेल मेंढपाळ झाला, आणि काइन शेतकरी झाला. (उत्पत्ति 4:2)

काइन व हाबेल हे चांगले काम करणारे होते. दोघांना त्यांच्या निर्माणकर्त्याविषयी ठाऊक होते. दोघांना पाहिजे होते की देवाने त्यांना व त्यांच्या उपासनेला स्वीकारावे. दोघांची एकच समस्या होतीः पाप. केवळ हेच नाही की ते जन्मतःच पापी होते, परंतु ते पाप्यांसारखे जगले. प्रत्येक दिवशी त्यांनी विचार केला, बोलले आणि त्या प्रकारे कृत्ये केली जे देवाचा शुद्ध व प्रेमळ स्वभाव प्रतिबिंबित करीत नाही. त्याच्या पुस्तकात, विश्वाचा राजा यास पाप म्हणतो.

सर्वांनी पाप केले आहे; आपण सर्व जण देवाच्या गौरवाला उणे पडलो आहोत. (रोम. 3:23)

काइन व हाबेलला क्षमा करण्याचा आणि त्याच्या दृष्टीसमोर त्यांना नीतिमान घोषित करण्याचा येथे काही मार्ग होता काय? होय, परंतु तो फार, फार महागडा होणार होता.

रक्त ओतल्यावाचून येथे पाप क्षमा नाही. (इब्री. 9:22)

विश्वाचा तो अतूट नियम-पाप व मृत्यूचा नियम-हा पाळला गेला पाहिजे होता. पापास मृत्यू द्वारे दंडित केले पाहिजे होते. त्यामुळेच क्षमा करण्याच्या राजाच्या मार्गासाठी मृत्यूच्या किंमतीची गरज होती. ज्यावेळेस पाप हे मरणास पात्र होते, तेव्हा परमेश्वर एका निश्चित प्रकारचा प्राणी, जसे एक कोकरा याचे रक्त स्वीकारणार होता.

कोकरा हा आजारी किंवा खरचटलेला किंवा घाण नसावा. तो सुदृढ व स्वच्छ असावा. तो एक परिपूर्ण कोकरा असावा.

कोकऱ्यास जिवंत मारावे व जाळावे. दोषी पाप्याच्या ठिकाणी तो मरणार असेल. कोकरा हा पाप्याचा बदली असेल.

एके दिवशी दोघा भावांनी देवाला अर्पण आणले, परंतु केवळ एकाने योग्य अर्पण आणले. काही काळ लोटल्यावर असे झाले की काइनाने परमेश्वराला शेताच्या उत्पन्नापैकी काही अर्पण आणिले. हाबेलानेहि आपल्या कळपांतील प्रथम जन्मलेल्यातून, म्हणजे त्यातल्या पुष्टातून काही अर्पण आणिले. (उत्पत्ति 4:3-4)

देवाने कोणते अर्पण स्वीकारले असे तुम्हाला वाटते?





## दृश्य 22
# पापार्पणाचा नियम

भावांकडे पाहा. देवाला ते काय अर्पण करणार आहेत त्याकडे पाहा. वेदीकडे पाहा.

वेदी ही जमिनीपासून उंच असलेला भाग होता, सामान्यपणे दगड किंवा मातीपासून बनविली जात असे. ते मृत्यूचे ठिकाण होते. वेदी अर्पणास स्वर्ग व पृथ्वीच्या मध्ये, परमेश्वर व मनुष्याच्या मध्ये धरून होते. जे काही वेदीवर अर्पण केले जात असे त्यास अग्निद्वारे जाळले जात असत.

परमेश्वर नेहमीच न्याय करतो परंतु दया दाखवावी हे त्यास पाहिजे असते. तो दोन्ही कसे काय करू शकतो? पाप्याला दंड दिल्यावाचून तो पापास दंडित कसे करू शकतो?

काइन व हाबेल नंतर अनेक वर्षांनी, देवाने संदेष्टा मोशेला सांगितले:

> शरीराचे जीवन तर रक्तात असते, आणि तुमच्या जीवांबद्दल वेदीवर प्रायश्चित्त करण्यासाठी ते मी तुम्हांला दिले आहे; कारण रक्तांत जीव असल्याकारणाने रक्तानेच प्रायश्चित्त होते. (लेवीय 17:11)
>
> यज्ञ पशूच्या डोक्यावर त्याने आपला हात ठेवावा म्हणजे तो पशु त्याच्या प्रायश्चित्तादाखल मान्य होईल. (लेवीय 1:4)

प्रायश्चित्त म्हणजे काय? आवश्यक खंडणीची किंमत भरावी याशी त्याचे घेणेदेणे आहे जेणेकरून पाप हे झाकले, स्वच्छ केले व क्षमा केले जाऊ शकते. जुन्या कराराच्या वेळेत, देवाने लोकांना सांगितले होते की तो सुदृढ कोकरा, मेंढा, बकरी, बैल व कबुतर यांचे रक्त त्यांच्या पापांसाठी किंमत भरली आहे म्हणून स्वीकारेन. असे रक्त प्रायश्चित्त पुरवेल-पापासाठी आवरण-परंतु केवळ त्यादिवसापर्यंत जेव्हा परमेश्वर एक परिपूर्ण बलिदान पुरविणार आहे की पाप व मृत्यूच्या नियमा द्वारे आवश्यक खरी किंमत भरावी.

आता काइनकडे आणि देवाला तो काय अर्पण करणार आहे याकडे पाहा. फळे व भाज्यांची काय ती सुंदर निवड होती! हे अर्पण निर्माण करण्यासाठी त्याने किती कठीण परिश्रम घेतले होते! परंतु ते त्याच्या पापाला आवरण घालू शकले नाही कारण त्यात रक्त नव्हते, मृत्यूची किंमत नव्हती.

हाबेल व त्याच्या अर्पणाकडे पाहा. काय हे दुःखद दृश्य! एक लहान कोकरा बांधलेला आहे आणि लवकरच मरणार आहे. हाबेल त्याचे हात त्या कोकऱ्याच्या डोक्यावर ठेवत आहे हे तुम्ही पाहता काय? कारण हाबेलाने देवाच्या योजनेवर विश्वास ठेवला होता, देवाने हाबेलाची सर्व पापे काढून टाकली आणि ती कोकऱ्यावर ठेवली होती. हाबेल देवाला धन्यवाद देत होता जरी तो, हाबेल, मृत्यूच्या शिक्षेस पात्र आहे, परमेश्वर कोकऱ्याचे रक्त पापासाठी आवरण असे स्वीकारेल.

देवाच्या नियमास आवश्यकता होती की सर्व पाप्यांना मृत्यू सह दंडित करावे, परंतु देव त्याचा न्याय, व दये मध्ये, त्यांच्या ठिकाणी कोकऱ्याचा मृत्यु स्वीकारणार होता. देव यास "पापार्पणाचा नियम" म्हणतो (लेवीय 6:25).

पापार्पणाच्या नियमाने हाबेलास पाप व मृत्यूच्या नियमापासून मुक्त केले.

परंतु काइन विषयी काय?





## दृश्य 23
# स्वीकारले व नाकारले

तुम्ही काइनाची वेदी पाहता काय? त्यावर काय होते? झुकलेले पीक. आता हाबेलच्या वेदीकडे पाहा. त्यावर काय होते? रक्त व राख.

देवाने ह्या दोन भाऊ व त्यांच्या उपासनेविषयी काय विचार केला?

> परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण यांचा आदर केला; पण काइन व त्याचे अर्पण यांचा त्याने आदर केला नाही. (उत्पत्ति 4:4-5)

आपल्याला हे सांगण्यात आले नाही की हाबेलाच्या अर्पणास मान्यता व काइनाच्या अर्पणाचा[10] अस्वीकार देवाने कसा केला. पवित्र शास्त्र सरळपणे हे सांगतेः

विश्वासाने हाबेलाने काइनापेक्षा अधिक चांगला यज्ञ देवाला केला. विश्वासाद्वारे तो नीतिमान मनुष्य आहे अशी त्याची प्रशंसा करण्यात आली, जेव्हा देवाने त्याच्या अर्पणाविषयी चांगले बोलले. (इब्री. 11:4)

परमेश्वर व त्याच्या योजनेमध्ये त्याने भरंवसा ठेवला ह्याकारणाने, हाबेलला क्षमा केली व नीतिमान घोषित केले गेले. हाबेलसाठी हे देवाचे दान होते.

देवाने हाबेलाचे पाप कोकऱ्यावर लादले होते. कोकरा हा हाबेलच्या ठिकाणी मरण पावला होता. कोकऱ्याचे रक्त हे सांडले गेले होते आणि त्याचे शरीर जाळून राख झाले होते.

देवाचा पापा विरोधात नीतिमान क्रोध हा हाबेल ऐवजी कोकऱ्यावर झाला होता. हाबेलाच्या बलिदान केलेल्या कोकऱ्याने देव का प्रसन्न झाला होता? कारण ते येणाऱ्या तारणाऱ्याकडे इशारा करीत होते जो एके दिवशी जगाच्या पापाचे कर्ज भरणार होता.

देवाच्या योजनेमधील त्याच्या विश्वासाच्या कारणामुळे हाबेल आता देवाबरोबर योग्य संबंधात होता. नंतर, जेव्हा हाबेल मरण पावला, देवापासून कायमचे वेगळे होण्याऐवजी, तो देवाबरोबर असणार, जो तेव्हा त्याचा मित्र होता. पापार्पणाच्या नियमाने पाप व मृत्युच्या नियमावर विजय मिळविला होता.

काइन देवाकडे त्याच्या विनंतीसह गेला, परंतु त्याने देवाच्या नियमाकडे दुर्लक्ष केले होते जे म्हणते की पापास मृत्यू द्वारे दंडित केले पाहिजे. काइन धार्मिक होता, परंतु तो देवाबरोबर योग्य संबंधात नव्हता. पाप व मृत्यूचा नियम अजूनही त्याच्यावर अंधाऱ्या ढगासारखा घोंघावत होता. जर त्याने देव व त्याच्या योजनेवर भरंवसा ठेवला नाही, तर देव हा त्याच मित्र म्हणून तो कधीही ओळखणार नाही. तो देवाला त्याचा न्यायाधीश म्हणून तोंड देईल.

काही लोक काइनाचे समर्थन करण्याचा प्रयत्न करतात हे म्हणण्याद्वारे, “काइन हा शेतकरी होता. त्याच्याजवळ जे होते ते त्याने आणले होते.” परंतु जे त्याच्याकडे होते ते देवाला नाही पाहिजे होते. काइन त्याचे काही पीक हाबेल कडून एखादा कोकरा विकत घेण्यासाठी व्यापार करू शकला असता, किंवा तो त्याचे हात हाबेलच्या कोकऱ्यावर ठेवून आणि एकाच वेदीवर उपासना करू शकला असता.

काइनाने काय करावयास पाहिजे होते?

त्याने पश्चाताप करून व योग्य अर्पणासह देवाकडे यावयास पाहिजे होते काय?





दृश्य 24

# पहिला खून

परमेश्वराने काइनाच्या अर्पणाचा अस्वीकार केला. तरीही देवाने त्यावर प्रीति केली आणि पश्चाताप करावा म्हणून त्यास विनंती केली.

पश्चाताप करणे याचा अर्थ काय?

समजा तुम्हांला एका निश्चित नगरास जावयाचे आहे. रेल्वेमध्ये बसल्यावर, तुम्हाला समजते की तुम्ही चुकीच्या रेल्वेमध्ये बसला आहात. तुम्ही काय कराल? तुम्ही तुमची चूक मान्य करता, रेल्वे मधून उतरता, आणि योग्य रेल्वेमध्ये बसता. हाच काय तो पश्चाताप करण्याचा  अर्थ आहे.

पश्चाताप करणे याचा अर्थ *तुमचे मन बदलणे; जे चूक आहे त्याकडून वळणे व जे बरोबर आहे त्याच्या अधीन होणे.* देवा समोर पश्चाताप करणे याचा अर्थ हा नाही की माझ्या पापांसाठी मी स्वतःला दंडित केले पाहिजे. याचा अर्थ हा आहे की मी माझ्या पापाला जसे परमेश्वर त्यास पाहतो तसे पाहिले पाहिजे.

देवाला पाहिजे होते की काइनाने पश्चाताप करावा- त्याच्या स्वतःच्या मार्गावर भरंवसा करणे थांबवावे आणि देवाच्या मार्गावर भरंवसा करावा व त्यानुसार चालावे.

> म्हणून काइन खूप संतापला, आणि त्याचे तोंड उतरले.
>
> तेव्हा परमेश्वर काइनास म्हणाला, “तूं का संतापलास? आणि तुझे तोंड का उतरले? तूं बरे केले तर तुझी मुद्रा प्रसन्न होणार नाही काय? पण तूं बरे केले नाही तर दाराशी पाप टपूनच आहे; त्याचा रोख तुजवर आहे. याकरिता तूं त्यास दाबात ठेव.” (उत्पत्ति 4:5-7)

काइन अतिशय गर्विष्ठ होता की पश्चाताप करावा. *त्याच्या भावा द्वारे त्यास लाजविले गेले होते! तो त्याच्या स्वतःच्या मार्गाने ह्या लज्जेपासून मुक्त होण्याचा व पुन्हा सन्मान स्थापन करणार होता!*

आता काइनाने त्याचा भाऊ हाबेलला म्हटले, “चल आपण बाहेर शेतात जाऊ.” आणि जेव्हा ते शेतात होते, काइनाने त्याचा भाऊ हाबेलवर आक्रमण केले आणि त्यास जिवंत मारले.

> मग परमेश्वर काइनास म्हणाला, “‘तुझा भाऊ हाबेल कोठे आहे?”
>
> “मला ठाऊक नाही,” “मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे?”
>
> परमेश्वर म्हणाला, “तूं हे काय केले? ऐक! तुझ्या भावाचे रक्त भूमीतून मजकडे ओरड करीत आहे.” (उत्पत्ति 4:8-10)

हाबेलाचा जीव व आत्मा हे परमेश्वराकडे गेले होते, परंतु त्याचे शरीर हे मातीला मिळणार होते भविष्याच्या त्या दिवसापर्यंत जेव्हा परमेश्वर  त्या मातीला एका गौरवी शरीरामध्ये परिवर्तीत करेल की सार्वकालिकतेसाठी योग्य असे व्हावे.

काइन साठी, देवाने पश्चाताप करण्याची आणखी एक संधी दिली परंतु त्याने नकार दिला. तेव्हा काइन परमेश्वराच्या सान्निध्यापासून निघून गेला. (उत्पत्त 4:16)

उद्धटपणा व गर्वाच्या आत्म्यामध्ये, काइन पूर्व दिशेला गेला आणि तेथे त्याने एक नगर बांधले. तो व त्याच्या पत्नीला अनेक लेकरे झाली. त्यांच्या अनेक पिढ्यांच्या वडील पुत्रांनी धातूचे प्रथम हत्यारे व संगीत वाद्य बनविले होते.

काइनाचे वंशज हे फार बुद्धिमान होते, परंतु त्यांना परमेश्वराची ओळख नव्हती.





## दृश्य 25
# धीर व न्याय

आदामाने प्रथम पाप केल्याच्या दहा पिढ्यानंतर, देवाने मानवी कुटुंबावर ही दुःखद वार्ता दिलीः

पृथ्वीवर मानवांची दुष्टाई फार आहे आणि .....त्यांच्या मनातील येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना केवळ एकसारख्या वाईट असतात. (उत्पत्ति 6:5)

परंतु पृथ्वीवरील एक कुटुंब अजूनही देवावर भरंवसा ठेवून होते.

> नोहाने देवाच्या दृष्टीसमोर कृपा प्राप्त केली होती.
>
> म्हणून देवाने नोहाला म्हटले, "सर्व प्राण्यांचा अंत करण्याचे माझ्या मनात आले आहे, कारण त्यांच्यामुळे पृथ्वीवर जाचजुलूम माजला आहे. पाहा, मी पृथ्वीसह त्यांचा नाश करीन. तूं आपल्यासाठी गोफेर लाकडाचे तारू कर; त्या तारवांत कोठड्या कर आणि त्यास आतून व बाहेरून डांबर लाव. तारू करावयाचे ते असे....." (उत्पत्ति 6:8, 13-15)

अत्यंत मोठी जागा असलेले हे तीन-मजली तारू, फुटबॉल च्या मैदानाच्या दीड पट मोठे, यांस पुष्कळ खोल्या असतील की प्रत्येक प्राण्यांच्या जोडया त्यात मावतील आणि प्राण्यांची सात जोडपे पापार्पणासाठी. तारवास हवा येण्याची पद्धत असेन आणि एक मोठा दरवाजा असेन.

एक संपूर्ण शतकभर, नोहाने त्याची पत्नी, त्याचे तीन पुत्र व त्यांच्या पत्नी सह एकत्र मिळून तारू बनविले. जेव्हा तो काम करीत होता, नोहाने जगाला देवाच्या येणाऱ्या न्यायाचा इशारा दिला, परंतु लोकांनी केवळ त्याची निंदा केली.

शेवटी तारू हे पूर्ण बनविले गेले होते. नोहाच्या कुटुंबाने त्यात खूप अन्नपुरवठा साठवून ठेवला होता. देवाने प्राण्यांना, सरपटणारे जीव, कीटक व पक्ष्यांना आणले. काय ते दृश्य असेन जेव्हा त्यांनी तारवात प्रवेश केला आणि त्यास त्यातील हजारो विभागामध्ये व्यवस्थित ठेवले असेन!

नोहा आणि त्याचे कुटुंब सुद्धा त्यात गेले. सुरक्षेच्या ठिकाणी इतर कोणी आले होते काय? नाही. म्हणून देवाने दरवाजा बंद केला. क्रोधी ढगाने विश्वा भोवती गराडा घातला, विजा चमकू लागल्या, आणि मेघगर्जना झाल्या.

> त्यादिवशी महाजलाशयाचे सर्व झरे फुटले आणि आकाशाची दारे उघडली. चाळीस दिवस व चाळीस रात्री पृथ्वीवर पावसाने झोड उठविली. (उत्पत्ति 7:11-12)

इतिहासातील ही सर्वात वाईट नैसर्गिक आपत्ती होती. आठ जीव जे तारवात आश्रयास होते ते सोडले, तर सर्व मानवजातीचा नाश झाला. गर्विष्ठ, अविश्वासू जगाने सत्य फार उशिरा शिकले.

भूगर्भज्ञान व जीवाश्म नोंद पवित्र शास्त्राच्या नोंदीस मानते. सहारा ते हिमालय, पाण्यातील जीवाश्म हे जगाच्या सर्वात मोठया जंगलात व पर्वतांवर उकरून काढले जाऊ शकतात.

त्याच्या दयेमध्ये परमेश्वर सहनशील आहे, परंतु त्याच्या न्यायामध्ये तो पापाचा न्याय करेल.





# दृश्य 26
# एक नवीन सुरुवात

मग नोहा व त्याचे कुटुंब, आणि तारवातील प्राण्यांचे काय झाले? देवाच्या न्यायापासून ते वाचविले गेले.

> देवाने नोहा व तारवात त्याच्याबरोबर असलेले वनपशु व ग्रामपशु या सर्वांची आठवण केली; देवाने पृथ्वीवर वारा वाहविला तेव्हा पाणी ओसरू लागले. (उत्पत्ति 8:1)

विशाल तारू वाहवत चालले होते, शेवटी ते अरारात पर्वत, पूर्वीय तुर्कस्थानात एक विस्तीर्ण दोन-टोके असलेल्या पर्वता वर टेकले.

तीन वेळा नोहाने एक कबुतर पाठविले हे पाहण्यास की त्यास कोरडी जमीन मिळू शकते काय. पहिल्या वेळी कबुतर तसेच परत आले. दुसऱ्या वेळी कबुतर जेव्हा नोहाकडे परत आले तेव्हा त्याच्या चोच मध्ये जैतुनाचे पान होते. तिसऱ्या वेळी कबुतर परत आले नाही. त्यास घर मिळाले होते! नोहाने ओळखले की ही वेळ आहे की तारवातून बाहेर यावे. जलप्रलय सुरु होऊन संपूर्ण एक वर्ष होऊन गेले होते.

नोहा व त्याचे कुटुंब व प्राणी तारवातून बाहेर आल्यावर सर्वात प्रथम कोणती गोष्ट केली हे तुम्हाला ठाऊक आहे काय?

> नंतर नोहाने परमेश्वरासाठी वेदी बांधिली आणि सर्व शुद्ध पशु व सर्व शुद्ध पक्षी यांतले काही घेऊन त्या वेदीवर त्यांचे होमार्पण केले. परमेश्वराने त्याचा सुवास घेतला.....(उत्पत्ति 8:20-21)

देवाचा न्याय व दया ही बदलली नाहीत. पापा साठी अजूनही मृत्यूची भरपाई लागते. त्यामुळेच नोहाने निष्पाप जीवांचे रक्त वाहिले आणि त्यांची शरीरे वेदीवर जाळली, ज्यांस स्वर्ग व पृथ्वीच्यामध्ये, परमेश्वर व मनुष्याच्यामध्ये धरले होते. अशी अर्पणे पापरहित मशीहाकडे इशारा करते जो एके दिवशी पृथ्वीवर येईल की पापासाठी खरी भरपाई पुरवेल.

पुढे, देवाने नोहा व त्याच्या कुटुंबाला एक आज्ञा दिली:

> “फलद्रूप व्हा, बहुगुणीत व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका.” (उत्पत्ति 9:1)

परमेश्वर देवाने पृथ्वी ग्रहासह एक करार सुद्धा केला:

> “मी मेघांत धनुष्य ठेविले आहे, ते पृथ्वीच्या व माझ्यामधल्या कराराचे चिन्ह होईल. .......यापुढे सर्व देहधाऱ्यांचा नाश करील असा जलप्रलय होणार नाही.” (उत्पत्ति 9:13, 15)

त्याच्या कराराचे एक चिन्ह, देवाने एक वैभवशाली धनुष्य उघडे केले जे आकाशातील ढगावर दिसत होते. देवाने अभिवचन दिले की येथून पुढे तो आता कधीही जागतिक जलप्रलय पाठविणार नाही.

धनुष्य आपल्याला आठवण देते की, दंडित करावे किंवा संरक्षण दयावे काहीही असो, परमेश्वर त्याचे अभिवचन नेहमीच पाळतो.

नेहमीच.





# दृश्य 27
# गर्वाचा बुरुज

जरी  एका नवीन सुरुवातीसह आशीर्वादित केले होते, तरी काही थोडया पिढ्यांनंतर अधिकतर लोक परमेश्वरापासून मागे वळले की त्यांच्या स्वतःच्या मार्गाने जावे. उदाहरणार्थ, देवाने मानवाला आज्ञा दिली बहुगुणीत व्हा आणि "पृथ्वीला भरून टाका" (उत्पत्ति 1:28; 9:1). तर मनुष्याने काय केले?

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते.

> आता संपूर्ण जगाची एक भाषा व एकच बोली होती.
>
> जेव्हा मनुष्य पूर्वेकडे गेला, तेव्हा त्यांस शिनार देशांत [आधुनिक-इराक] एक मैदान लागले आणि ते तेथे स्थिर झाले. ते एकमेकांस म्हणाले, "चला, आपण विटा करून पक्क्या भाजू."
>
> त्यांनी दगडांऐवजी विटा आणि चुन्याऐवजी डांबर वापरले.
>
> मग ते म्हणाले, "चला, आपणांसाठी एक नगर आणि गगनचुंबित शिखराचा एक बुरुज बांधू; आणि आपले नांव करू म्हणजे सर्व पृथ्वीच्या पाठीवर आपली पांगापांग होणार नाही." (उत्पत्ति 11:1-4)

परमेश्वराच्या महान नांवाची स्तुति करण्याऐवजी, ह्या नगरांस बांधणाऱ्यास पाहिजे होते की लोकांनी त्यांची स्तुति करावी. सैतानाप्रमाणे, ते गर्व व बंडखोरीच्या आत्म्या द्वारे नियंत्रित केले गेले होते.

"एक बुरुज जो स्वर्गाकडे पोहचले" तो बांधावा हे पाहिजे होते त्याद्वारे, ते आजच्या धार्मिक लोकांसारखे होते ज्यांना आशा होती की त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नांनी स्वर्गाकडे पोहोचावे. काइना प्रमाणे, हे लोक धार्मिक होते, परंतु त्यांनी क्षमा व नीतिमत्वाच्या देवाच्या मार्गाकडे दुर्लक्ष केले होते. त्यांनी परमेश्वर व त्याच्या योजनेवर भरंवसा ठेवला नाही.

म्हणून परमेश्वर देवाने म्हटले,

> "तर चला, आपण खाली जाऊन यांच्या भाषेचा घोटाळा करू म्हणजे यांस एकमेकांची भाषा समजावयाची नाही.
>
> अशा प्रकारे, परमेश्वराने तेथून त्यांस सर्व पृथ्वीच्या पाठीवर पांगविले; ह्याप्रमाणे त्यांचे नगर बांधावयाचे राहिले. म्हणून त्या नगराचे नांव बाबेल असे पडले, कारण त्या ठिकाणी परमेश्वराने सगळ्या पृथ्वीच्या भाषेचा घोटाळा करून तेथून त्यांस सर्व पृथ्वीच्या पाठीवर पांगविले." (उत्पत्ति 11:7-9)

प्रत्येक कुटुंब किंवा वंशाला वेगळी भाषा देण्याद्वारे, परमेश्वराने त्यांचा बांधकाम प्रकल्प थांबविला. लोकांकडे काही निवड नव्हती परंतु बाबेल कडून निघून जावे आणि पृथ्वी व्यापून टाकावी, जसे देवाने आज्ञा दिली होती.

लोकांनी त्यांचा बुरुज पूर्ण केला नाही, परंतु देवाची योजना ही नियोजित कार्यक्रमाप्रमाणे होत होती.





## दृश्य 28

# देव अब्राहामाला बोलावितो

संदेष्टा नोहाच्या वेळेपासून दहा पीढी होऊन गेल्या होत्या. सैतानास राष्ट्रांवर चांगली मजबूत पकड होती, किंवा तसे दिसत होते.

परमेश्वरावर भरंवसा ठेवण्याऐवजी, लोकांनी त्यांच्या धर्मावर भरंवसा ठेविला. काही राष्ट्रे ज्याने सूर्य निर्माण केला त्याच्याऐवजी सूर्याची उपासना करीत होते. इतर चंद्रा समोर लोटांगण घालत होते.

ते वर्ष जे जवळजवळ ख्रिस्तपूर्व 1925 होते.

अरब देशाच्या उत्तरीय पूर्वेमध्ये एक वृद्ध माणूस ज्याचे नांव अब्राम होते तो राहत होता. नंतर देवाने त्याचे नांव अब्राहाम असे बदलले, याचा अर्थ असंख्य लोकांचा पिता.

अब्राहाम आता 75 वयाचा झाला होता. सारा, त्याची पत्नी, 65 वयाची होती आणि त्यांना मुलबाळ नव्हते. त्यांचे आई-वडील व शेजारी हे मूर्तिपूजक होते, निर्माणकर्त्या ऐवजी निर्मित गोष्टींची उपासना करीत होते.

एके दिवशी परमेश्वर अब्राहामाला म्हणाला,

> "तूं आपला देश, आपले नातेवाईक व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवीन त्या देशांत जा.
>
> "मी तुला आशीर्वाद देईन, तुझे नांव मोठे करीन; तूं आशीर्वादित होशील; तुझे जे अभीष्ट चिंतितील त्यांचे मी अभीष्ट करीन; तुझे जे अनिष्ट चिंतितील त्यांचे मी अनिष्ट करीन; तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील." (उत्पत्ति 12:1-3)

परमेश्वराला पाहिजे होते की अब्राहामा बरोबर एक करार करावा. जर तो त्याच्या पित्याच्या कुटुंबातून निघून जाईल आणि अज्ञात देशात जाईल, तर मग परमेश्वर त्याच्याबरोबर दोन मोठया गोष्टी करेलः

1. देव अब्राहामाला महान राष्ट्रांचा पिता करेन.
2. त्या नवीन राष्ट्रांद्वारे, देव प्रत्येक राष्ट्रातील लोकांना आशीर्वादित करेल.

जर अब्राहामाने परमेश्वरावर भरंवसा ठेवणे व त्याच्या मागे चालणे पाळले, तर मग तो राष्ट्रांचा पिता होईल ज्यातून संदेष्ट्ये, पवित्र शास्त्र, आणि जगाचा तारणारा येईल.


अब्राहामाने काय केले?

> अब्राहामाला पाचारण झाल्यावर जे ठिकाण त्याला वतनादाखल मिळणार होते तिकडे "निघून जाण्यास" तो विश्वासाने मान्य झाला; आणि आपण कोठे जातो हे ठाऊक नसतांही "तो निघून गेला." (इब्री 11:8)

अब्राहाम व त्याच्या पत्नीला त्यांच्या नातेवाईकांना सोडणे आणि त्यांच्या कौटुंबिक धर्माकडे पाठ करणे हे सोपे नव्हते. तरीही त्यांनी त्यांच्या समाजाची टीका सहन करण्याचे निवडले जेणेकरून एका सत्य देवाच्या मागे चालावे.

देवावर भरंवसा ठेवणे व त्याची आज्ञा पाळणे हे नेहमीच सोपे नाही, परंतु हे नेहमीच उत्तम आहे.





# दृश्य 29
# अभिवचन पाळणारा

अब्राहाम व त्याची पत्नी हे वयोवृद्ध होते व त्यांना मुलबाळ नव्हते. तरीही परमेश्वराने अभिवचन दिले होते की अब्राहामास महान राष्ट्रांचा पिता करेन.

देवाच्या "अशक्य" अभिवचन प्रति अब्राहामाने कशी प्रतिक्रिया दिली?

> अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला, आणि हे त्यास नीतिमत्व असे गणण्यात आले, आणि त्यास देवाचा मित्र म्हणण्यात आले. (याकोब 2:23; उत्पत्ति 15:6)

आदामाच्या सर्व वंशजांप्रमाणे, अब्राहाम हा एक पापी होता, परंतु हाबेल व नोहा प्रमाणे, अब्राहामाने देवाला पापार्पण केले होते. कारण अब्राहामाने देवावर व त्याच्या अभिवचनावर विश्वास ठेविला, देवाने स्वर्गातील अब्राहामाच्या नोंदीमध्ये त्यास नीतिमत्व असे गणिले, आणि त्यास सार्वकालिक जीवनाचे दान दिले. साराने सुद्धा परमेश्वरावर भरंवसा केला, आणि देवाने तिला सुद्धा नीतिमान असे घोषित केले.

परंतु वाट पाहणे हे फार कठीण आहे.

दहा वर्षे पॅलेस्टाइन देशात ते राहिल्यावर, आशा करून व प्रार्थना करून की सारा गर्भवती होईल, त्यांनी देवाला "साहाय्य" करण्याचा निर्णय घेतला की अब्राहामास एक पुत्र द्यावा ह्या त्याच्या अभिवचनास पूर्ण करावे. स्थानिक रीतीरिवाज पूर्ण करण्याद्वारे, साराने तिची मिसरी दासी हागार अब्राहामास पत्नी म्हणून दिली. त्याने हागार बरोबर सहवास केला आणि ती गर्भवती झाली आणि तिने एका पुत्राला जन्म दिला. त्यांनी त्याचे नांव इश्माएल ठेवले.

जवळजवळ 13 वर्षा नंतर, जेव्हा अब्राहाम 99 वयाचा व सारा 89 वयाची झाली होती, सर्वशक्तिमान देवाने त्यांना पुन्हा दर्शन दिले. त्याने त्यांना सांगितले की त्यांना एक पुत्र होईल व त्यांनी त्याचे नांव इसहाक ठेवावे. परमेश्वराने अब्राहामास हे सुद्धा सांगितले,

> इश्माएलाविषयी म्हणशील तर ........ मी त्याचे कल्याण करीन;........पण पुढल्य वर्षी याच वेळी तुला सारेच्या पोटी इसहाक होईल; त्याच्याशीच मी आपला करार करीन." (उत्पत्ति 17:20-21)

एक वर्षानंतर, साराने इसहाक, जो अभिवचनाचा पुत्र, यास जन्म दिला.

चित्राकडे पाहा. अब्राहाम व त्याची पत्नी रात्री वर आकाशात पाहत आहेत हे तुम्ही पाहता काय? ते परमेश्वराला त्याच्या विश्वासूपणासाठी धन्यवाद देत आहेत. नंतर, हागार व इश्माएलला घालवून देण्यात आले, परंतु त्यांच्यासाठी सुद्धा परमेश्वर अत्यंत चांगला होता.

> देव त्या मुलाचा पाठिराखा झाला व तो रानात लहानाचा मोठा होऊन तिरंदाज झाला. तो पारानाच्या रानांत वस्ती करून राहिला, आणि त्याच्या आईने त्याला मिसर देशातली बायको करून दिली. (उत्पत्ति 21:20-21)

इश्माएल हा शक्तिशाली अरब लोकांचा पिता झाला, ज्यांना देवाने अनेक प्रकारे आशीर्वादित केले होते.

इसहाक विषयी म्हणाल तर, तो घरीच राहिला होता, त्याच्या पित्याचे पशु व कळपांची देखरेख करीत राहिला. कधीकधी इसहाक त्याच्या पित्याला एक स्वस्थ कोकरा निवडण्यासाठी मदत करीत होता, की त्यास त्यांच्या पापासाठी, वेदीवर  जिवंत मारावे, आणि जाळावे.





# दृश्य 30
# सर्वोच्च परीक्षा

देवाने अब्राहाम व त्याच्या पुत्राचा उपयोग करण्याची योजना केली की त्याच्या योजनेच्या काही भविष्यवाण्या आणि दृश्ये जगासमोर ठेवावी की पापी लोकांना पाप व मृत्युपासून सोडवावे. देवाने अब्राहामाच्या विश्वासाची इतकी कठीण  परीक्षा घेण्याची सुद्धा योजना केली की त्यास हे विचारण्याद्वारे की काहीतरी भयानक असे करावे, जोपर्यंत परीक्षा पूर्ण होत नाही तोपर्यंत काहीतरी ज्याचा अर्थ लागत नाही.

त्याच्या जीवनाच्या वयाच्या ह्याक्षणी अब्राहामाला परमेश्वरामध्ये पूर्ण विश्वास होता. अब्राहाम देवाला ओळखत होता. अब्राहामास हे ठाऊक होते की परमेश्वर चांगला व न्यायी आहे. तरीही, अब्राहाम त्याच्यावर भरंवसा ठेवण्यास व त्याची आज्ञा पाळण्यास तयार होईल काय, जरी जेव्हा देव जे करण्यास त्यास सांगत आहे ते चूक असे दिसत आहे?

येथे ती कथा आहे, सरळ पवित्र शास्त्रातूनः

काही वेळा नंतर, देवाने अब्राहामाची परीक्षा घेतली.

तो त्यास म्हणाला, "अब्राहाम!"

"मी येथे आहे," त्याने उत्तर दिले.

मग देव म्हणाला, "तुझा पुत्र, तुझा एकुलता एक प्रिय इसहाक यास घेऊन मोरिया[11] देशांत जा आणि मी तुला सांगेन त्या डोंगरावर त्याचे होमार्पण कर." तेव्हा अब्राहामाने मोठया पहाटेस उठून आपल्या गाढवावर खोगीर घातले, आपल्या बरोबर दोघे सेवक व आपला मुलगा इसहाक यांस घेतले, आणि होमार्पणासाठी लाकडे फोडून घेतली. मग देवाने सांगितलेल्या ठिकाणाकडे तो निघाला.

तिसऱ्या दिवशी अब्राहामाने दृष्टि वर करून ती जागा दुरून पाहिली. अब्राहाम आपल्या सेवकांस म्हणाला, "येथे गाढवाजवळ थांबा, मुलगा व मी पलीकडे जातो आणि देवाची उपासना करून तुमच्याकडे परत येतो."

तेव्हा अब्राहामाने होमार्पणासाठी लाकडे घेऊन आपला पुत्र इसहाक याच्या पाठीवर ठेविली आणि आपल्या हाती विस्तव व सुरा घेतला, आणि ते दोघे बरोबर चालले.

तेव्हा इसहाकाने आपला बाप अब्राहाम यास म्हटले, "बाबा!"

तो म्हणाला, "काय म्हणतोस बाळा?"

"त्याने म्हटले, पाहा, विस्तव व लाकडे आहेत पण होमार्पणासाठी कोकरू कोठे आहे?"

त्यास अब्राहाम म्हणाला, बाळा, "देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल."

आणि ते दोघे बरोबर चालले. (उत्पत्ति 22:1-8)





## दृश्य 31
# दोषी पुत्र

बलिदान करण्याच्या डोंगरावर तो व त्याचा पुत्र चढण्याअगोदर अब्राहामाने त्याच्या सेवकांना काय सांगितले हे तुम्ही ऐकले काय?

“मुलगा व मी पलीकडे जातो आणि देवाची उपासना करून तुमच्याकडे परत येतो.”

अब्राहामाचा पुत्र परत कसा येऊ शकतो जर त्यास जिवंत मारण्यात येईल व त्याचे शरीर जाळण्यात येईल? पवित्र शास्त्र म्हणते,

अब्राहामाने विचार केला की परमेश्वर मृत्युमधून उठवू शकतो. (इब्री. 11:19)

देवाने अभिवचन दिले होते की इसहाकला नवीन राष्ट्रांचा पिता असे करेन (ज्याद्वारे अभिवचन असलेला तारणारा हा येणार आहे). देव खोटे बोलत नाही. अब्राहामासाठी, हे पुरेसे होते.

त्यादरम्यान, इसहाक काय विचार करीत होता? त्यास हे ठाऊक होते की तो एक पापी आहे आणि त्याच्या पापांसाठी मरण्यास तो पात्र आहे. *त्यास हे सुद्धा ठाऊक होते की परमेश्वर बदली स्वीकारेन. परंतु आज ते बलिदान करण्याच्या ठिकाणी एडका किंवा एक कोकरा शिवाय जात होते?* याचा काही अर्थ लागत नाही! म्हणून इसहाकने त्याच्या पित्याला म्हटले,

“त्याने म्हटले, पाहा, विस्तव व लाकडे आहेत पण होमार्पणासाठी कोकरू कोठे आहे?”

अब्राहामाने उत्तर दिले, बाळा, “देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल.”

आता चला आपण कथेला सुरु ठेवू.

जेव्हा ते त्या ठिकाणी पोहचले ज्याविषयी देवाने त्यास सांगितले होते, अब्राहामाने तेथे एक वेदी बांधिली आणि त्यावर लाकडे रचली. त्याने त्याचा पुत्र इसहाकला बांधिले आणि त्यास वेदीवर, लाकडांवर ठेविले.

मग त्याने हात लांब केला व सुरा घेतला की त्याच्या पुत्राचा वध करावा.

परंतु परमेश्वराच्या दूताने स्वर्गातून त्यास हाक मारिली, “अब्राहामा! अब्राहामा!”

तो म्हणाला, “काय आज्ञा?”

“तूं मुलावर आपला हात चालवू नको, त्याला काही करू नको; कारण तूं आपल्या मुलास, आपल्या एकुलत्या एका मुलासही माझ्यापासून राखून ठेवले नाही.” (उत्पत्ति 22:9-12)

अब्राहाम व त्याचा पुत्र आनंदित झाले! परंतु आवश्यक अर्पणाविषयी काय?

अब्राहामाने वर दृष्टि केली आणि आपल्यामागे झुडपात शिंगे गुंतलेला एक एडका त्यास दिसला. (उत्पत्ति 22:13)

अब्राहामाच्या पुत्राला मृत्युच्या शिक्षेपासून वाचविण्यात आले.

देवाने एक बदली पुरविला होता!





## दृश्य 32
# चित्रे आणि भविष्यवाण्या

देवाने अब्राहामाच्या दोषी पुत्राला कसे वाचविले? त्याने एक निर्दोष, निष्पाप प्राणी पुरविला की त्याच्या ऐवजी मरावे.

> अब्राहामाने दृष्टि वर केली आणि आपल्यामागे झुडपात शिंगे गुंतलेला एक एडका त्यास दिसला. तो तेथे गेला आणि एडका घेतला आणि त्यास त्याच्या पुत्रा ऐवजी होमार्पण म्हणून बलिदान केले. (उत्पत्ति 22:13)

ह्या सर्व घटना देवाच्या योजनेचे चित्रण करतात की पृथ्वीवर एक पवित्र तारणारा पाठवावे जो पाप व मृत्युच्या नियमाच्या आवश्यकतेस पूर्ण करेल, आणि पृथ्वीवरील प्रत्येक राष्ट्रांच्या पापी लोकांना वाचवेल.

> म्हणून अब्राहामाने त्या जागेस *परमेश्वर पाहून देईल* असे म्हटले. आणि आजपर्यंत असे म्हटले जाते, "*परमेश्वराच्या* गिरीवर पाहून देण्यात येईल." (उत्पत्ति 22:14)

अब्राहामाने डोंगराला परमेश्वराने पाहून दिले आहे याऐवजी परमेश्वर पाहून देईल असे का म्हटले?

देवाने एक खंडणी आत्ताच तेथे पुरविली नव्हती काय?

*परमेश्वर* पाहून देईल असे डोंगराला म्हणण्याद्वारे, संदेष्टा अब्राहाम त्या दिवसाविषयी भविष्य करीत होता, जेव्हा याच डोंगरावर, देव स्वतः रक्तासह एक बलिदान पुरविणार होता इतके महागडे की देव त्यास जगाच्या पापाच्या ऋणासाठी पूर्ण भरपाई असे स्वीकारणार होता, जेणेकरून जो कोणी त्या बलिदानामध्ये विश्वास ठेवतो त्याचा नाश होणार नाही, तर त्यास सार्वकालिक जीवन प्राप्त होईल.

संदेष्टा अब्राहामाने त्या वेदीवर एडका अर्पणा केल्याच्या काही 1,900 वर्षा नंतर, अभिवचन असलेला तारणारा स्वतः ह्या ऐतिहासिक घटनेकडे मागे पाहणार होता व म्हणणार होता,

> "तुमचा बाप अब्राहाम माझा दिवस पाहण्यासाठी उल्लसित झाला; तो त्याने पाहिला व त्याला हर्ष झाला." (योहान 8:56)

जेव्हा एडक्याचा धूर वर स्वर्गाच्या दिशेने गेला, देवाने अब्राहामास भविष्यातील होमार्पणाची झलक दिली जे ह्याच डोंगराच्या कड्यावर बलिदान केले जाणार होते. अचानक अब्राहामाचे त्याच्या पुत्राच्या प्रश्नाला "कोकरू कोठे आहे?" यास उत्तराने खोल अर्थ घेतला.

> बाळा, "देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल." (उत्पत्ति 22:8)

अब्राहाम व त्याच्या पुत्रासाठी, देवाने अजून कोकरा पुरविला नव्हता. त्याने एक एडका पुरविला होता.

कोकरा कोठे होता?

एका योग्य समयी, देव स्वतः त्याचे उत्तर पुरविणार होता.





## दृश्य 33
# विश्वासयोग्य आणि पवित्र देव

परमेश्वराने अब्राहामाला दोन मोठे अभिवचन दिले हे तुम्हाला आठवते काय? देवाने प्रथम म्हटले होतेः

“मी तुजपासून मोठे राष्ट्र निर्माण करीन.” (उत्पत्ति 12:2)

देवाने त्याचे वचन राखले. अब्राहामास इसहाक झाला, इसहाकास याकोब, आणि याकोबास बारा पुत्र झाले ज्यांचे कुटुंब इस्राएलचे बारा वंश झाले. देवाने हे सुद्धा म्हटले होतेः

“तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील.‘” (उत्पत्ति 12:3)

देवाने त्याच्या अभिवचनाचा तो भाग सुद्धा राखीला. ह्या विशेष-आणि नेहमी बंडखोर-राष्ट्राबरोबर कार्य करण्याद्वारे, देवाला पृथ्वीवरील सर्व लोकांना हे दाखवायला पाहिजे होते की तो कशा समान आहे आणि पापी लोक त्याच्याजवळ कसे येऊ शकतात. जेव्हाकेव्हा देवाने ह्या राष्ट्राचे संरक्षण केले, तो तुम्हाला व मला आशीर्वाद देण्यासाठी त्याच्या योजनेचे संरक्षण करीत होता-कारण ह्या राष्ट्राकडूनच संदेष्ट्ये, पवित्र शास्त्र, आणि अभिवचन दिलेला तारणारा येणार होते.

देवाची गुप्त योजना ही पुढे जात होती.

ख्रिस्तपूर्व 1500 च्या आसपास, देवाने मोशे, अब्राहामाचा एक वंशज, यास पाचारण केले की त्याचा संदेष्टा व्हावे. मोशेने बायबलची प्रथम पाच पुस्तके लिहिली. देवाने अब्राहामाच्या तीन मिलियन वंशजांना चारशे वर्षांच्या गुलामगिरीतून सोडवून मार्गदर्शन करण्यासाठी सुद्धा मोशेचा उपयोग केला. देवाने स्वतः त्यांना प्रतिकूल रानातून दिवसा दरम्यान मेघस्तंभा द्वारे सावली पुरवून व रात्रीच्या वेळी अग्निस्तंभा द्वारे प्रकाश पुरविण्याद्वारे मार्गदर्शन केले. त्याच्या पराक्रमी हाता द्वारे, त्याने लाल समुद्रा मधून त्यांच्यासाठी मार्ग उघडा केला होता, त्यांना स्वर्गातून भाकर व खडकातून पाणी दिले आणि त्यांना सीनाय डोंगराकडे आणले होते.

तेथे डोंगराच्या पायथ्याशी देवाने लोकांना म्हटले,

“तुम्ही मला याजकराज्य, पवित्र राष्ट्र व्हाल.” (निर्गम 19:6)

देवाला पाहिजे होते की ह्या राष्ट्राने पवित्र असावेः त्याच्यासाठी वेगळे केलेले आणि त्यांच्याभोवतालच्या राष्ट्रांपासून भिन्न. परंतु पवित्र असणे याचा काय अर्थ आहे हे लोकांनी समजले नाही. त्यांनी स्वतःला एक असहाय्य पापी असे पाहिले नाही. त्यांनी विचार केला की कसेतरी ते देवाची कृपा प्राप्त करू शकतात. पापाच्या विरोधातील त्याच्या भडकणाऱ्या संताप विषयी त्यांना धडा शिकविण्यासाठी, परमेश्वर पृथ्वी-हादरवून सोडणाऱ्या ज्वलनशील अग्नि व तुतारीच्या नाद द्वारे खाली आला.

> सर्व सीनाय पर्वतावर धूर पसरला कारण परमेश्वर अग्नीतून त्याच्यावर उतरला. भट्टीच्या धुरासारखा त्याचा धूर वर चढला व सर्व पर्वत थरथरु लागला. शिंगांचा आवाज अधिकच वाढू लागला, तेव्हा मोशे बोलू लागला आणि देव त्याला आपल्या वाणीने उत्तर देत गेला. (निर्गम 19:18-19)

देवाने आदामाला एक नियम दिला होता.

तो ह्या नवीन राष्ट्रास दहा लवकरच देणार होता.





## दृश्य 34

# दहा आज्ञा

राष्ट्रामधील अधिकतर लोकांनी विचार केला की देवाचे लोक असण्यासाठी ते पुरेसे चांगले आहेत. म्हणून देवाने त्यांना दहा आज्ञा दिल्या, प्रथम सीनाय पर्वतावरून गर्जनेच्या वाणीसह, मग दगडाच्या दोन पाटीवर.

चला आपण दहा आज्ञा वाचू (उजव्या बाजूला, निर्गम 20 मधून संक्षिप्त प्रकारात आहे).

देवाने मोशेला म्हटले की त्यांनी सर्व दहा नियम पूर्णपणे पाळले पाहिजे.

"जो ह्या नियमशास्त्राची वचने मान्य करून तो आचरणात आणीत नाही तो शापित असो." (अनुवाद 27:26)

लोकांनी ह्या दहा आज्ञा ऐकल्यावर त्यांना कसे वाटले म्हणून तुम्ही विचार करता? ते फारच चांगले आहेत असे अजूनही त्यांनी विचार केला असे तुम्हाला वाटते काय? तुमच्याबद्दल काय? देवाच्या परिपूर्ण राज्यात राहण्यासाठी तुम्ही पुरेसे चांगले आहात असे तुम्हाला वाटते काय?

*एक नंबरचा नियम* पुन्हा वाचा. तुम्ही देवाला नेहमीच प्रथम ठेवता काय? जर नाही, तर तुम्ही त्याचे नियम पाळण्यात चुकला आहात. *पाचवा नियम* वाचा. जर तुम्ही कधी तुमचे वडील किंवा आईची आज्ञा मोडली आहे, तर तुम्ही देवासमोर दोषी आहात. आता आठव्या नियमाकडे पाहा. जर तुम्ही कधी काही घेतले आहे जे तुमचे नाही किंवा परीक्षे मध्ये फसवणूक केली आहे, तर तुम्ही नियम मोडला आहात. तुम्ही कधी खोटे बोलले काय? मग तुम्ही *नियम नऊ* चे पालन केलेले नाही. *शेवटची आज्ञा* आपल्याला सांगते की जे इतर कोणाचे आहे त्याची इच्छा करणे सुद्धा चुकीचे आहे. परमेश्वर आपल्या अंतःकरणात पाप पाहतो.

आदाम व हव्वेच्या देवाबरोबरील संबंधात बिघाड करण्यास किती पापे लागली? केवळ एक. देवाचे परिपूर्ण प्रमाण हे बदलले नाही.

जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो, तो सर्वांविषयी दोषी होतो. (याकोब 2:10)

परमेश्वर पवित्र आहे आणि पापाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. मृत डुक्करच्या सडलेल्या शरीरासह घरा मध्ये एकत्र राहण्यास कोणाला आवडेल? तसेच काय ते देवाला आपल्या पापासारखे आहे. जसे घाण वास येत असलेल्या शरीरावर सुगंधित द्रव्य फवारणे हे खोलीला स्वच्छ करू शकणार नाही, तसेच कितीही धार्मिक प्रयत्न आपली अंतःकरणे स्वच्छ करू शकत नाही.

आरशाप्रमाणे जे मला माझ्या तोंडावरील घाण दाखविते, देवाचा नियम माझ्या अंतःकरणातील पाप मला दाखविते. ज्याप्रमाणे आरसा माझे तोंड स्वच्छ करू शकत नाही, तसेच दहा आज्ञा माझे अंतःकरण स्वच्छ करू शकत नाही.

नियमशास्त्र पाळण्याद्वारे कोणीही त्याच्या दृष्टीसमोर नीतिमान असे घोषित केला जाणार नाही; त्याऐवजी, नियमशास्त्रा द्वारे आपण पापा संबंधी अवगत होतो. (रोम. 3:20)

याची पर्वा नाही की आपण किती चांगले आहोत असा आपण विचार करतो, आपण स्वर्गामध्ये देवाबरोबर राहण्यास पुरेसे चांगले नाही.

आपल्याला तारणाऱ्याची गरज आहे.

1. माझ्याखेरीज तुला वेगळे देव नसावेत.
2. आपल्यासाठी कोरीव मूर्ति करू नको....... कारण मी तुझा देव आहे.
3. तुझा देव परमेश्वर ह्याचे नांव व्यर्थ घेऊ नको.
4. शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळ.
5. आपल्या बापाचा व आपल्या आईचा मान राख.
6. तूं खून करू नको.
7. तूं व्यभिचार करू नको.
8. तूं चोरी करू नको
9. आपल्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नको.
10. आपल्या शेजाऱ्याच्या स्त्रीची अभिलाषा धरू नको......किंवा त्याची कोणतीही वस्तू ह्यांचा लोभ धरू नको.



## दृश्य 35
# अधिक चित्रे

दहा आज्ञांनी नवीन राष्ट्रास बरोबर आणि चूकचे एक स्पष्ट प्रमाण दिले. ती एक चांगली गोष्ट होती. परंतु देवाच्या नियमाने वाईट बातमी सुद्धा आणली. त्याने लोकांना दाखविले की ते मोठया संकटात आहेत. त्यांच्या पापांच्या कारणामुळे त्यासर्वांनी मेले पाहिजे आणि देवापासून वेगळे व्हायला पाहिजे.

सुवार्ता ही होती की परमेश्वर तरीही कोकरा, बैल, बकरी आणि कबुतराचे वाहिलेले रक्त त्यांची पापे झाकण्यासाठी स्वीकारणार होता. आणि म्हणून, त्याचदिवशी जेव्हा देवाने गर्जनेसह त्याच्या दहा आज्ञा दिल्या होत्या, देवाने मोशेला म्हटले,

"एक वेदी बनीव.....आणि त्यावर तुमचे होमार्पण बलिदान कर." (निर्गम 20:24)

मोशेने त्याचा हात कोकऱ्याच्या डोक्यावर ठेवला आहे असे तुम्ही पाहता काय? लोक त्यांचे हात कोकऱ्याकडे नेत आहेत हे तुम्ही पाहता काय? कारण त्यांनी परमेश्वर व क्षमा करण्याच्या त्याच्या पद्धतीवर विश्वास ठेवला, त्यांची पापे ही निष्पाप कोकऱ्यावर ठेवण्यात आली. कोकऱ्यास मग वेदीवर जिवंत मारण्यात येईल. पुढे त्या प्राण्याचे शरीर जाळून राख करण्यात येईल. राख लोकांना हे दाखवेल की देवाने त्यांच्या पापाबरोबर काय केले आहे. त्यांना क्षमा केली आहे!

परंतु पापांच्या क्षमेसाठी प्राण्यांचे रक्त अर्पण करण्याची ही पद्धत देवाला प्रत्यक्षात कशाची आवश्यकता आहे त्याचे केवळ एक चित्र होती.

> जुन्या पद्धतीमध्ये बलिदाने ही पुन्हा पुन्हा केली जात होती, वर्षानुवर्षे, परंतु जे उपासनेसाठी येत होते त्यांच्यासाठी एक परिपूर्ण शुद्धता पुरविण्यात ते कधीही समर्थ नव्हते. जर ते परिपूर्ण शुद्धता पुरवू शकले असते, तर बलिदान करणे हे थांबले असते, कारण उपासक एकदाच शुद्ध केले गेले असते, आणि त्यांना दोषी वाटणे हे निघून गेले असते.
>
> परंतु केवळ त्याच्या उलट घडले. ती वर्षाची अर्पणे त्यांना वर्षानुवर्षे त्यांच्या पापांची आठवण देत असे. कारण बैलांच्या व बकऱ्यांच्या रक्ताला हे शक्य नाही की पापे पुसून टाकावी. (इब्री. 10:1-4)

प्राण्यांना देवाच्या स्वरुपात निर्माण केलेले नाही.

कोकऱ्याचे मूल्य हे एका मनुष्याच्या मुल्यासमान नाही. ज्याप्रमाणे तुम्ही एक खेळाची कार एका कार विक्रेत्याकडे नेऊ शकत नाही आणि त्यास एका खऱ्या कार साठी किंमत म्हणून देत नाही, त्याप्रमाणेच कोकऱ्याचे रक्त हे पाप व मृत्युच्या नियमासाठी आवश्यक मोठी किंमत भरू शकले नाही.

एक उत्तम अर्पणाची गरज होती. जेव्हा प्राण्यांचे अर्पण जगाच्या पापाचे कर्ज पुसून टाकू शकले नाही, त्यांनी पापी लोकांना एक जो तसे करू शकतो त्याचे एक चित्र दिले.





## दृश्य 36
# अधिक भविष्यवाण्या

तारणाऱ्यासाठी जेव्हा समय हा निकट आणि निकट आला होता, परमेश्वराने त्याच्या संदेष्ट्यांना सांगितले की त्यांनी ह्या मशीहा-राजाविषयी आणखी अधिक भविष्यवाण्या[12] लिहाव्या. येथे त्या प्राचीन अभिवचना पैकी काही आहेत:

कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल .....
*-संदेष्टा यशया 7:14*

"हे बेथलेहेमा एफ्राथा, ............ तरी तुजमधून एक जण निघेल, तो मजसाठी इस्राएलाचा शास्ता होईल; त्याचा उद्‌भव प्राचीन काळापासून अनादि काळापासून आहे."
*- संदेष्टा मीखा 5:2*

कारण आम्हांसाठी बाळ जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे;......त्यास अद्‌भुत ........समर्थ देव...शांतीचा अधिपती म्हणतील.
*- संदेष्टा यशया 9:6*

पाहा, तुमचा देव ......येईल व तुमचा उद्धार करील. तेव्हा अंधांचे नेत्र उघडतील, बहिऱ्यांचे कान खुले होतील. तेव्हा लंगडा हरिणा प्रमाणे उड्या मारील......
*- संदेष्टा यशया 35:4-6*

वधावयास नेत असलेल्या कोकराप्रमाणे .........
*- संदेष्टा यशया 53:7*

"त्यांनी माझे हातपाय विंधिले आहेत."
*- संदेष्टा दावीद, स्तोत्रसंहिता 22:16*


अभिवचन दिलेला तारणारा येत आहे! परंतु केव्हा?
आणि तो कोण असेल?
ह्या भविष्यवाण्या कशा पूर्ण होतील?



# भाग 2

## राजा त्याची योजना पूर्ण करतो

— नवीन करार —



## दृश्य 37
# राजाची गोष्ट सुरु राहते

राजाच्या पुस्तकाचा पहिला भाग तुम्हाला कसा वाटला?
जुन्या करारा पासून तुम्ही काय शिकला?

करार म्हणजे *समंती किंवा करारपत्र*. नवीन करार वचन देण्याच्या खूप वर्षांपूर्वी, त्याने म्हटले,

"समय येत आहे......जेव्हा मी एक नवा करार करीन." (यिर्मया 31:31)

त्याच्या लोकांबरोबर पहिल्या करारात, देवाने त्यांना त्याची पवित्रता व त्यांचे पापीपण दाखविण्यासाठी अनेक नियम दिले. त्याने येणाऱ्या तारणाऱ्याविषयी अनेक चित्रे आणि भविष्यवाण्या सुद्धा दिल्या. जुन्या करारात संदेष्ट्यांनी भविष्यवाण्या केल्याः मशीहा-राजा येईल. परंतु नवीन करारात आपण वाचतोः मशीहा-राजा हा आला आहे!

नवीन करारात शुभवर्तमान आहे. अरबी भाषे मध्ये त्यास इंजील म्हणतात. दोन्ही शब्दांचा अर्थ सुवार्ता. शुभवर्तमान हे ह्या शब्दांनी सुरु होतेः

अब्राहामाचा पुत्र दावीद ह्याचा पुत्र जो येशू ख्रिस्त, त्याची वंशावळीः अब्राहामाला इसहाक झाला. इसहाकाला याकोब. ....... (मत्तय 1:1-2)

प्रत्येक नांवा द्वारे, पवित्र शास्त्र अब्राहामापासून ते येशू पर्यंतच्या वंशजांच्या अतूट शृंखलेची नोंद करते. परमेश्वर अब्राहामाच्या वंशजा द्वारे तारणारा पाठविण्याद्वारे सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करण्याचे त्याचे अभिवचन राखणार होता.

नवीन करारात चार शुभवर्तमानाची पुस्तके आहेत. चार का? केवळ एकच का नाही? जुन्या करारात, देवाने मोशेला म्हटले,

"दोघा किंवा तिघा साक्षीदारांच्या साक्षीनेच कोणताही आरोप शाबीत व्हावा." (अनुवाद 19:15)

त्याची कथा व संदेश निश्चित करण्यासाठी, देवाने केवळ दोन किंवा तीन, निवडिले नाही, परंतु चार लोकांना की मशीहाच्या जीवनाविषयी चार वेगळे वृत्तांत लिहावे. त्यांची नांवे मत्तय, मार्क, लूक व योहान आहेत. ज्याप्रमाणे चार बातमीदार एकाच घटनेचे वृत्तांत लिहितात, प्रत्येक तीच कथा सांगतो, परंतु चार वेगळ्या दृष्टिकोनापासून.

नवीन करारात एकंदर 27 पुस्तके आहेत. प्रेषितांची कृत्ये पुस्तक, लूक द्वारे लिहिले गेले आहे, मशीहा ने त्याचे सेवाकार्य पूर्ण केल्यावर काय घडले ते सांगते. देवाने पौल (पूर्वीचा एक आतंकवादी), याकोब व यहूदा (येशूचे सावत्र-बंधू), आणि पेत्र व योहान (मासे धरणारे) यांना प्रेरित केले की उरलेला नवीन करार लिहून काढावा. प्रत्येक पुस्तक जे सर्व जण त्यास प्रेम करतात त्यांच्यासाठी राजा व त्याच्या योजनेविषयी अधिक आणि अधिक प्रकट करतात.

येथे आता त्याची उरलेली कथा आहे.





## दृश्य 38
# मरीयेची कथा

आता वेळ झाली होती. हजारो वर्षांच्या तयारी नंतर, अभिवचन दिलेला तारणारा-मशीहा-राजा परमेश्वर जगात आता पाठविणार होता. परंतु तो कोण असेल? आणि तो कसा येईल?

> यहूदा प्रदेशच्या हेरोद राजाच्या समयी....... देवाने नासरेथ, गालील मधील एका नगरास, एक मनुष्य ज्याचे नांव योसेफ, जो दावीदाचा वंशज होता त्याला वाग्दत्त झालेली एक कुमारीकडे देवदूत गब्रीएलला पाठविले. त्या कुमारीचे नांव मरीया होते.
>
> देवदुताने तिला म्हटले, "भिऊ नको, मरीये, तुझ्यावर देवाची कृपा झाली आहे. तूं गरोदर राहशील व तुला पुत्र होईल. त्याचे नांव येशू ठेव. तो थोर होईल व त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील; आणि प्रभु देव त्याला त्याचा पूर्वज दावीद ह्याचे राजासन देईल. आणि तो ..........युगानुयुग राज्य करील, व त्याच्या राज्याचा अंत होणार नाही."
>
> "हे कसे होईल," मरीयेने देवदूताला म्हटले, "कारण मला पुरुष ठाऊक नाही?"
>
> देवदूताने उत्तर दिले, "पवित्र आत्मा तुझ्यावर येईल आणि परात्पराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील; ह्या कारणाने ज्याचा जन्म होईल, त्याला पवित्र, देवाचा पुत्र, असे म्हणतील." (लूक 1:5, 26-27, 30-35)

गब्रीएलने येशूला 'देवाचा पुत्र' का म्हटले?

काही लोक विचार करतात ह्या शब्दाचा अर्थ हा आहे की देवाने एक पत्नी घेतली आणि एका पुत्राला जन्म दिला. तोच काय तो याचा अर्थ नाही. जर तुम्ही आफ्रिका खंडातून असाल, तर काही कदाचित तुम्हांला "आफ्रिकेचा पुत्र" असे म्हणतील. याचा अर्थ हा होतो काय की आफ्रिकाने विवाह केला आणि त्यास एक पुत्र झाला? नाही! याचा अर्थ तुम्ही आफ्रिकेहून येता.

मशीहाला देवाचा पुत्र म्हटले आहे कारण तो देवापासून आला. तो आदामाच्या पापाने-वाईट झालेल्या कुटुंबात आला परंतु त्यापासून त्याचा उगम झाला नाही. तोच प्रारंभापासून शब्द, जीव व देवाचा पुत्र आहे,

> प्रारंभामध्ये शब्द अगोदरपासून अस्तित्वात होता. तो देवाबरोबर होता आणि तो देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. त्याच्या द्वारे सर्व झाले; आणि झाले असे काहींच त्याजवाचून झाले नाही.......
>
> शब्द देही झाला; आणि कृपा व सत्य यांनी परिपूर्ण असून त्याने आम्हांमध्ये वस्ती केली; आम्ही त्याचे गौरव पाहिले ते गौरव पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे असावे असे होते. (योहान 1:1-3, 14)

आदामाने मनाई केलेले फळ खाल्ले त्या दिवशी देवाने दिलेले आश्वासन तुम्हांला आठवते काय? देवाने घोषणा केली की स्त्रीचे वंशज *सर्पाचे डोके ठेचेल.*

आश्वासित वंशज हे आता एका कुमारी मुलीच्या गर्भात होते. सर्पाचे डोके तो कसे ठेचेल हे पाहायचे राहिले आहे.





## दृश्य 39
# योसेफाची कथा

नासरेथ, उत्तरीय पॅलेस्टाईन सीमेवरील एक नगर, मध्ये राहणारा एक सुतार, योसेफशी मरीया विवाहबद्ध झाली होती.

मरीया व योसेफ हे दोघेही यहूदी होते, त्यांची वंशावळी राजा दावीद, आणि अब्राहामापर्यंत जात होती. योसेफ हा एक मुगुटमंडित राजकुमार असू शकला असता, परंतु त्याचा प्रदेश हा रोमन द्वारे शासित होता. रोमन सैनिक रस्त्यावर पहारा ठेवून होते. यहूदी ज्यांच्या राजद्रोहची शंका केली जात होती त्यांना अटक केली जात व वधस्तंभी मारले जात होते. कर वसूल करणारे लोकांना लुटत होते. जीवन हे कटूमय होते.

परंतु योसेफ हा उल्लसित होता. लवकरच तो मरीयेस त्याची पत्नी म्हणून घेणार होता. त्याने एक ठिकाण तयार करण्यासाठी परिश्रम घेतले जेथे ते विवाहा नंतर एकत्र राहू शकणार होते. मग एके दिवशी त्याने एक धक्कादायक बातमी ऐकली:
मरीया गर्भवती आहे.

योसेफला कसे वाटले असा तुम्ही विचार करता? असे दिसते की मरीया ही त्याच्याबरोबर अविश्वासू होती.

योसेफला मनस्ताप झाला, परंतु योग्य गोष्ट करावी असे त्यास पाहिजे होते. म्हणून त्याने मागणी गुपचूप मोडण्याचा निर्णय घेतला, कारण त्याला मरीयेस लज्जित करावयाचे नव्हते.

> जेव्हा त्याने असा विचार केला, तो गाढ झोपी गेला, आणि प्रभूचा दूत त्यास स्वप्नात प्रगट झाला.
>
> "योसेफ, दाविदाच्या पुत्रा," देवदूताने म्हटले, "तू आपली स्त्री मरीया हिचा स्वीकार करावयाला भिऊ नको, कारण तिच्या ठायी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे. आणि तू त्याचे नांव येशू ठेव, कारण तोच आपल्या लोकांस त्यांच्या पापांपासून तारील."
>
> हे सर्व यासाठी झाले की प्रभूने संदेष्ट्यांच्या द्वारे जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे; ते असे की: "पाहा! कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याला इम्मानुएल म्हणतील (या नांवाचा अर्थ, आम्हांबरोबर देव)." (मत्तय 1:20-23)

योसेफाचा शोक आनंदात बदलला. *काय हा सन्मान! मरीया ही अभिवचन दिलेल्या मशीहाची आई होणार! आणि तो, योसेफ, हा बाळाचा कायदेशीर पालक होणार!*

पवित्र मशीहाला एक मानवी आई असणार, परंतु मानवी पिता असणार नाही. त्याचे नांव हे येशू असेल, या नांवाचा अर्थ *प्रभु तारण करतो* किंवा सरळपणे, तारणारा.

> झोपेतून उठल्यावर योसेफाने त्याला प्रभूच्या दूताने आज्ञा दिल्याप्रमाणे केले; त्याने आपल्या स्त्रीचा स्वीकार केला तरी ती पुत्र प्रसवे तोपर्यंत त्याची व तिची ओळख झाली नव्हती; त्याने त्याचे नांव येशू ठेविले. (मत्तय 1:24-25)

ह्या सर्व गोष्टीमध्ये देवाचा हात होता.





दृश्य 40

# आगमन

सातशे वर्षांपूर्वी, संदेष्टा मीखाने बेथलहेम, जे राजा दाविदाचे प्राचीन नगर होते त्यामध्ये मशीहा-राजाचा जन्म होईल याचे भाकीत केले होते.

परंतु येथे एक समस्या होती. मरीया व योसेफ हे नासरेथमध्ये राहत होते, उत्तरेकडे तीन-दिवसांच्या प्रवास अंतरापर्यंत. पवित्र शास्त्र हे कसे पूर्ण होईल?

देवाला सर्व काही नियंत्रणात होते.

मरीयेने बाळास जन्म देण्यासाठी जेव्हा वेळ जवळ आली होती, रोमन सम्राट कैसर औगुस्तने आदेश जारी केला की साम्राज्यातील सर्व प्रजेने त्यांच्या पूर्वजांच्या नगरास एकदा जावे की कर भरण्यासाठी पंजीकृत करून यावे. म्हणून योसेफ व पूर्णपणे-गर्भवती मरीया यांनी नासरेथ ते बेथलहेमला प्रवास केला.

> जेव्हा ते तेथे होते, बाळाचा जन्म होण्याची वेळ आली, आणि तिने तिच्या प्रथम बाळाला, एक पुत्राला जन्म दिला.
>
> तिने त्याला बाळंत्याने गुंडाळून गव्हाणीत निजविले, कारण त्यांस उतारशाळेत जागा नव्हती. (लूक 2:7)

तेथे बेथलहेममध्ये, थकलेल्या प्रवाश्यांमुळे अत्यंत गजबज झाली होती (नगरात कर नोंदणीसाठी), तेथे *स्त्रीकडून अभिवचन* असलेल्या वंशजाचा जन्म झाला, शुभवर्तमान त्या घटनेची नोंद अचूकपणे करतेः

> ती आपला प्रथमपुत्र प्रसवली. (लूक 2:7)

आईच्या बाजूने, बाळ हे मरीयेचा नवीन जन्मलेला पुत्र होता, परंतु त्याच्या पित्याच्या बाजूने, तो देवाचा सार्वकालिक पुत्र होता. तोच शब्द ज्याद्वारे देवाने जग निर्माण केले, तीच वाणी अग्निमय सीनाय पर्वतावरून गर्जली होती ती आता बाळाच्या हळुवार रडण्याने ऐकली जाऊ शकत होती.

आणि तो कोठे जन्मला?

राजवाड्यात नाही, दवाखान्यात नाही, एखाद्या उतारशाळेत सुद्धा नाही. स्वर्गाकडील राजा हा तेथे जन्मला जेथे लहान कोकरे जन्म घेतात-गोठयामध्ये, चारा ठेवण्याची कुंडी त्याचा बिछाना होता.


हा देवाच्या योजनेचा सर्व भाग होता.

> आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हांला माहित आहे; तो धनवान असता तुम्हांकरिता दरिद्री झाला, यासाठी की त्याच्या दारिद्र्याने तुम्ही धनवान व्हावे. (2 करिंथ 8:9)

परंतु त्याच्या पुत्राच्या आगमनाच्या सन्मानासाठी काही प्रकारचा उत्सव परमेश्वर आयोजित करू शकत नव्हता काय?

तो करू शकला असता.





# दृश्य 41
# मेंढपाळांची कथा

मशीहाच्या पृथ्वीवर येण्याची बातमी देवाने प्रथम कोणाला ओळख करून दिली? सम्राटास काय? श्रीमंत आणि प्रसिद्ध जणांस काय? धार्मिक पुढाऱ्यांस काय?

नाही.

रोमांचक बातमी प्रथम ज्यांनी प्राप्त केली ते गरीब मेंढपाळ होते, पुरुष जे कोकरे पालन करीत होते की यरुशलेममध्ये मंदिराच्या वेदीवर बलिदान करावेत.

> शेतामध्ये राहणारे ते मेंढपाळ होते, रात्रीच्या वेळी त्यांच्या कळपांवर लक्ष ठेवून होते. प्रभूचा दूत त्यांना प्रगट झाला, आणि परमेश्वराचे तेज त्यांच्याभोवती प्रकाशले, आणि ते भयभीत झाले.
>
> तेव्हा देवदूत त्यांस म्हणाला, "भिऊ नका; कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांस सांगतो; ती ही की तुम्हांसाठी आज दाविदाच्या गांवात तारणारा जन्मला आहे, तो ख्रिस्त[13] प्रभु आहे; आणि तुम्हांस खूण हीच की बाळंत्याने गुंडाळलेले व गव्हाणीत निजविलेले असे बालक तुम्हांस आढळेल."
>
> इतक्यात अकस्मात स्वर्गातील सैन्याचा समुदाय त्या देवदूताजवळ प्रगट झाला; ते देवाची स्तुति करीत म्हणाले, "उर्ध्वलोकी देवाला गौरव, आणि पृथ्वीवर मनुष्यांत शांति; त्यांजवर त्याचा प्रसाद झाला आहे!"
>
> मग असे झाले की देवदूत त्यांजपासून स्वर्गास गेले, तेव्हा मेंढपाळ एकमेकांस म्हणाले, "चला, आपण बेथलहेमापर्यंत जाऊ, व झालेली जी ही गोष्ट प्रभूने आपल्याला कळविली ती पाहू."
>
> तेव्हा ते घाईघाईने गेले तो मरीया, योसेफ व गव्हाणीत निजविलेले बालक ही त्यांस आढळली.
>
> त्यांनी त्यांस पाहिल्यावर त्या बालकाविषयी देवदूताने जी गोष्ट त्यांस सांगितली होती ती त्यांनी कळविली. मग सर्व ऐकणाऱ्यांनी त्या मेंढपाळांनी सांगितलेल्या गोष्टींविषयी आश्चर्य केले. (लूक 2:8-18)

काय ती गोष्ट जी मेंढपाळांना सांगावयाची होती!

*तारणारा जन्मला आहे! आम्ही त्यांस पाहिले आहे! आम्ही त्यांस स्पर्श केला! देवदूतांनी आम्हांला सांगितले की तो ख्रिस्त प्रभु आहे! देवदूतांच्या सैन्याने आकाश भरून गेले होते! रात्र ही दिवसाप्रमाणे होती! मशीहा हा आला आहे! तो येथे आहे! तो येथे आहे!*

काही लोकांनी मेंढपाळांच्या संदेशावर विश्वास ठेवला. अधिकतर लोकांनी ठेवला नाही. परंतु विश्वास ठेवा किंवा ठेवू नका, राजा, ज्याच्या जन्मा द्वारे जगाचा इतिहास दोन[14] विभागात वेगळा झाला होता, जो आता मानवी वंशात मिळाला होता.

> मग सुंतेचा आठवा दिवस आल्यावर त्याचे नांव येशू ठेविले; हे तर तो उदरात संभवण्यापूर्वीच देवदूताने ठेविले होते. (लूक 2:21)





# दृश्य 42
# मागी लोकांची कथा

गव्हाणीत येशूचा जन्म झाल्यावर, योसेफाने त्याच्या कुटुंबासाठी राहण्याची योग्य व्यवस्था केली.

एके दिवशी काही उत्साही मागी (ज्ञानी लोक जे ताऱ्यांचा अभ्यास करतात) यरुशलेमेत आले. एका विशेष ताऱ्या द्वारे मार्गदर्शित, ही मनुष्ये दूरवरील पारस देशाहून नवीन जन्मलेल्या राजाच्या शोधात आली होती.


ह्या ज्ञानी मनुष्यांना एक प्रश्न व एक उद्देश होताः

> "यहूद्यांचा राजा जन्मला तो कोठे आहे? कारण आम्ही पूर्व दिशेस त्याचा तारा पाहून त्याला नमन करावयास आलो अहो."
>
> हे ऐकून हेरोद राजा व त्यासहित सर्व यरुशलेम ही घाबरली. आणि त्याने लोकांचे सर्व .........व शास्त्री यांस जमवून विचारिले की, ख्रिस्ताचा जन्म कोठे व्हावा.
>
> ते त्याला म्हणाले, "यहूदीयातील बेथलहेमात"; कारण संदेष्ट्यांच्या द्वारे असे लिहिले आहे....'तेव्हा हेरोदाने मागी लोकांस गुप्तपणे बोलावून ......................घेतला, आणि त्यांस बेथलहेमास पाठविताना म्हटले, "तुम्ही जाऊन त्या बालकाविषयी बारकाईने शोध करा; व शोध लागल्यावर मला कळवा, म्हणजे मीही येऊन त्याला नमन करीन."
>
> राजाचे हे बोलणे ऐकून ते निघाले, आणि पाहा, जो तारा त्यांनी पूर्वदिशेस पाहिला होता तो, जेथे बालक होता, त्या जागेच्या वर जाऊन थांबेपर्यंत त्यांच्यापुढे चालला.
>
> तो तारा पाहून त्यांस अतिशय आनंद झाला.
>
> घरांत जाऊन त्यांनी बालकांस त्याची आई मरीया हिच्याजवळ पाहिले, पाया पडून त्याला नमन केले आणि आपल्या द्रव्यांच्या थैल्या सोडून सोने, ऊद व गंधरस ही दाने त्याला अर्पिली.
>
> मग हेरोदाकडे परत जाऊ नये अशी त्यांस स्वप्नांत सूचना झाल्यामुळे, ते दुसऱ्या मार्गाने स्वदेशास गेले.
>
> ते गेल्यावर, पाहा, प्रभूचा दूत योसेफास स्वप्नांत दर्शन देऊन म्हणाला, "ऊठ, बालक व त्याची आई यांस घेऊन मिसर देशास पळून जा, आणि मी तुला तेथून जाण्यास सांगेन तोपर्यंत तेथे ऐस; कारण बालकाचा घात करावयास हेरोद त्याचा शोध करणार आहे." (मत्तय 2:2-13)

हेरोदाने बालकाचा खून करण्याचा प्रयत्न केला. यरुशलेम येथील लोकांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. परंतु मागी, ज्यांनी रखरखीत रान पार केले की त्यास शोधावे, त्याची उपासना करावी आणि त्यांनी राजाला बक्षिसे दिलीः सोने, ऊद गंधरस. गंधरस का?

ह्या ज्ञानी लोकांना ठाऊक होते काय की येशू मरण्यासाठी जन्मला आहे?





## दृश्य 43

# परिपूर्ण बालक

देवदूताच्या सुचनेनंतर, योसेफाने मरीया व बाळ येशूला मिसरला नेले, जेथे ते क्रूर राजा हेरोदाच्या मरणापर्यंत शरणार्थी म्हणून राहिले.

> पुढे हेरोद मरण पावल्यावर, पाहा, प्रभूचा दूत मिसर देशांत योसेफास स्वप्नांत दर्शन देऊन म्हणाला, "ऊठ, बालकास व त्याच्या आईस घेऊन इस्राएलाच्या देशांत जा, कारण बालकाचा जीव घ्यावयास जे पाहत होते ते मेले आहेत." (मत्तय 2:19-20)

प्रभूने बोललेल्या आणखी एका प्राचीन भविष्यवाणीस याने पूर्ण केले:

> त्याला मी आपला पुत्र म्हणून मिसरातून बोलाविले आहे. (होशेय 11:1)

तेव्हा योसेफ व मरीयेने येशूला नासरेथला नेले, जेथे तो त्याचे सावत्र बंधू व बहिणी सोबत मोठा झाला.[15]

अनेक प्रकारे बालक येशू हा इतर लेकरांसारखा होता. तो जेवला, झोपला, खेळला, अभ्यास केला आणि व्यवसाय शिकला. परंतु दुसऱ्या प्रकारे, येशू हा इतर लेकारांपेक्षा भिन्न होता. तो कधीही स्वार्थी नव्हता, तो नेहमीच त्याच्या आई-वडिलांचा सन्मान करीत असे. त्याने कधीही खोटे बोलले नाही. त्याने नेहमीच स्वर्गातील त्याच्या पित्यास प्रसन्न केले.

> तो पवित्र, सात्विक, निर्मळ व पापी जनांपासून वेगळा होता. (इब्री. 7:26)

येशू हाच इतिहासात एक परिपूर्ण बालक आहे. परिपूर्ण याचा अर्थ हा नाही की त्यास सोललेली त्वचा किंवा फोड्या कधीही नव्हत्या. याचा अर्थ हा आहे की त्यास एक परिपूर्ण स्वभाव होता. तो परिपूर्णरित्या पवित्र व चांगला होता. तो सामर्थ्य व ज्ञानामध्ये सुद्धा परिपूर्ण होता परंतु मरीयेच्या उदरात प्रवेश करण्याअगोदर त्याने स्वतःवर काही निश्चित मर्यादा लावून घेतल्या होत्या जेणेकरून तो मानवांच्या मध्य मानव म्हणून कदाचित जगू शकावा.

> येशू हा ज्ञानाने, शरीराने आणि "देवाच्या व मनुष्याच्या कृपेत वाढत गेला." (लूक 2:52)

येशू जेव्हा 12 वर्षाचा होता, नासरेथ ते यरुशलेमेस बलिदान करण्याच्या वार्षिक मेजवानी, ज्यास वल्हांडण[16] म्हणतात त्यासाठी त्याने त्याच्या आई-वडील सोबत प्रवास केला होता. जेव्हा त्याच्या बालपणाचे मित्र हे मोठे नगर फिरत होते, येशूने तो आठवडा मंदिराच्या अंगणात घालविला, शिक्षकांच्यामध्ये बसून, त्यांना ऐकत व त्यांना प्रश्ने विचारीत.

> ज्या सर्वांनी त्यास ऐकले ते त्याची समज व त्याच्या उत्तरांनी आश्चर्यचकित झाले होते. (लूक 2:47)

मंदिर हे ते ठिकाण होते जेथे लोकांच्या पापांकरिता कोकरे हे वेदीवर जाळले जात होते. बालक येशूने हे समजले जे विद्वान समजले नाहीत. तो शेवटचा कोकरा अर्पण करण्यास आला होता.





## दृश्य 44

# देवाचा कोकरा

बेथलहेममध्ये येशूच्या जन्मापासून आता तीस वर्षे होऊन गेली होती. कैसर ऑगुस्त हा मरण पावलेला होता; त्याचा सावत्र पुत्र कैसर तैबेरीयसने रोमन साम्राज्यावर शासन केले. हेरोद अंतीपासने गालीलमध्ये शासन केले. पंत पिलातने यहूदा प्रदेशमध्ये राज्यपाल म्हणून शासन केले. आणि एक नवीन संदेष्टा हा पॅलेस्टाइनमध्ये प्रचार करीत होता.

> त्या दिवसांत बाप्तिस्मा देणारा योहान आला, यहूदाच्या रानात प्रचार करीत आणि म्हणत, "पश्चाताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे."
>
> हा तो होता ज्याविषयी संदेष्टा यशया द्वारे म्हटले गेले होतेः "अरण्यांत घोषणा करणाऱ्याची वाणी झाली की प्रभूचा मार्ग नीट करा."
>
> योहानाचे वस्त्र उंटाच्या केसांचे होते, त्याच्या कमरेस कातड्याचा कमरबंद होता, आणि त्याचा आहार टोळ व रानमध होता. (मत्तय 3:1-4)

ज्यावेळेस त्याच्या वेळचे लोक तलम वस्त्रे घालीत होते व उत्तम अन्न खात होते, योहान साधेपणे जगला. तो सेवाकार्य पूर्ण करणारा मनुष्य होता.

योहान हा राजाचा अग्रदूत होता.

शेकडो वर्षांच्या अगोदर, दोन संदेष्ट्ये, यशया व मलाखी, यांनी भविष्यातील संदेष्ट्याविषयी लिहिले होते जो मशीहा-राजाच्या आगमनाविषयी घोषणा करेल. योहान हा तो संदेष्टा होता.

ज्यावेळेस पूर्वीच्या संदेष्ट्यांनी भविष्यवाणी केलीः *योग्यवेळी, अभिवचन दिलेला तारणारा हा पृथ्वीवर येईल, योहानाने प्रचार केलाः ती वेळ आता आली आहे. तारणारा हा येथे आहे!*

जमाव रानात जात होता की योहानाचे ऐकावे. ते ज्यांनी त्यांची अवस्था पापी आहे त्यांना तारणाऱ्याची गरज आहे म्हणून कबूली केली त्यांचा यार्देन नदीमध्ये बाप्तिस्मा केला गेला. अशा प्रकारे त्यांनी मशीहामध्ये त्यांचा विश्वास दाखविला, जो पापाचे त्यांचे मोठे कर्ज धुऊन टाकणार आहे आणि त्यांना त्याच्या धार्मिकतेमध्ये परिधान करेल.

दिवसामागून दिवस, आठवड्यानंतर आठवडे, योहानाने लोकांना स्वर्गाकडील खूप वाट पाहिला गेलेल्या तारणाऱ्याविषयी बोलले, "त्याच्या वाहणा घेऊन चालावयास मी योग्य नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करील." (मत्तय 3:11)


मग एके दिवशी, तारणारा आला-एका टेकडीवर, जमावातून, आणि तेथे खाली आला जेथे योहान बाप्तिस्मा देत होता.

योहानाने येशूकडे बोट दाखविले व म्हटले,

> "हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा, देवाचा कोकरा!" (योहान 1:29)

योहानाने येशूला देवाचा कोकरा का म्हटले? जर तुम्हांला ठाऊक आहे का, तर मग तुम्हांला राजाचे नियुक्त सेवाकार्य माहित आहे.





## दृश्य 45
# परिपूर्ण पुत्र

येशूने योहानास सांगितले की त्याचा बाप्तिस्मा करावा. योहानाने आक्षेप घेतला कारण मशीहा-राजा जो स्वर्गातून आला होता त्यास पश्चाताप करण्याची गरज नव्हती.

> येशूने उत्तर दिले, "आता हे होऊ दे; कारण या प्रकारे सर्व धर्म पूर्णपणे पाळणे हे आपणांला योग्य आहे." (मत्तय 3:15)

म्हणून योहानाने येशूचा बाप्तिस्मा केला. बाप्तिस्मा घेऊन, येशूने दाखविले की तो मानवी कुटुंबाचा आहे ज्यास सोडविण्यास तो आला आहे.

> मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू पाण्यातून लागलाच वर आला आणि पाहा, आकाश उघडले; तेव्हा त्याने देवाचा आत्मा कबुतरासारखा उतरताना व आपणावर येताना पाहिला; आणि पाहा, "अशी आकाशवाणी झाली की हा माझा पुत्र, मला परमप्रिय, याजवर मी संतुष्ट आहे!" (मत्तय 3:16-17)

जसे सृष्टी निर्माण करण्याच्या पहिल्या दिवशी, देवाची जटील ऐक्यता ही पुन्हा प्रकट झाली. देवाने सुद्धा, त्याचा आत्मा, आणि त्याचा शब्द म्हणून एकत्र काम केले की जग निर्माण करावे, म्हणून आता ते एकत्र कार्य करतील की त्याचा बचाव करावा.[17]

आपण पाहतो की *देवाचा आत्मा* (जो प्रारंभी पाण्यावर तळपत होता) येशू वर आला. आपण *देवाच्या पुत्राला* पाहतो (शब्द ज्याने जग निर्माण केले) जो पाण्यातून वर आला, आपण ऐकतो पिता स्वर्गातून बोलत आहे.

मागील 30 वर्षे, येशू एकांतात राहिला होता, लोकांच्या नजरेपासून दूर, परंतु स्वर्गातील त्याच्या पित्याने त्याचे प्रत्येक विचार, शब्द व कृतीकडे लक्ष दिले होते. आणि देवाचा त्याच्या पुत्राच्या जीवनावर काय निकाल होता?

> "याजवर मी संतुष्ट आहे!"

संपूर्ण मानवी इतिहासात, येशू हाच एकमेव आहे ज्याने देवाला ज्याची गरज आहे ते सर्व काही केले. सर्व काही. नेहमीच. परीपुर्णपणे.

येशूने ते केले जे आदाम करण्यात चुकला होताः देवाची प्रतिमा प्रतिबिंबित करावी. परंतु त्यास प्रतिबिंबित करण्यापेक्षा येशूने अधिक केले. तो तेच होता.

> देव प्राचीनकाळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी आपल्या पूर्वजांशी संदेष्ट्यांच्या द्वारे बोलला. तो या काळाच्या शेवटी आपल्याशी पुत्राच्या द्वारे बोलला आहे; त्याने त्याला सर्वांचा वारीस करून ठेविले आणि त्याच्या द्वारे त्याने विश्व उत्पन्न केले; हा त्याच्या गौरवाचे तेज, व त्याच्या तत्वाचे प्रतिरूप आहे; आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार असून .......... (इब्री 1:1-3)

यात आश्चर्य नाही की येशू नंतर असे म्हणेल,

> "मी आणि पिता एक आहोत." (योहान 10:30)

येशू हा परिपूर्ण पुत्र आहे.





## दृश्य 46

# दुसरा आदाम

सैतान खुश नव्हता की हा परिपूर्ण मनुष्य त्याच्या राज्यात राहत होता! परंतु सैतानाकडे एक योजना होती. जसे त्याने पहिल्या मनुष्याला पाप करण्यास परीक्षेत टाकले होते, म्हणून आता तो ह्या मनुष्याने सुद्धा पाप करावे म्हणून प्रयत्न करेल.

सैतानाला पाहिजे होते की येशूला त्याच्या नियंत्रणात आणावे जसे त्याने आदामाला त्याच्या नियंत्रणात आणले होते. जर देवाच्या पुत्राला पाप करण्यास मोहात  पाडले, तर मग तो लोकांना त्यांच्या पापांपासून तारण करण्यास पात्र होणार नाही.

> तेव्हा सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी म्हणून आत्म्याने त्याला रानात नेले. मग तो चाळीस दिवस व चाळीस रात्री उपाशी राहिल्यानंतर त्याला भूक लागली.
>
> तेव्हा परीक्षक त्याजजवळ येऊन म्हणाला, "तू देवाचा पुत्र असलास तर या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्या अशी आज्ञा कर." (मत्तय 4:1-3)

येशू भुकेला होता, परंतु त्याने सैतानाची आज्ञा पाळली नाही. तो त्याच्या पित्याच्या इच्छेच्या बाहेर कार्य करीत नसे. तो त्याचे अमर्यादित सामर्थ्य वापरीत नसे की मानवी इच्छेचे समाधान करावे. वाईटास तोंड देण्यासाठी, येशूने मोशेच्या तोरह पासून संदर्भ दिलाः

> "मनुष्य केवळ भाकरीने नाही, तर देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल," असे लिहिले आहे. (मत्तय 4:4; अनुवाद 8:3)

त्याच्या मूर्ख गर्वात, सैतानाने पवित्र जनास पुन्हा एकदा मोहात पाडण्याच्या प्रयत्न केला.

> नंतर सैतानाने त्याला एका मोठ्या उंच डोंगरावर नेऊन जगातील सर्व राज्ये व त्यांचे वैभव त्याला दाखविले. आणि त्याला म्हटले, "तू पाया पडून मला नमन करिशील तर मी हे सर्व तुला देईन." (मत्तय 4:8-9)

जेव्हा आदामाने पाप केले, मानवजातीने पृथ्वीवर राज्य करण्याचा हक्क गमाविला होता. सैतानाने जगाची सत्ता चोरली होती, त्याने स्वतःला त्याचा राजा असे केले होते. आता गौरवाचा राजा पृथ्वीवर होता की ती सत्ता पुन्हा घ्यावी, परंतु तो ते त्याच्यासमोर नमन करण्याद्वारे करणार नव्हता ज्यास ठेचण्यास तो आला होता.

> येशूने त्यास म्हटले, "अरे सैताना, निघून जा, कारण परमेश्वर तुझा देव याला नमन कर, व केवळ त्याचीच उपासना कर." (मत्तय 4:10)

शेवटी, सैतान येशूला सोडून निघून गेला. सैतानाने त्याच्यासारखे कोणाला कधीही मोहात पाडले नव्हते, एक मनुष्य ज्यास पाप करण्याची इच्छा किंवा क्षमता नव्हती. येशू आदाम व त्याच्या वंशजांपासून भिन्न होता.

> पहिला मनुष्य हा पृथ्वीच्या मातीपासून होता, दुसरा मनुष्य हा स्वर्गातून होता. (1 करिंथ 15:47)

आदाम हा पहिला परिपूर्ण मनुष्य होता. येशू हा दुसरा परिपूर्ण मनुष्य होता.

जेव्हा सैतानाने आदामाला पाप करण्यास मोहात पाडले, आदाम पराजित झाला व सैतान जिंकला. जेव्हा सैतानाने येशूला पापात आणण्याचा प्रयत्न केला, सैतान पराजित झाला व येशू जिंकला.

पहिल्या मनुष्याने आपल्याला पाप व मृत्युच्या सैतानाच्या राज्यात नेले. दुसरा मनुष्य आला की आपल्याला त्यातून बाहेर काढावे.





## दृश्य 47

# मशीहा-राजा

सैतानाच्या व्यर्थ प्रयत्नानंतर की येशूला पापात पाडावे, येशू नासरेथला आला, जेथे तो मोठा झाला होता आणि एक सुतार म्हणून काम केले होते.

> शब्बाथ दिवशी तो सभास्थानात गेला, जसे त्याचा परिपाठ होता. (लूक 4:16)

सभास्थान हे उपासनेचे घर होते जेथे प्रत्येक शनिवारी पवित्र शास्त्र वाचले आणि त्याचे स्पष्टीकरण केले जात असत. ह्या विशेष शनिवारी येशूकडे एक घोषणा करण्याची होती.

> तो वाचण्यास उभा राहिला.
>
> संदेष्टा यशयाचा ग्रंथ त्यास देण्यात आला. तो उघडा करून, त्यास एक भाग मिळाला, जेथे हे लिहिलेले होतेः
> "प्रभूचा आत्मा मजवर आला आहे, कारण दीनांस सुवार्ता सांगण्यास त्याने मला अभिषेक केला; धरून नेलेल्यांची सुटका व आंधळ्यांस दृष्टि ही विदित करावयास, ......." (लूक 4:17-18)

येशूने पवित्र शास्त्रात काय वाचले ते मशीहा-राजा विषयी प्राचीन भविष्यवाणी होती जो जगाला दाखविणार होता की परमेश्वर कशा समान आहे आणि पापी लोकांना सैतान, पाप, मृत्यु आणि नरकाच्या सत्तेपासून सोडविणार होता.

> मग [येशू] त्याने ती गुंडाळी पुन्हा गुंडाळली, तेथे असणाऱ्या सहाय्यकास ती पुन्हा दिला आणि खाली बसला.
>
> आणि सभास्थानातील सर्व लोकांची दृष्टि त्याजकडे लागली. "मग तो त्यांस म्हणू लागला की हा शास्त्रलेख आज तुम्ही ऐकत असता पूर्ण झाला आहे!" (लूक 4:20-21)

येशूच्या शेजाऱ्यांनी त्याचा दावा की तो मशीहा आहे जो स्वर्गाहून आला आहे की ते पूर्ण करावे जे संदेष्ट्यांनी पवित्र शास्त्रात लिहिले आहे यावर कशी प्रतिक्रिया दिली?

> हे ऐकताच सभास्थानातील सर्व लोक संतापून गेले, त्यांनी उठून त्याला गावाबाहेर घालविले, आणि ज्या डोंगरावर त्याचे गांव बसले होते त्याच्या कड्यावरून त्याला लोटून देण्यास तेथवर गेले.
>
> पण तो त्यांच्यामधून निघून चालता झाला. (लूक 4:28-30)

येशूकडे सत्ता होती. आदामाच्या पापाने-संसर्गित आणि मरणाऱ्या वंशजांसारखे नाही, मशीहा-राजा जो परमेश्वरा द्वारे अभिषिक्त[18] होता तो परिपूर्णपणे नियंत्रण ठेवून होता. त्याने परवानगी दिल्याशिवाय त्यास कोणीही स्पर्श करू शकत नव्हता.

पण तो त्यांना स्पर्श करीत होता.





## दृश्य 48

# दुरात्मे व आजार यांवर सत्ता

संदेष्ट्यांच्या पवित्र शास्त्रात, मशीहाचे एक शीर्षक हे प्रभूचा हात आहे (यशया 53:1). येशूच्या चमत्कारांनी पृथ्वीवर त्याला देवाचा हात असे दाखविले. त्याच्या हाताच्या स्पर्शाने किंवा त्याच्या मुखातून शब्दाने, आजारी व मरत असलेले ताबडतोब बरे केले जात होते.

> मग लोकांचे थव्यांचे थवे त्याजकडे आले; त्यांच्याबरोबर लंगडे, अंधळे, मुके, व्यंग व दुसरे बहुत जण होते; त्यांस त्यांनी त्याच्या पायांवर आणून घातले आणि त्याने त्यांस बरे केले. (मत्तय 15:30)

संदेष्ट्यांची वचने ही पूर्ण झाली होती.आंधळे पाहतात, पांगळे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठतात, व गरिबांस सुवार्ता सांगण्यात येते. (मत्तय 11:5 [यशया 35:4-6; 61:1])

येथे कोणताही असा आजार नव्हता जो येशू बरे करू शकत नव्हता.


> आता एक कुष्ठरोगी त्याजकडे आला, त्यास विनंती करीत, त्याच्यासमोर गुडघे टेकीत आणि त्यास हे म्हणत, "जर तुझी इच्छा असेल, तर तू मला शुद्ध करू शकतो."
>
> तेव्हा येशूला त्याची करुणा आली आणि त्याने हात लांब करून त्याला स्पर्श केला व म्हटले, "माझी इच्छा आहे, शुद्ध हो.
>
> "तेव्हा त्याचे कुष्ठ तत्काळ जाऊन तो शुद्ध झाला. (मार्क 1:40-42)
>
> तेव्हा ज्या कोणाची माणसे नाना प्रकारच्या रोगांनी बेजार झाली होती त्या सर्वांनी त्यांना त्याजकडे सूर्यास्ताच्या वेळी आणिले, आणि त्याने त्यांच्यातील प्रत्येकांवर हात ठेऊन त्यांस बरे केले. भूते देखील, "तू देवाचा पुत्र आहेस!", अशी आरोळी ठोकून पुष्कळ मनुष्यांतून निघाली.
>
> परंतु त्याने त्यांस दटावून बोलू दिले नाही, कारण तो ख्रिस्त आहे हे त्यांस ठाऊक होते. (लूक 4:40-41)

येशूला नाही पाहिजे होते की भुतांनी त्याच्याविषयी साक्ष द्यावी. ह्या वाईट देवदूतांनी त्याचा अधिकार व सामर्थ्य पाहिले होते जेव्हा त्याने स्वर्ग व पृथ्वीला त्याच्या ठिकाणी असावे असे बोलले होते. ते थरथर कापले होते जेव्हा त्याने त्यांस स्वर्गातून बाहेर हाकलून दिले होते तो दिवस आठवला. आणि आता तो पृथ्वीवर एक मनुष्य म्हणून जगत होता! त्यांच्या स्वामीची सत्ता ही नष्ट होत होती. गौरवाच्या राजाने त्यांच्या सत्तेमध्ये प्रवेश केला होता.

जेथेकोठे येशू गेला, सैतानाचे सामर्थ्य कमकुवत होत गेले. जेथेकोठे येशू गेला, पापाचा शाप हा मागे घेतला गेला होता.

चमत्कारासह, येशूकडे एक संदेश होताः

> "समय पूर्ण झाला आहे व देवाचे राज्य जवळ आले आहे; पश्चाताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा!" (मार्क 1:15)





## दृश्य 49

# वारा व लाटां यांवर सत्ता

येशूने बारा मनुष्ये निवडली की त्याच्याबरोबर प्रवास करावा आणि त्याच्याकडून शिकावे. तसेच त्याच्यामागे अनेक स्त्रिया चालत होत्या. येशूला व त्याच्या शिष्यांना अन्न व पैसे देण्याद्वारे त्या साहाय्य करीत होत्या.

ते जे त्याच्यामध्ये विश्वास ठेवीत होते, येशूचे पाचारण हे सरळ होतेः

> "माझ्या मागे या." (लूक 5:27)

परंतु त्याचे पाचारण हे महागडे सुद्धा होतेः

> "जो माझ्यापेक्षा बापावर किंवा आईवर अधिक प्रीति करितो तो मला योग्य नाही; जो माझ्यापेक्षा मुलावर किंवा मुलीवर अधिक प्रीति करितो तो मला योग्य नाही." (मत्तय 10:37)

कारण त्याचे अनेक शिष्य हे मासे धरणारे होते, येशू नेहमी त्याच्या दिवसाची शेवट गालील समुद्राच्या ठिकाणी घालवीत होता. लोक त्याच्याकडे जवळ व दूरवरून येत होते.

> पुन्हा एकदा तो सरोवराच्या कांठी शिक्षण देऊ लागला, आणि त्याच्याजवळ लोकांचा एवढा मोठा समुदाय जमला की तो सरोवरात एका मचव्यावर चढून बसला; आणि सर्व लोक सरोवराच्या कांठी भूमीवर होते. (मार्क 4:1)

एक दिवस शिकविल्यावर, येशूने त्याच्या शिष्यांना म्हटले, "चला आपण पलीकडे जाऊ." तो अगोदरच मचव्यावर होता म्हणून त्यांनी सुरुवात केली, जमावास मागे सोडले.

> नंतर मोठे वादळ झाले व लाटा मचव्यावर अशा उसळल्या की तो भरू लागला. तो वरामावर उशास घेऊन निजला होता, तेव्हा ते त्याला उठवून म्हणाले, "गुरुजी, आपण बुडतो याची आपणाला चिंता नाही काय?"
>
> तेव्हा त्याने उठून वाऱ्याला दटाविले व समुद्राला म्हटले, "उगा राहा, शांत हो!"
>
> अचानक वारा थांबला, आणि तेथे अगदी निवांत झाले.
>
> मग त्याने त्यांना म्हटले, "तुम्ही का घाबरला?" अद्यापि तुम्हांला विश्वास नाही काय?"
>
> शिष्य हे पूर्णपणे भयभीत झाले होते. "हा आहे तरी कोण? वारा व समुद्र हे देखील याचे ऐकतात!" (मार्क 4:37-41)

हा मनुष्य कोण आहे? एक हजार वर्षा पूर्वी, संदेष्टा दाविदाने अगोदरच प्रश्नाचे उत्तर दिले होतेः

> ते संकटसमयी परमेश्वराचा धावा करितात, आणि तो त्यांस क्लेशांतून मुक्त करितो. तो वादळ शमवितो तेव्हा लाटा शांत होतात. (स्तोत्रसंहिता 107:28-29)

केवळ त्यास बोलण्याद्वारे कोण वारा व लाटा शांत करू शकतो?

तीच वाणी जिने त्यांस निर्माण केले.





## दृश्य 50
# पापावर सत्ता

एके दिवशी चार मनुष्यांनी एका पक्षघाती मनुष्याला खाटेवर ठेवून उचलून येशू ज्या घरात होता तेथे आणले.

त्या मनुष्यांनी घरामध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला परंतु घर गच्च भरलेले होते म्हणून ते आतमध्ये प्रवेश करू शकले नाही. म्हणून ते छप्परावर चढले, काही कौले त्यांनी काढली, आणि त्या खाटेला येशू समोर खाली केले.

> त्यांच्या विश्वास पाहून, येशूने त्या पक्षघाती मनुष्यास म्हटले, "माझ्या मुला, तुझी पापे क्षमा केली गेली आहेत." (मार्क 2:5)

येशूला ठाऊक होते की ह्या मनुष्याची सर्वात मोठी गरज ही पुन्हा चालणे ही नव्हती, परंतु त्याच्या पापांपासून क्षमा मिळविण्याची होती.

> परंतु कित्येक शास्त्री तेथे बसले होते ते आपल्या मनात असा विचार करीत होते की, "तो काय बोलत आहे? हे दुर्भाषण आहे! केवळ देव पाप्यांना क्षमा करू शकतो!"
>
> येशूने आपल्या आत्म्यांत तत्काळ ओळखून त्यांस म्हटले, तुम्ही आपल्या मनात हे विचार का करिता? तुझ्या पापांची क्षमा झाली आहे, असे पक्षघाती मनुष्याला म्हणणे, किंवा ऊठ, आपली खाट उचलून चाल, असे म्हणणे, यातून कोणते सोपे? म्हणून मी तुम्हांला पुरावा देईन की मनुष्याच्या पुत्राला पापांची क्षमा करण्याचा येथे पृथ्वीवर अधिकार आहे."
>
> मग येशू त्या पक्षघाती मनुष्याकडे वळला व म्हणाला, "उभा राहा, तुझी खाट उचल, आणि घरी जा!"
>
> आणि मनुष्याने उडी मारली, त्याची खाट उचलली, आणि आश्चर्याने पाहणाऱ्या लोकांमधून चालत निघून गेला.
>
> यावरून सर्व थक्क झाले व देवाचे गौरव करीत म्हणाले, आम्ही असे कधी पाहिले नव्हते!" (मार्क 2:6-12)


नियमशास्त्राचे शिक्षक हे त्यांचा धर्म व गर्वा द्वारे आंधळे झाले होते. त्याचा विचार हा काहीतरी असा झाला: येशू, तू निंदा करणारा आहेस! *तू देवाचा अपमान करीत आहे कारण तू पाप क्षमा करण्याचा दावा करीत आहे, परंतु हे केवळ देव करू शकतो!*

ते त्यांच्या विचारात बरोबर होते की केवळ देव पापांची क्षमा करू शकतो, परंतु येशू कोण आहे याविषयीच्या निष्कर्षामध्ये ते चूक होते.

येशू कोण आहे असा तुम्ही विचार करता? त्याच्या नांवाचा अर्थ तुम्हांला आठवतो काय? याचा अर्थ प्रभु तारण करतो.

पॅलेस्टाइनच्या एका नगरात जेथे येशूने शिक्षण दिले, लोक ह्या निष्कर्षापर्यंत आले:

> "आता तुझ्या बोलण्यावरूनच आम्ही विश्वास धरितो असे नाही, कारण आम्ही स्वतः श्रवण केले असून हा खचित जगाचा तारणारा आहे हे ओळखले आहे." (योहान 4:42)





## दृश्य 51

# मृत्यू वर सत्ता

येशूला सृष्टीच्या प्रत्येक भागावर सत्ता होती. तरीही तो सर्वत्र हे म्हणत गेला नाही, “माझी उपासना करा! मी देव आहे! मी देव आहे!” त्याने केवळ त्या गोष्टी केल्या ज्या केवळ देव करू शकत होता आणि मग लोकांनी त्यांचे स्वतःचे निष्कर्ष काढावे.

पुढील दोन गोष्टींवर आधारित, येशू कोण आहे असा तुम्ही विचार करता?

> येशू नाईन नांवाच्या नगरास गेला, आणि त्याचे शिष्य व मोठा जमाव त्याच्याबरोबर तेथे गेले. जेव्हा तो नगराच्या वेशीजवळ पोहचत होता, एका मृत व्यक्तीला घेऊन चालले होते-तो त्याच्या आईचा एकुलता एक पुत्र होता, आणि ती विधवा होती. आणि नगरातून एक मोठा जमाव तिच्याबरोबर होता.
>
> जेव्हा प्रभूने तिला पाहिले, त्याचे अंतःकरण तिच्यासाठी कष्टी झाले आणि त्याने म्हटले, “रडू नको.”
>
> मग तो वर गेला आणि तिरडीस स्पर्श केला, आणि जे त्यास घेऊन जात होते ते थांबले. त्याने म्हटले, “तरुण मनुष्या, मी तुला सांगतो ऊठ!”
>
> मृत मनुष्य उठून बसला आणि बोलू लागला, आणि येशूने त्यास त्याच्या आईला परत दिले. तेव्हा सर्वांस भय प्राप्त झाले आणि त्यांनी देवाची स्तुति केली. (लूक 7:11-16)

आणखी एका दिवशी, येशू दोन दुःखित बहिणी, मार्था व मरीयेस भेटण्यास गेला,  चार दिवसाअगोदर, त्यांचा भाऊ लाजर मरण पावला होता.

> “प्रभुजी,” आपण येथे असता तर माझा भाऊ मेला नसता.....” मार्था येशूला म्हणाली.
>
> येशूने तिला म्हटले, “पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो मजवर विश्वास ठेवितो तो मेला असला तरी जगेल; आणि जो जिवंत असून मजवर विश्वास ठेवितो तो कधीही मरणार नाही; याचा तू विश्वास धरितेस काय?”
>
> ती त्याला म्हणाली, होय प्रभुजी, “जो जगात येणारा देवाचा पुत्र ख्रिस्त तो आपण आहा असा विश्वास मी धरिला आहे.”येशू ........  कबरेजवळ आला. ती गुहा होती, आणि तिच्या तोंडावर धोंड ठेविलेली होती. येशूने म्हटले, ”धोंड काढा.”
>
> त्या मृताची बहिण मार्था त्याला म्हणाली, प्रभुजी, आता त्याला दुर्गंधी येत असेल; कारण त्याला चार दिवस झाले आहेत.”
>
> येशूने तिला म्हटले, तू विश्वास धरशील तर देवाचे गौरव पाहशील असे मी तुला सांगितले नव्हते काय? यावरून त्यांनी धोंड काढिली; तेव्हा येशूने मोठ्याने हाक मारून म्हटले, “लाजरा, बाहेर ये!” तेव्हा मृत झालेला तो इसम बाहेर आला; त्याचे हातपाय प्रेतवस्त्रांनी बांधिलेले व तोंड रुमालाने वेष्टिलेले होते. येशूने त्यांस म्हटले, ह्याला मोकळे करून जाऊ द्या.” (योहान 11:21, 25-27, 38-41, 43-44)

प्रभु येशू हाच इतिहासात एकमेव व्यक्ती आहे जो असे म्हणू शकतो,

> “पुनरुत्थान व जीवन मीच आहे.”

त्याच्या कार्यांनी हे सिद्ध केले आहे की त्याचे शब्द हे खरे आहेत.





## दृश्य 52

# पुरवठा करणारा

मोठा जमाव येशू भोवती असे, कधीकधी एकाच वेळी अनेक दिवस. नेहमी ते त्यास रानाच्या भागात पाहत असत, जेथे तो त्याच्या शिष्यांसोबत वेळ घालवित असे. कधीकधी जमाव भुकेला असे.

एका दुपारी हेच काय ते घडले जेव्हा 5000 पेक्षा अधिक लोक गालील समुद्राच्या पूर्वेला एका टेकडीवर जमा झाले होते. म्हणून येशूने फिलिप्प, त्याचा एक शिष्य यास विचारले,


> "ह्या लोकांना खावयास देण्यासाठी आपण भाकरी कोठून विकत आणाव्या?" हे तर त्याने त्याची परीक्षा पाहण्याकरिता म्हटले; आपण काय करणार हे त्याला ठाऊक होते.
>
> फिलिप्पाने उत्तर दिले, यांच्यातील एकेकाने थोडे थोडे घेतले तरी पन्नास रुपयांच्या भाकरी पुरणार नाहीत.
>
> मग अंद्रिया, शिमोन पेत्राचा भाऊ, बोलला. "येथे एक मुलगा आहे, त्याच्याजवळ जवाच्या पाच भाकरी व दोन मासळ्या आहेत; परंतु त्या इतक्यांस कशा पुरणार?"
>
> "येशू म्हणाला, लोकांस बसवा. त्या ठिकाणी पुष्कळ गवत होते; तेथे बसणाऱ्या पुरुषांची संख्या सुमारे पाच हजार होती.
>
> येशूने त्या भाकरी घेतल्या आणि ईशोपकारस्मरण केल्यावर बसलेल्यांस वाटून दिल्या; तसेच त्या मासळ्यातूनही त्यांस पाहिजे तितके दिले. जोपर्यंत ते तृप्त होत नाहीत.
>
> "मग त्याने आपल्या शिष्यांस सांगितले; काही फुकट जाऊ नये म्हणून उरलेले तुकडे गोळा करा." मग जेवणाऱ्यांस पुरे झाल्यावर जवाच्या पाच भाकरींपैकी उरलेले तुकडे त्यांनी गोळा केले; त्या तुकड्यांनी बारा टोपल्या भरल्या! (योहान 6:5-13)

पुढील दिवशी जमाव येशूला शोधत आला. त्यांना त्यास राजा करावयास पाहिजे होते, परंतु केवळ यासाठीच की त्याने त्यांना रोमन अत्याचारपासून सोडवू शकावे व त्यांना अधिक अन्न द्यावे. येशूने त्यांना म्हटले,

> नाशवंत अन्नासाठी श्रम करू नका, तर सार्वकालिक जीवनासाठी टिकणारे जे अन्न मनुष्याचा पुत्र[19] तुम्हांस देईल, त्यासाठी श्रम करा; कारण पिता जो देव त्याने त्याजवर शिक्का मारिला आहे.
>
> येशूने त्यांस म्हटले, जीवनाची भाकर मी आहे; जो मजकडे येतो त्याला भूक लागणार नाही. आणि जो मजवर विश्वास ठेवितो त्याला कधीही तहान लागणार नाही." (योहान 6:27, 35)

अन्न तुमच्या शरीराला काही वेळा करिता जिवंत ठेवू शकते, परंतु केवळ प्रभु येशू तुम्हांला खरे जीवन काही वेळा करिता आणि सार्वकालिकतेसाठी देऊ शकतो.

केवळ येशू हे म्हणू शकतो,
"जीवनाची भाकर मी आहे."





## दृश्य 53
# शिक्षक

येशू हा धार्मिक पुढाऱ्यांसारखा नाही ज्यांनी गोष्टींना अशा प्रकारे म्हटले, “हे करा! हे करू नका! हे नियम पाळा! हाच मार्ग आहे!” केवळ येशू हे म्हणू शकला,

“मार्ग, सत्य व जीवन मीच आहे.” (योहान 14:6)

येशू संदेष्ट्यांपासून सुद्धा वेगळा होता ज्यांनी त्यांच्या पापांसाठी बलिदाने अर्पणे केली आणि मशीहाच्या येण्याविषयी लिहिले. येशूने म्हटले,

“अशी गैरसमजूत करून घेऊ नका की मी कशा साठी आलो आहे. नियमशास्त्र किंवा संदेष्ट्यांचे ग्रंथ ही रद्द करावयास मी आलो नाही. नाही, मी ते पूर्ण करावयास आलो आहे.” (मत्तय 5:17)

येशूने नेहमी त्याच्या शिष्यांना शिकविले की स्वर्गाच्या राज्याच्या नागरिकांनी कसे जगावे जेणेकरून त्याच्या राजाचे चरित्र व गौरव प्रतिबिंबित करावे.

“आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर, असे सांगितले होते ते तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांस सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीति करा आणि जे तुमचा छळ करितात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

“तसेच तुम्ही प्रार्थना करिता तेव्हा ढोंग्यांसारखे होऊ नका; कारण मनुष्यांनी आपणांस पाहावे म्हणून .........उभे राहून प्रार्थना करणे त्यांस आवडते. यास्तव या प्रकारे प्रार्थना कराः ‘हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाम पवित्र मानिले जावो. तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. आमची रोजची भाकर आज आम्हांस दे......’

“यास्तव काय खावे, काय प्यावे, काय पांघरावे, असे म्हणत काळजी करीत बसू नका. कारण ही सर्व मिळवावयास विदेशी लोक खटपट करितात. या सर्वांची गरज तुम्हांस आहे हे तुमच्या स्वर्गीय पित्यास ठाऊक आहे. तर तुम्ही प्रथम त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवावयाची खटपट करा, म्हणजे यांबरोबर तीही सर्व तुम्हांस मिळतील.

“खोट्या संदेष्ट्यांविषयी जपा. ते मेंढरांच्या वेषाने तुम्हांकडे येतात, तरी अंतरी क्रूर लांडगेच आहेत.”

“यास्तव जो प्रत्येक जण माझी ही वचने ऐकून त्याप्रमाणे वर्ततो तो कोणाएका शहाण्या मनुष्यासारखा ठरेल; त्याने आपले घर खडकावर बांधिले; मग पाऊस पडला, पूर आला, वाराही सुटला, व त्या घरास लागला; तरी ते पडले नाही, कारण त्याचा पाया खडकावर घातला होता.

“तसेच जो प्रत्येक जण माझी ही वचने ऐकून त्याप्रमाणे वर्तत नाही तो कोणाएका मूर्ख मनुष्यासारखा ठरेल, त्याने आपले घर वाळूवर बांधिले, मग पाऊस पडला, पूर आला, वाराही सुटला  व त्या घरास लागला; तेव्हा ते कोसळले व फारच जोराने पडले.” (मत्तय 5:43-44; 6:5-6, 9-11, 31-33; 7:15, 24-27)

स्वर्गाकडील शिक्षकासारखे कधी कोणीही बोलले नाही.



## दृश्य 54
# त्याचे वैभव

यहूदी लोकांचे शिक्षक व याजक हे खुश नव्हते हे पाहण्यास की लोकसमुदाय येशूचे ऐकत होते. त्यांना पाहिजे होते की लोकसमुदायाने त्यांचे ऐकावे, त्याचे ऐकू नये!

एके दिवशी प्रमुख याजकाने मंदिराच्या सुरक्षाअधिकाऱ्यांना पाठविले की येशूला अटक करावी, परंतु ते तसे करू शकले नाही. जेव्हा ते परत आले, याजकाने त्यांना विचारले, "तुम्ही त्यास धरून का आणले नाही?" सुरक्षा अधिकाऱ्यांनी उत्तर दिले,

"कोणी मनुष्य त्याच्यासारखा कधी बोलला नाही." (योहान 7:46)

संदेष्ट्ये सुद्धा येशूसारखे बोलले नाहीत. संदेष्ट्ये हे मेणबत्तीसारखे या अंधाऱ्या जगात मिणमिणत्या प्रकाशाचे किरण देणारे आहेत, परंतु मशीहा हा "नीतिमत्वाचा सूर्य" होता (मलाखी 4:2). एकदा की सूर्य उगवला तर कोणाला मेणबत्तीची गरज लागते?

येशूने म्हटले,

"मी जगाचा प्रकाश आहे; जो मला अनुसरतो तो अंधारात चालणार नाही, तर त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील." (योहान 8:12)

येशू हा शब्द आहे ज्याने प्रारंभी म्हटले, "येथे प्रकाश होवो." भौतिक व आध्यात्मिक प्रकाशाचा तो अंतिम स्त्रोत आहे.

मशीहास त्याचे सेवाकार्य पूर्ण करण्याचा समय जेव्हा जवळ आला, त्याने त्याचे तीन शिष्य, पेत्र, याकोब व योहान यांना एका उंच डोंगरावर नेले.

तेव्हा त्याचे रूप त्यांच्या देखत पालटले; त्याचे मुख सूर्यासारखे तेजस्वी झाले आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र झाली.

तेव्हा पाहा, मोशे व एलीया हे त्याच्याबरोबर संभाषण करिताना त्यांच्या दृष्टीस पडले.....तो पाहा, तेजस्वी मेघाने त्यांजवर छाया केली; आणि पाहा, मेघांतून अशी वाणी झाली,

"हा माझा पुत्र, मला परमप्रिय आहे, याजवर मी संतुष्ट आहे; याचे तुम्ही ऐका!"

जेव्हा शिष्यांनी हे ऐकले, ते पालथे पडले व फार भयभीत झाले. तेव्हा येशूने जवळ येऊन त्यांस स्पर्श करून म्हटले, "उठा" "भिऊ नका." जेव्हा त्यांनी डोळे वर करून पाहिले तो येशूशिवाय कोणी त्यांच्या दृष्टीस पडला नाही. (मत्तय 17:1-3, 5-8)

शिष्यांनी त्यादिवशी जे पाहिले होते ते त्यास कधीही विसरले नाही. नंतर, पेत्राने लिहिले असावे, "त्याच्या वैभवास पाहणारे आम्ही साक्षीदार आहोत!" (2 पेत्र 1:16) आणि योहान पुढे म्हणाला, "आम्ही त्याचे गौरव पाहिले ते गौरव पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे असावे असे होते, जो कृपा व सत्य यांनी परिपूर्ण होऊन आला होता" (योहान 1:14)

परंतु आता साठी, पुत्राचे गौरव हे त्याच्या देहरूपी शरीरात लपलेले राहीन.
राजा साठी ही वेळ होती की त्याचे सेवाकार्य पूर्ण करावे.





## दृश्य 55

# त्याचे नियुक्त सेवाकार्य

तीन वर्षे, प्रभु येशू पॅलेस्टाइनमध्ये प्रवास करीत होता “तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांस बरे करीत फिरत असे” (प्रेषित 10:38). सामान्य लोक त्याजवर प्रीति करीत होते, परंतु यरुशलेममधील धार्मिक पुढारी त्यास जिवंत मारण्याची योजना करीत होते-आणि येशूला हे ठाऊक होते.

> पुढे असे झाले की वर घेतले जाण्याचा त्याचा समय जवळ आला तेव्हा त्याने यरुशलेमास जाण्याचा दृढनिश्चय करून तिकडे आपले तोंड वळविले. (लूक 9:51)

जर तुम्हांला कळले की एका दूरच्या नगरात काही दुष्ट लोकांचा गट तुम्हांला पकडणे, छळ करणे व जिवंत मारण्याची योजना करीत आहे, तर तुम्ही तेथे जाल काय?

हेच काय ते येशूने केले.

> तेव्हापासून येशू आपल्या शिष्यांस दर्शवू लागला की मी यरुशलेमास जाऊन वडील, मुख्य याजक व शास्त्री यांच्या हातून बहुत दुःखे सोसावी, जिवे मारिले जावे व तिसऱ्या दिवशी उठावे, याचे अगत्य आहे. (मत्तय 16:21)

अशा प्रकारच्या राजासाठी शिष्य शोध घेत नव्हते. वधस्तंभी दिलेला मशीहा? *निश्चितपणे परमेश्वर त्याच्या निवडलेल्यास अशी यातना व लज्जेने दुःख भोगू देणार नाही!* म्हणून पेत्राने येशूला म्हटले,

> “प्रभुजी! असे आपणाला कधी होणारच नाही!”
>
> येशू वळला व पेत्राला म्हणाला, “अरे सैताना, माझ्यापुढून निघून जा; तू मला अडखळण आहेस; कारण देवाच्या गोष्टींकडे तुझे लक्ष नाही, माणसांच्या गोष्टींकडे आहे.” (मत्तय 16:22-23)

शिष्यांना पाहिजे होते की मशीहा-राजाने रोमन ताबा नष्ट करावा आणि यरुशलेमेत एक नवीन सरकार स्थापन करावे. जेव्हा ते प्रवास करीत होते, शिष्यांनी वादविवाद केला की देवाच्या राज्यात कोणाला उच्च पद मिळेल. म्हणून येशूने त्याच्या शिष्यांना म्हटले,

> “..........तुम्हांमध्ये जो कोणी श्रेष्ठ होऊ पाहतो त्याने तुमचा सेवक व्हावे. ज्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र सेवा करून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास व बहुतांच्या खंडणीसाठी आपला जीव द्यावयास आला.” (मत्तय 20:26, 28)

पृथ्वीवर त्याच्या पहिल्या येण्याच्या वेळी, मशीहा राजकीय राज्य हस्तगत करण्यासाठी व पृथ्वीवरील राजासनावर शासन करण्यास आला नव्हता; तो सैतानावर विजय मिळविण्यासाठी आणि मानवी हृदयात शासन करण्यासाठी आला होता. त्यामुळेच येशूने शिकविले,

> “देवाचे राज्य हे तुम्हांमध्ये आहे.” (लूक 17:21)

परंतु स्वर्गातील राजा अंतःकरणात राज्य करण्यापूर्वी (आणि नंतर संपूर्ण पृथ्वीवर), जगाच्या पापाचे कर्ज हे भरावयाचे होते आणि मृत्यूला पराजित करावयाचे होते.

हेच त्याचे नियुक्त सेवाकार्य होते.





## दृश्य 56

# राजा यरुशलेममध्ये प्रवेश करतो

सर्व काही योजनेनुसार होत होते. जेव्हा प्रभु यरुशलेमेजवळ आला, त्याने दोन शिष्यांना जवळच पाठविले.

> “तुम्ही समोरच्या गावात जा; तो त्यांना म्हणाला. “जेव्हा तुम्ही त्यांत जाता, ज्याच्यावर कोणी कधी बसले नाही असे एक शिंगरू बांधलेले तुम्हांस आढळेल; ते सोडून आणा. तुम्ही ते का सोडिता असे कोणी तुम्हांस विचारिले तर, प्रभूला त्याची गरज आहे, असे सांगा.”
>
> तेव्हा ज्यांना पाठविले होते ते तेथे गेल्यावर त्यांस त्याने सांगितल्याप्रमाणे आढळले. ते शिंगरू सोडीत असता त्याचे धनी त्यांस म्हणाले, “शिंगरू का सोडिता?”
>
> तेव्हा ते म्हणाले, “प्रभूला याची गरज आहे.” मग त्यांनी ते येशूकडे आणिले आणि आपली वस्त्रे शिंगरावर टाकून त्यावर येशूला बसविले.
>
> आणि तो पुढे चालला तसतसे ते आपली वस्त्रे वाटेवर पसरीत गेले. तो जैतून डोंगराच्या उतरणीवर पोहोचताच सर्व शिष्यसमुदाय, जी महत्कृत्ये त्यांनी पाहिली होती त्या सर्वांमुळे आनंद करून उच्च स्वराने देवाची स्तुति करू लागले. “प्रभूच्या नामाने येणारा’ राजा ’धन्यवादित असो;’ स्वर्गात शांति, आणि उर्ध्वलोकी गौरव!”
>
> तेव्हा लोकसमुदायातील कित्येक परुश्यांनी[20] त्याला म्हटले, “गुरुजी, अशा प्रकारच्या गोष्टी बोलण्यासाठी आपल्या शिष्यांस दटावा!”
>
> त्याने म्हटले, “मी तुम्हांस सांगतो, हे उगे राहिल्यास धोंडे ओरडतील!” (लूक 19:30-40)

काय हा निराळा राजांचा राजा!

मशीहा-राजाने राजधानीमध्ये तुतारीचा नाद व एका मोठ्या सेनेसह गोंधळ केला नाही. एखाद्या लढवय्या युद्धाच्या-घोड्यावर स्वार होऊन त्याने प्रवेश केला नाही.

तो एका नम्र गाढवावर आला होता-गाढवाच्या एका शिंगरावर, एक शिंगरू ज्यावर कधी काही ओझे लादलेले नव्हते (ते ज्यास सामान्यपणे मारलेले व ठोसे लावलेले नव्हते), एक प्राणी ज्याच्या पाठीवर व खांद्यावर वधस्तंभाचे एक विशिष्ट चिन्ह होते, आणि, सर्वात महत्वाचे, एकच प्राणी जे तो पूर्ण करू शकत होता ज्याच्याविषयी संदेष्टा जखऱ्याने पाचशे वर्षांपूर्वी लिहिले होतेः

> सीयोनकन्ये, जोराने आनंदाचा गजर कर; यरुशलेमकन्ये, गजर कर; पाहा, तुझा राजा तुजकडे येत आहे; तो न्यायी व यशस्वी आहे; तो लीन आहे; गाढवावर, गाढवीच्या पोरावर म्हणजे शिंगरावर बसून येत आहे. (जखऱ्या 9:9)

मशीहा-राजा यरुशलेममध्ये शक्तिशाली युद्धाच्या-घोड्यावर स्वार होऊन का आला नाही? कारण तो लोकांना त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या रोमन लोकांपासून सोडविण्यासाठी आला नव्हता.

तो आला होता की लोकांना त्यांच्या पापांपासून सोडवावे.





## दृश्य 57
# राजाला प्रश्न विचारण्यात आले

पुढील काही दिवसांत, येशूने मंदिरामध्ये लोकांना शिकविले जेथे, एक बालक म्हणून, त्याने त्याची गहन प्रश्ने व ज्ञानी उत्तराने विद्वानांना आश्चर्यात पाडले होते. मंदिरातील पुढाऱ्यांचे आता वेगळे आचरण होते:

"हा मनुष्य आमचा राजा असावा हे आम्हाला नाही पाहिजे!" (लूक 19:14)

म्हणून त्यांनी येशूवर स्फोटक प्रश्नांचा हमला केला, ही आशा ठेवून की सामान्य लोकांना त्याच्या विरोधात करावे.

त्यांच्या संधीसाठी वाट पाहत, पुढाऱ्यांनी प्रामाणिक मनुष्य असे सोंग करीत हेर पाठविले. त्यांनी येशूला असे काहीतरी म्हणावे म्हणून प्रयत्न केला जे रोमन राज्यपालला सांगावे म्हणजे येशूला अट क करता येईल.

त्यांनी त्याला म्हटले, "गुरुजी, आपण यथार्थ बोलता व शिक्षण देता; पक्षपात करीत नाही, तर देवाचा मार्ग खरोखर शिकविता, हे आम्ही जाणून आहो; कैसराला कर देणे हे आम्हांस योग्य आहे की नाही?" (लूक 20:20-22)

येशूने काय उत्तर दिले पाहिजे होते? जर त्याने म्हटले असते, "होय, सम्राटाला कर द्यावा," तर यहूदी लोक त्यांच्याप्रति अप्रामाणिकसाठी त्यास दोष देतील. याउलट, जर येशूने उत्तर दिले, "नाही, कर भरू नका," तर रोमन राज्यपालला हे कळेल आणि ते त्यास देशद्रोह साठी दोषी ठरवितील.

त्याने त्यांच्या कपटी योजनेकडे पाहिले आणि म्हटले, "मला एक रोमन नाणे दाखवा. यावर मुखवटा व लेख कोणाचा आहे?"

ते म्हणाले, "कैसराचा,"

"तेव्हा त्याने त्यांस म्हटले, "तर कैसराचे ते कैसराला द्या व देवाचे ते देवाला भरून द्या."

म्हणून त्याने लोकांसमोर जे बोलले होते त्याद्वारे ते त्यास अडकविण्यात अपयशी ठरले. त्याऐवजी, ते त्याच्या उत्तराने आश्चर्यचकित झाले, आणि ते स्तब्ध झाले. (लूक 20:23-26)

पुन्हा व पुन्हा, धार्मिक पुढाऱ्यांच्या वेगवेगळ्या गटांनी येशूला बोलण्यात अडकविण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रत्येकवेळी त्याने त्यांना परिपूर्ण ज्ञानाने उत्तर दिले.

त्यानंतर, आणखी प्रश्ने त्याला विचारावयास कोणाला धैर्य झाले नाही. (मत्तय 22:46)

लाजिरवाणे केल्यामुळे, ती मनुष्ये हळूच निघून गेली की प्रमुख याजकासह षडयंत्र रचावे की येशूला अटक करावी व जिवंत मारावे. काय हा आंधळेपणा! हे याजक, जे मंदिरात वेदीवर बलिदाने अर्पणे करण्यास जबाबदार होते, त्यांना काही कल्पना नव्हती की ज्या मनुष्याला ते जिवंत मारू पाहत होते हा तोच एक होता ज्यास त्या बलीदानांमध्ये चित्रित केलेले होते.

परमेश्वराची गुप्त योजना ही लवकरच पूर्ण होणार होती.





## दृश्य 58

# राजाला अटक करण्यात आले

बलिदान करण्याच्या वार्षिक मेजवानीची ती संध्याकाळ होती, ज्यास वल्हांडण[16] म्हणतात. पुढील दिवशी हजारो कोकरे हे मारले जाणार होते.

जरी येशूला हे ठाऊक होते की त्यास सुद्धा पुढील दिवशी जिवंत मारण्यात येईल, त्याने ती संध्याकाळ त्याच्या शिष्यांसोबत शेवटले भोजन घेत घालविली. भोजना दरम्यान, त्याने भाकर घेतली, त्यास आशीर्वाद दिला, ती मोडली, आणि त्यांना खाण्यास दिली. त्याने प्याला सुद्धा त्यांना दिला. त्याने त्यांना सांगितले मोडलेल्या भाकरीने त्यांना त्याच्या शरीराविषयी आठवण द्यावी आणि लाल रस ने त्यांना त्याच्या रक्ताविषयी आठवण द्यावी जे सांडण्यात येईल की पापांच्या क्षमेकरिता नवीन करार आणावा.

मध्यरात्रीच्या वेळी, त्याने त्याच्या शिष्यांना एका बागेमध्ये नेले ज्यास गेथसेमाने म्हणतात. तेथे, जो भयंकर प्रकार होणार आहे तो जाणून, त्याने त्याच्या पित्याकडे प्रार्थना केली.

मग, जसे काही सूचना मिळाली आहे, धार्मिक पुढारी शस्त्रधारी मनुष्यांसह घोळक्याने तेथे पोहचले. येशूने त्यांना म्हटले,


> "जसे लुटारूवर तरवारी व सोटे घेऊन जावे तसे तुम्ही मला धरावयास बाहेर आला काय? मी प्रतिदिवशी मंदिरात बसून शिक्षण देत असे तरी तुम्ही मला धरिले नाही; पण संदेष्ट्यांचे लेख पूर्ण व्हावे म्हणून हे सर्व झाले."
>
> इतक्यात सर्व शिष्य त्याला सोडून पळाले. (मत्तय 26:55-56)

येशूने त्या लोकांना त्यास बांधू दिले व त्यास प्रमुख याजकाच्या घराकडे नेऊ दिले जेथे यहूदी पुढारी एकत्र झाले होते. तेथे अनेक लोकांनी येशू विषयी खोटे बोलले.

> तेव्हा प्रमुख याजकाने मध्ये उभे राहून येशूला विचारिले, "तू काही उत्तर देत नाहीस काय? हे तुझ्याविरुद्ध साक्ष देतात हे काय?" तथापि तो उगाच राहिला; त्याने काही उत्तर दिले नाही. पुनः प्रमुख याजकाने त्याला विचारिले, "धन्यवादिताचा पुत्र ख्रिस्त तो तू आहेस काय?"
>
> येशूने म्हटले, "मी आहे." "आणि तुम्ही मनुष्याच्या पुत्राला सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसलेले व आकाशाच्या मेघांसह येतांना पाहाल."
>
> तेव्हा प्रमुख याजक आपली वस्त्रे फाडून बोलला, "आम्हांस साक्षीदारांची आणखी काय गरज? हे दुर्भाषण तुम्ही ऐकले आहे; तुम्हांला कसे वाटते?"
>
> तेव्हा हा मरणदंडास पात्र आहे, असे सर्वांनी ठरविले.
>
> मग कित्येक त्याजवर थुंकू लागले, त्याचे तोंड झाकून व त्याला बुक्या मारून, अंतर्ज्ञानाने बोल, असे त्याला म्हणू लागले, आणि कामदारांनी त्याला चपडाका मारून आपल्या ताब्यात घेतले. (मार्क 14:56, 60-65)

यहूदी न्यायालयाने मृत्यूची शिक्षा ठोठावली होती, परंतु त्यांच्याकडे अधिकार नव्हता की तसे प्रत्यक्षात करावे. केवळ रोमन न्यायालय हे करू शकत होते.





## दृश्य 59

# राजाला दोषी ठरविण्यात आले

ही पहाट होती जेव्हा धार्मिक शासक व मोठ्या जमावाने येशूला प्रमुख याजकाच्या घरापासून यरुशलेमेच्या रस्त्यातून रोमन राज्यपाल, पंत पिलातच्या राजवाड्याकडे नेले.

धार्मिक पुढाऱ्यांना पाहिजे होते की पिलाताने येशूला मृत्यूदंड द्यावा.

> ते लगेचच त्यांचे प्रकरण स्पष्ट करू लागलेः "हा मनुष्य आमच्या राष्ट्राला फितविताना, कैसराला कर देणे मना करिताना, आणि मी स्वतः ख्रिस्त राजा आहे असे म्हणताना आम्हांस आढळला."
>
> [येशूची चौकशी केल्यावर] पिलात प्रमुख याजक व जमावाकडे वळला आणि म्हणाला, "मला या मनुष्याच्या ठायी काही दोष आढळत नाही!" (लूक 23:2, 4)
>
> "जर तो अपराधी नाही," त्यांनी उत्तर दिले, "तर आम्ही त्याला तुमच्या स्वाधीन केले नसते." ........
>
> पिलात मग पुन्हा कचेरीत गेला, येशूला पुन्हा बोलावून आणले आणि त्यास विचारले, "तू यहूद्यांचा राजा आहेस काय? .....तू काय केलेस?"
>
> येशूने म्हटले, "माझे राज्य या जगाचे नाही; माझे राज्य या जगाचे असते तर मी यहूद्यांच्या स्वाधीन होऊ नये म्हणून माझ्या शिपायांनी लढाई केली असती, परंतु माझे राज्य येथील नाही."
>
> "तर तू राजा आहेस!" पिलात म्हणाला.
>
> येशूने उत्तर दिले की "मी राजा आहे असे तू म्हणतोस, मी यासाठी जन्मलो आहे व यासाठी जगात आलो आहे की मी सत्याविषयी साक्ष द्यावी. जो कोणी सत्याचा आहे तो माझी वाणी ऐकतो."
>
> "सत्य काय आहे?" पिलाताने विचारले.
>
> यासह तो पुन्हा बाहेर यहूद्यांकडे गेला आणि म्हटले, "याच्याठायी मला काही अपराध दिसत नाही." (योहान 18:30, 33, 35-38)

परंतु जमाव ओरडत राहिला,

> "त्यास वधस्तंभी खिळा! वधस्तंभी खिळा!"
>
> तो तिसऱ्याने म्हणाला, "का? त्याने काय वाईट केले आहे? त्याजकडे मरणास योग्य असा काही दोष मला आढळला नाही; यास्तव मी याला फटके मारून सोडून देतो."
>
> पण याला वधस्तंभाशी खिळावे असा त्यांनी मोठ्याने ओरडून आग्रह केला; आणि त्यांच्या ओरडण्याला यश आले. (लूक 23:21-23)

पिलातास ठाऊक होते की येशू निर्दोष आहे, परंतु कारण धार्मिक पुढारी व त्यांच्या जमावाने तो घाबरला होता, म्हणून त्याने येशूला मृत्यूची शिक्षा देण्यास दोषी ठरविले.





## दृश्य 60

# राजाला मुकुट घालण्यात आले

पिलाताने येशूला रोमन नियमाची अत्यंत कठीण शिक्षा ठोठावलीः क्रूर फटके मारणे व त्यानंतर वधस्तंभावर खिळणे. दोषी अपराध्यांस एका चाबकाने ज्यास नोकदार धातूचे तुकडे लावलेले आहेत त्याद्वारे फटके मारले जात असत.

सातशे वर्षांपूर्वी, प्रभूने संदेष्टा यशयाला हे लिहिण्यास सांगितले होतेः

> "मी मारणाऱ्यांपुढे आपली पाठ केली, केस उपटणाऱ्यांपुढे मी आपले गाल केले; उपमर्द व छिथू यांपासून मी आपले तोंड चुकविले नाही." (यशया 50:6)

शुभवर्तमान आपल्याला सांगते की प्रभूला फटके मारल्यावर काय घडले.

> राज्यपालाच्या काही सैनिकांनी येशूला त्यांच्या कचेरीत नेले आणि संपूर्ण पलटण बोलाविली.
>
> त्यांनी त्याची वस्त्रे काढली आणि त्यास किरमिजी झगा घातला.
>
> काट्यांचा मुकुट गुंफून त्याच्या मस्तकावर ठेविला, त्याच्या उजव्या हातात वेत दिला आणि त्याच्यापुढे गुडघे टेकून, "हे यहूद्यांच्या राजा, तुझा जयजयकार होवो!" असे म्हणून त्यांनी त्यांची थट्टा मांडिली. ते त्याजवर थुंकले व तो वेत घेऊन त्याच्या मस्तकावर मारू लागले. (मत्तय 27:27-30)

सैनिक हे काट्यांच्या मुकुटच्या अर्थाविषयी अज्ञानी होते जो त्यांनी येशूच्या मस्तकावर रुतविला होता. कांटे हे शापाचा भाग आहेत जे पृथ्वीवर आदामाच्या पापामुळे आले होते. गौरवाचा पवित्र राजा हा आला होता की आपल्यासाठी पापाचा शाप घ्यावा.

> मग त्याची थट्टा केल्यावर त्यांनी त्याच्या अंगातून तो झगा काढून त्याची वस्त्रे त्याच्या अंगात घातली, आणि त्याला वधस्तंभावर खिळण्याकरिता नेले. (मत्तय 27:31)


दोषी ठरलेल्या दोन अपराध्यांस सुद्धा येशू बरोबर घेऊन गेले. ज्या ठिकाणी त्यांना वधस्तंभी देण्यात येणार होते तेथपर्यंत प्रत्येकाला त्याचा वधस्तंभ उचलून नेण्यास सांगितले होते.

ह्या क्रूर मिरणुकीच्या मार्गात अर्ध्यावर, रोमन सैनिकांनी उत्तर आफ्रिकेच्या एका मनुष्यावर जबरदस्ती केली की येशूचा वधस्तंभ उचलून चालावे. मग ते, यरुशलेमेच्या दाटीच्या रस्त्यातून, नगराच्या वेशी बाहेर एका टेकडीवर गेले ज्यास गुलगुथा म्हणतात, डोंगर मोरियाचा उत्तरी भाग, जेथे 1,900 वर्षांपूर्वी, संदेष्टा अब्राहामने म्हटले होते,

> "बाळा, परमेश्वर स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल." (उत्पत्ति 22:8)

त्या कोकऱ्यासाठी ही मरणाची वेळ होती.





## दृश्य 61

# राजाला वधस्तंभी खिळण्यात आले

वधस्तंभी खिळण्याची ही कधी बनविली गेली अशी जिवंत मारण्याची सरकार-मान्य सर्वात भयंकर पद्धत होती. त्यातच तीव्र यातनेमध्ये सार्वजनिक लज्जेचा भरणा होता, वधस्तंभात किंवा झाडामध्ये अपराध्यांचे हात व पाय खिळ्याने खिळण्याअगोदर रोमन सैनिक अपराध्यांस निर्वस्त्र करीत असत.

> जेव्हा ते कवटी म्हटलेल्या स्थानी आले, तेथे त्यांनी अपराध्यांसह त्यास वधस्तंभी खिळिले - एकाला त्याच्या उजवीकडे, दुसऱ्याला त्याच्या डावीकडे. येशूने म्हटले, "हे बापा, त्यांना क्षमा कर, कारण हे काय करितात हे ह्यांना समजत नाही."
>
> नंतर त्यांनी चिठ्या टाकून त्याची वस्त्रे वाटून घेतली. लोक पाहत उभे होते; अधिकारीही 'उपहास करीत म्हणाले,' "त्याने दुसऱ्यांस तारिले, जर तो देवाचा ख्रिस्त, त्याचा निवडलेला असला तर त्याने स्वतःचा बचाव करावा," (लूक 23:33-35)

जर येशूने स्वतःला वाचविले असते, तर तो आपल्याला वाचवू शकला नसता. जमावाला काही कल्पना नव्हती की परमेश्वराने जे संदेष्टा दाविदास जे बोलले होते ते पूर्ण करीत होतेः

> "त्यांनी माझे हातपाय विंधिले आहेत.....ते मजकडे टक लावून पाहतात. ते माझी वस्त्रे आपसांत वाटून घेतात आणि माझ्या पेहरावावर चिठ्या टाकितात......मला पाहणारे सर्व माझा उपहास करितात, वाकुल्या दाखवितात, थट्टेने डोके हालवितात; 'ते म्हणतात, परमेश्वरावर आपला हवाला टाक; तो त्याला मुक्त करो; तो त्याला सोडवो, तो त्याचा आवडता आहे!" (स्तोत्र 22:16-18, 6-8)

परमेश्वराची वाचविण्याची योजना ही प्रत्येक बारकाईने पूर्ण झाली.

त्याच डोंगरावर[11] जेथे संदेष्टा अब्राहामने म्हटले होते, "परमेश्वर स्वतः कोकरू पुरवेल," आणि "परमेश्वर पुरवेल" (उत्पत्ति 22:8, 14), परमेश्वराने त्याचा स्वतःचा कोकरू पुरविला-येशू.

तुम्हांला आठवते काय की वेदीवरील लाकडावर किती निष्पाप कोकरू बलिदान केले गेले होते की अब्राहामाच्या दोषी पुत्राची खंडणी भरावी? आता देवाचा पापरहित पुत्र एका लाकडाच्या वधस्तंभावर बलिदान केला गेला होता की आदामाच्या दोषी वंशजांची खंडणी भरावी. परमेश्वराने अब्राहामाच्या पुत्राला वाचविले होते, परंतु त्याने त्याच्या स्वतःच्या पुत्राला वाचविले नाही, परंतु आपल्या सर्वांसाठी त्यास देऊन टाकले" (रोम. 8:32).

> देवाने जगावर एवढी प्रीति केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (योहान 3:16)
>
> देवाने खंडणी भरली की तुम्ही जे रिकामी जीवन तुमच्या वाडवडिलांकडून वारशाने प्राप्त केले होते त्यापासून तुम्हांला सोडवावे. आणि खंडणी जी त्याने भरली ही केवळ सोने किंवा चांदी नव्हती. त्याने तुमच्यासाठी ख्रिस्त, जो निष्कलंक व निर्दोष कोकरा याच्या मूल्यवान रक्ताने किंमत भरली. (1 पेत्र 1:18-19)

हे इतके तुम्ही देवा साठी महत्वपूर्ण आहात.





## दृश्य 62

# तारण करणारा राजा

परमेश्वराची वाचविण्याची योजना पूर्ण करण्यासाठी, प्रभु येशूने लज्जा अनुभविली जे पाप आणते. तो आपल्या ठिकाणी शापित झाला. ज्या शिक्षेस आपण पात्र होतो ती त्याने भोगली.

ज्यादिवशी आदामाने देवाचे नियम मोडले, देवाने याची ओळख करून दिली की मशीहा हा एके दिवशी सर्पाचे डोके ठेचेल. देवाने सैतानाला सांगितले होते,

"ती तुझे डोके फोडील, व तू तिची टाच फोडिशील." (उत्पत्ति 3:15)

सैतान तारणाऱ्याच्या टाचेवर प्रहार करीत आहे याविषयी प्राचीन, गूढ भविष्यवाणीने भाकीत केले होते की देवाचा कोकरा वधस्तंभावर लज्जा व यातना सहन करेल कारण "तो आपल्या अपराधांमुळे घायाळ झाला" (यशया 53:5)

ते ज्यांनी येशूला वधस्तंभी खिळिले ते देवाच्या गुप्त योजनेविषयी अजाण होते.

> या युगांतल्या अधिकाऱ्यांतील कोणालाही कळत नाही; त्यांना कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळिले नसते. कारण ज्यांचा नाश होत आहे त्यांस वधस्तंभाविषयीचे शिक्षण मुर्खपण आहे; तरी ज्यांस तारण प्राप्त होत आहे अशा आपणांस ते देवाचे सामर्थ्य आहे. (1 करिंथ 2:8; 1:18)

येशूचा वधस्तंभ हा दोन अपराध्यांच्यामध्ये होता.

> एक अपराधी जो तेथे लटकलेला होता त्याने त्याची थट्टा केलीः "तू ख्रिस्त आहेस ना? तर स्वतःचा व आमचा बचाव कर!"
>
> परंतु दुसऱ्या अपराध्याने त्यास धमकाविले. "तुलाही तोच दंड असता "तू देवाला भीत नाहीस काय?" "आपला दंड तर यथान्याय आहे; कारण आपण आपल्या कर्माचे योग्य फळ भोगीत आहो; परंतु याने काही अयोग्य केले नाही." मग तो म्हणाला, "हे येशू, तू आपल्या राजाधिकाराने येशील तेव्हा माझी आठवण कर."
>
> येशूने त्यास उत्तर दिले, "मी तुला खचित सांगतो, तू आज मजबरोबर सुखलोकांत असशील." (लूक 23:39-43)

पहिल्या अपराध्यांस केवळ त्याच्या शारीरिक दुःखापासून स्वतःला वाचवायचे होते. त्याने हा विचार केला नाही की त्याच्या ठिकाणी मरण्यासाठी त्याला एका तारणाऱ्याची गरज आहे.

दुसऱ्या अपराध्याने सुद्धा येशूची थट्टा केली होती. परंतु जेव्हा तो मृत्यूला तोंड देत होता, त्याचे हृदय बदलले. त्यास पाहिजे होते की प्रभूने त्यास सैतानाच्या राज्यापासून सोडवावे. त्यास पाहिजे होते की देवाच्या राज्याचे नागरिक व्हावे, जर राजा त्यास मान्य करेल. येशूच्या उत्तराने कोणतीही शंका मागे ठेवली नाहीः

"तू आज मजबरोबर सुखलोकांत असशील." (लूक 23:43)

नंतर त्या संध्याकाळी, दोघेही अपराधी मरण पावले. एक नरकात गेला. दुसरा सुखलोकांत गेला. कशाने फरक केला होता?

तारण करणाऱ्या राजावर एकाने विश्वास ठेविला नाही, दुसऱ्याने केला होता.





# दृश्य 63
# शेवटचे बलिदान

आता दुपारची वेळ होती. येशू आता अगोदरच वधस्तंभावर तीन तासापासून होता. काळे ढग जमा झाले. दिवस रात्री प्रमाणे झाला. भयभीत झालेले बघे लोक निघून गेले. त्या टेकडीवर पूर्णपणे शांतता पसरली होती. तीन तासानंतर, येशूने मोठ्याने ओरडून म्हटले,

"माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा का त्याग केलास?" (मत्तय 27:46)

वधस्तंभाच्या वेदीवर, देवाच्या सार्वकालिक पुत्राला स्वर्गातील देवाकडून वेगळे झाल्याची भयंकर जाणीव झाली. त्या अंधाऱ्या तासाच्या दरम्यान, मनुष्यांच्या डोळ्यापासून लपलेले, देवाने आपली सर्व पापे घेतली आणि त्याच्या पवित्र पुत्रावर ठेवली होती. येशू हा शेवटचे बलिदान झाला होता.

जसे काही भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्य काळाची जगाची पापे येशू वर लादण्यात आली होती, स्वर्गातील देवाला दुसरीकडे पाहावे लागले कारण त्याचे "डोळे इतके पवित्र आहेत की दुष्टता तुझ्याने पाहवत नाही" (हबक्कूक 1:13) तीन तास, देवाचा क्रोध त्याच्या स्वतःच्या होमार्पणावर पापा विरुद्ध भडकला होता. वेदीवर बलिदान केलेल्या कोकऱ्याप्रमाणे, देवाचा कोकरा हा स्वर्ग व पृथ्वीच्यामध्ये, परमेश्वर व मानवाच्यामध्ये वधस्तंभावर लटकलेला होता. असीमित जण याने योग्य वेळी नरकाची आपली यातना सहन केली जेणेकरून आपण सार्वकालिकतेमध्ये त्यास भोगू नये.

मग ते सर्व पूर्ण केले गेले.

हे जाणून की पापी ज्या शिक्षेस पात्र होते ते त्याने शोषले होते आणि हे की त्याने जुन्या कराराच्या भविष्यवाण्या पूर्ण केल्या होत्या, येशूने म्हटले,

"पूर्ण झाले आहे!"

मग त्याने मस्तक लववून आपला आत्मा समर्पण केला. (योहान 19:30)

त्या क्षणी मंदिरातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागाला. पृथ्वी हादरली व खडक फुटले. (मत्तय 27:51)

अनेक शतके, कोकरा हा मंदिराच्या वेदीवर जिवंत मारला व जाळला जात होता.

जेव्हा येशू मरण पावला, देवाने तो पडदा फाडून मार्ग उघडा केला ज्याने विशेष खोलीला लपविले होते जेथे पाप झाकण्यासाठी प्रत्येक वर्षी रक्त शिंपडले जात होते. पडदा दुभागल्या द्वारे, परमेश्वर घोषित करीत होताः हे पूर्ण झाले आहे! *पापाचे कर्ज हे पूर्णपणे भरले गेले आहे! माझ्या कोकऱ्याने जगाच्या पापाकरिता त्याचे पवित्र रक्त सांडले आहे. पापासाठी प्राण्यांचे रक्त मी येथून पुढे स्वीकारणार नाही. माझा प्रिय पुत्र हा शेवटले बलिदान आहे. ते सर्व जे त्याच्यामध्ये विश्वास ठेवतात, त्यांच्यासाठी स्वर्गाचे दार रुंद असे उघडे आहे!* (नवीन करारात इब्री लोकांस पत्र पाहा)

सातशे वर्षांपूर्वी, यशया संदेष्ट्याने लिहिले,

> खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांस शांति देणारी अशी शिक्षा त्यास झाली; त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले. आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपआपला मार्ग धरिला होता; अशा आम्हां सर्वांचे पाप परमेश्वराने त्याजवर लादिले. (यशया 53:5-6)

पूर्ण झाले आहे.





## दृश्य 64
# राजाला पुरण्यात आले

नासरेथचा येशू मरण पावला होता. फक्त याची खातरी करावी म्हणून, एका सैनिकाने त्याच्या कुशीत भाला भोसकला. रक्त व पाणी लगेचच बाहेर आले.

शिष्यांची आशा ही संपली होती. हा विचार की येशूने रोमन लोकांना ठेचावयास पाहिजे होते आणि पृथ्वीवर त्याचे राज्य स्थापन करावयाचे होते, शिष्य अजून त्याचे आश्वासन की तिसऱ्या दिवशी पुन्हा उठावे हे समजले नव्हते.

वधस्तंभी खिळलेल्या अपराध्यांची मृत शरीरे सामान्यपणे नगरा बाहेर कचऱ्यात असे किंवा कबरेंच्या ढिगायात फेकून दिली जात असत. असे येशूच्या शरीराबरोबर झाले नाही. सातशे वर्षांपूर्वी, संदेष्टा यशयाने लिहिले होते,

> "त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमिली होती आणि तो मेल्यावर धनवंतांची कबर त्यास प्राप्त झाली......." (यशया 53:9)

देवाने त्याच्या पुत्राला सन्मानार्थ एका कबरेमध्ये पुरण्याची योजना केली होती.

> मग संध्याकाळ झाल्यावर अरिमथाईतील योसेफ नांवाचा एक धनवान मनुष्य आला, हाही येशूचा शिष्य होता; त्याने पिलाताजवळ जाऊन येशूचे शरीर मागितले; तेव्हा पिलाताने ते द्यावयास आज्ञा केली. (मत्तय 27:57-58)

येशूच्या मृत्यु अगोदर, अरिमथाईतील योसेफ आणि त्याचा मित्र निकदेम हे येशू जो मशीहाचे गुप्त अनुयायी होते. ते धार्मिक पुढाऱ्यांना घाबरत होते. परंतु येशूला वधस्तंभावर दुःख भोगताना पाहिल्यावर, ते आता घाबरत नव्हते. म्हणून त्यानी येशूचे शरीर घेतले, ते धुतले आणि जवळजवळ 35 किलो गंधरससह तागाच्या स्वच्छ वस्त्राच्या पट्ट्या मध्ये गुंडाळले, तशाच प्रकारचे शरीराला लावण्याचे महाग मसाले मागी लोकांनी बाळ येशूला दिले होते. पुढे त्यांनी शरीराला योसेफाच्या स्वतःच्या नवीन कबरेमध्ये ठेवले. प्रवेशद्वाराजवळ एक मोठा दगड लोटून, ते घरी गेले.

ते एक राजेशाही पुरणे होते, एक राजाला योग्य असे होते.

पुढील सकाळी धार्मिक पुढारी पिलाताकडे गेले.

> "महाराज, तो ठक जिवंत असता तीन दिवसांनंतर मी उठेन, असे म्हणाला होता, याची आम्हांस आठवण आहे; म्हणून तिसऱ्या दिवसापर्यंत कबरेचा बंदोबस्त करावयास सांगावे, नाहीतर कदाचित त्याचे शिष्य रात्री येऊन त्याला चोरून नेतील, व तो मेलेल्यांतून उठला आहे, असे लोकांस सांगतील; मग शेवटली फसगत पहिल्यापेक्षा वाईट होईल."
>
> "पिलात त्यांस म्हणाला," तुमच्याजवळ पहारा आहे; "जा, तुमच्याने होईल तसा बंदोबस्त करा." मग पहारा बरोबर घेऊन ते गेले आणि त्यांनी धोंडीवर शिक्का मारून कबरेचा बंदोबस्त केला. (मत्तय 27:63-66)

यादरम्यान, कबरेमध्ये, येशूच्या शरीरास काय होत होते?

काही नाही.





## दृश्य 65
# रिकामी कबर

कारण ज्यादिवशी आदामाने पाप केले, मृत्यूने मानवी कुटुंबावर क्रूर राजासारखे राज्य केले होते. जर येशूने कधी पाप केले असते, मृत्यूने त्याच्या शरीराला सुद्धा झिजणे, सडणे आणि सावकाश मातीमध्ये बदलले असते. परंतु 1,000 वर्षांपूर्वी, संदेष्टा दावीदने लिहिले आहे,

> "तू आपल्या भक्तास गर्तेचा अनुभव घडू देणार नाहीस." (स्तोत्रसंहिता 16:9-10)

ज्याने कधीही पाप केले नाही त्या एकमेव जण वर मृत्यु व कबरेला काही सामर्थ्य नाही.

येशूला जिवंत मारले व पुरले गेल्याच्या तीन दिवसांनंतर, रविवारी भल्या पहाटे, अनेक स्त्रिया कबरेजवळ आल्या की त्यांचा आदर व्यक्त करावा. अचानक, तेव्हा पाहा, मोठा भूमिकंप झाला जेव्हा स्वर्गातून एक देवदूत खाली आला, त्याने धोंड एकीकडे लोटली आणि तीवर तो बसला. सैनिकांना मूर्च्छा आली, परंतु दूताने स्त्रियांना म्हटले,

> "तुम्ही भिऊ नका; वधस्तंभावर खिळिलेला येशू याचा शोध तुम्ही करिता, हे मला ठाऊक आहे. तो येथे नाही, कारण त्याने सांगितल्याप्रमाणे तो उठला आहे. या, तो निजला होता ते हे स्थळ पाहा; आणि लवकर जाऊन त्याच्या शिष्यांस सांगा की तो मेलेल्यांतून उठला आहे....... "
>
> तेव्हा त्या स्त्रिया कबरेजवळून पळाल्या. त्या भयभीत झाल्या होत्या परंतु मोठ्या आनंदाने सुद्धा भरल्या होत्या, आणि त्या घाईने गेल्या की शिष्यांना शोधावे की त्यांना दूताचा संदेश द्यावा.
>
> आणि जेव्हा त्या गेल्या, येशू त्यांना भेटला. "अभिवादन!" त्याने म्हटले. आणि ते त्याच्याजवळ आल्या, त्याचे पाय धरले, आणि त्याची उपासना केली. (मत्तय 28:5-9)

त्यादरम्यान, सैनिक नगरात आले आणि काय घडले ते धार्मिक पुढाऱ्यांना सांगितले. म्हणून पुढाऱ्यांनी त्यांना मोठी रक्कम लाच दिली, त्यांना हे सांगत,

> "आम्ही झोपेत असतां त्याच्या शिष्यांनी रात्री येऊन त्याला चोरून नेले, असे म्हणा." (मत्तय 28:13)

परंतु त्यांचे खोटेपण सत्याला लपवू शकले नाही. कबर रिकामी होती!
त्याच्या मृत्यू द्वारे, येशूने आमच्या पापाचे ऋण भरले.
त्याच्या पुरण्याने, येशू मृत्यु व झिजण्याच्या खळग्यात खाली गेला.
त्याच्या पुनरुत्थाना द्वारे, येशूने मृत्यूवर विजय मिळविला, आणि आता म्हणतो,

> "भिऊ नको; जो पहिला व शेवटला, आणि सदाजीवी 'तो मी आहे;' मी मेलो होतो तरी पाहा, युगानुयुग जिवंत आहे, आणि मरणाच्या व अधोलोकाच्या किल्ल्या मजजवळ आहेत." (प्रकटीकरण 1:17-18)

ते सर्व जे ह्या सुवार्तेवर विश्वास ठेवतात, मृत्यु हा केवळ द्वार आहे जे राजाच्या उपस्थितीमध्ये उघडते जो म्हणतो,

"कारण मी जिवंत आहे, तुम्ही सुद्धा जिवंत राहाल." (योहान 14:19)





## दृश्य 66

# संदेष्ट्यांचा संदेश

त्याच्या पुनरुत्थानाच्या दिवशी, येशू त्याच्या अनेक शिष्यांना दिसला; प्रथम स्त्रियांना, मग पेत्र, आणि मग पुढे दोन प्रवाश्यांना......

त्याच दिवशी येशूचे दोन अनुयायी हे अम्माऊस गावी चालत जात होते, जे यरुशलेमेपासून सात मैलावर होते.

येशू स्वतः अचानक आला आणि त्यांच्याबरोबर चालू लागला. परंतु देवाने त्यास त्यांना ओळखू दिले नाही. त्याने त्यांना विचारले, "तुम्ही चालताना ज्या गोष्टी एकमेकांबरोबर अत्यंत ध्यानपूर्वक बोलत आहा त्या कोणत्या?"

तेव्हा ते म्लानमुख होऊन उभे राहिले. मग त्यांच्यातून क्लयपा नामे एकाने त्याला उत्तर दिले, "आपण यरुशलेमातून प्रवास करीत असता त्यांत या दिवसांमध्ये घडलेल्या गोष्टी ज्याला ठाऊक नाहीत असे आपण एकटेच आहा काय?"

"तो त्यांस म्हणाला, कोणत्या गोष्टी?" (लूक 24:13, 15-19)

त्या प्रवाश्यांनी त्यास सांगितले, नासरेथकर येशूविषयी त्यांना किती आशा होती की तो मशीहा असेल की शत्रूवर विजय प्राप्त करावा. परंतु त्यास वधस्तंभी खिळिले! आणि आता कबर रिकामी आहे. *याचा काही अर्थ लागत नाही!*

मग येशूने त्यांना म्हटले, "अहो निर्बुद्धी व संदेष्ट्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींचा विश्वास धरण्यास मतिमंद मनुष्यांनो! ख्रिस्ताने ही दुःखे सोसावी आणि आपल्या गौरवात जावे, याचे अगत्य नव्हते काय?"

मग येशूने मोशे व सर्व संदेष्ट्ये यांजपासून आरंभ करून शास्त्रातील आपणाविषयीच्या सर्व गोष्टींचा अर्थ त्यांस सांगितला.

मग ज्या गांवास ते जात होते त्याजजवळ आले तेव्हा त्याने पुढे जाण्याचा रोख दाखविला; परंतु ते त्याला आग्रह करून म्हणाले, आमच्या येथे राहा; कारण संध्याकाळ होत चालली असून दिवस उतरला आहे. तेव्हा तो त्यांच्याबरोबर राहावयास आंत गेला.

मग असे झाले की तो त्यांजबरोबर जेवावयास बसला असता त्याने भाकर घेऊन आशीर्वाद दिला व ती मोडून त्यांस दिली. अचानकपणे, त्यांचे डोळे मोकळे झाले व त्यांनी त्याला ओळखीले; तोच तो त्यांजपासून अंतर्धान पावला!

तेव्हा ते एकमेकांस म्हणाले, "तो वाटेने आपल्याबरोबर बोलत होता व शास्त्राचा उलगडा करीत होता तेव्हा आपले अंतःकरण आंतल्याआंत उकळत नव्हते काय?" (लूक 24:25-32)

त्याच घटकेस ते उठून यरुशलेमास माघारी घाईघाईने गेले की शिष्यांना सांगावेः प्रभु जिवंत आहे! पवित्र शास्त्रातील तो आश्वासित तारणारा आहे! अर्पणांमध्ये चित्रित केलेला तो कोकरा आहे! *तो प्रभु आहे!*

शेवटी संदेष्ट्यांच्या संदेशाने काही अर्थ दिला.

परिपूर्ण अर्थाने.





# दृश्य 67
# परिवर्तीत शरीर

ती रविवारची संध्याकाळ होती. शिष्य एकत्र होते, दार बंद होते. अचानकपणे येशू खोलीमध्ये दिसला आणि म्हणाला,

> “तुम्हांस शांति असो!”
>
> त्याने हे म्हटल्यावर, त्याने आपले हात व कूस त्यांस दाखविली. तेव्हा प्रभूला पाहून शिष्यांना आनंद वाटला. (योहान 20:19-20)

थोमा, येशूचा बारा शिष्यांतील एक शिष्य, त्या संध्याकाळी तेथे नव्हता. नंतर, शिष्यांनी त्यास हे सांगितले, “आम्ही प्रभूला पाहिले!”

> परंतु थोमा त्यांना म्हणाला, “त्याच्या हातात खिळ्यांचे वण पाहिल्यावाचून व त्याच्या कुशीत आपला हात घातल्यावाचून मी विश्वास धरणारच नाही.”
>
> आठवड्यानंतर त्याचे शिष्य पुन्हा घरात होते, आणि थोमा सुद्धा त्यांच्याबरोबर होता. जरी दार बंद होते, येशू आला व त्यांच्यासमोर उभा राहिला व म्हटले, “तुम्हांस शांति असो!”
>
> मग त्याने थोमाला म्हटले, “तू आपले बोट पुढे करून माझे हात पाहा, आणि आपला हात इकडे करून माझ्या कुशीत घाल; आणि विश्वासहीन असू नको, तर विश्वास धरणारा हो.”
>
> थोमाने त्यास म्हटले, “माझा प्रभु व माझा देव!”
>
> मग येशूने त्यास म्हटले, “तू मला पाहिले आहे म्हणून विश्वास धरिला आहे; पाहिल्यावाचून विश्वास धरणारे ते धन्य.” (योहान 20:24-29)

पुढील चाळीस दिवस, प्रभु त्याच्या शिष्यांना अचानकपणे भेट देत राहिला, त्यांच्याबरोबर बोलत असे, आणि मग अदृश्य होत असे. येशूचे पुनरुत्थित शरीर भिंतीमधून जाऊ शकत होते आणि विचाराच्या वेगाने प्रवास करू शकत होते. तर असे शरीर असणारा तोच प्रथम होता, तो शेवटचा नसेल.

> जसे आपण पृथ्वीवरील मनुष्याच्या प्रतिमेमध्ये जन्मले आहोत, तसेच आपण स्वर्गीय मनुष्याची प्रतिमा धारण करू.
>
> कारण मनुष्याच्या द्वारे मरण आले, म्हणून मनुष्याच्या द्वारे मेलेल्यांचे पुनरुत्थान आहे. जसे आदामामध्ये सर्व मरतात तसे ख्रिस्तामध्ये सर्व जिवंत केले जातील. (1 करिंथ. 15:49, 21-22)

तुम्हांला समजते काय की देवाच्या राज्यात जगण्याचा अधिकार प्राप्त करण्याचा कोणताही मार्ग नसल्यासह तुम्ही एक असहाय्य पापी आहात? तुम्ही विश्वास ठेवता काय की प्रभु येशू तुमच्या ठिकाणी तुमच्या पापांसाठी मरण पावला आणि पुन्हा जिवंत झाला, तुमच्यासाठी मृत्यूला पराभूत केले? जर तसे आहे, तर मग परमेश्वर म्हणतो तुम्ही आतापासून आदामामध्ये नाही. परमेश्वर तुम्हांला ख्रिस्तामध्ये नीतिमान असे पाहतो. एके दिवशी तुम्ही सुद्धा एक परिवर्तीत शरीर प्राप्त कराल-त्याच्यासारखे.

परंतु खिळ्यांच्या वणा शिवाय.





# दृश्य 68
# प्रस्थान

सत्ता जी आदामाने सैतानाला गमाविली होती, येशूने ती परत घेतली होती. सैताने व भुते, वारा व लाटा, आजार व भूक, पाप व मृत्यू वरील त्याच्या संपूर्ण अधिकारा द्वारे -येशूने दाखविले की तो पूर्णपणे नियंत्रण ठेवून आहे. जरी जेव्हा धार्मिक पुढारी व सैनिकांनी त्यास अटक केली, छळ केला, आणि त्यास वधस्तंभी खिळिले, त्याने ते त्यांना करू दिले.

त्यामुळेच, त्याच्या पित्याच्या घरी परत जाण्यापूर्वी, प्रभु येशू त्याच्या शिष्यांना म्हणालाः

> "'स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे; यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नामाने बाप्तिस्मा[21] द्या. जे सर्व काही मी तुम्हांस आज्ञापिले ते पाळावयास त्यांस शिकवा; आणि, पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सदोदित तुम्हांबरोबर आहे." (मत्तय 28:18-20)

येशूने त्याच्या अनुयायांना हे सुद्धा सांगितले,

"मी तुम्हांस नवी आज्ञा देतो की तुम्ही एकमेकांवर प्रीति करावी; जशी मी तुम्हांवर प्रीति केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीति करावी. तुमची एकमेकांवर प्रीति असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की तुम्ही माझे शिष्य आहा." (योहान 13:34-35)


त्याच्या पुनरुत्थानानंतर चाळीस दिवसांनी, येशूने त्याच्या शिष्यांना यरुशलेमे बाहेर जैतून डोंगरावर एकत्र केले. शिष्यांना हे जाणावयास पाहिजे होते की तो केव्हा परत येईल.

येशूने उत्तर दिले,

> "जे काल व प्रसंग पित्याने आपल्या स्वाधीन ठेविले आहेत ते ओळखणे तुम्हांकडे नाही. पवित्र आत्मा[22] तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांस सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमात, सर्व यहूदीयांत, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."
>
> असे सांगितल्यावर त्यांच्या डोळ्यादेखत तो वर घेतला गेला; आणि मेघाने त्याला त्यांच्या दृष्टीआड केले. तो जात असता ते आकाशाकडे निरखून पाहत होते, तेव्हा पाहा, शुभ्र वस्त्रे परिधान केलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे होते.
>
> "ते म्हणाले, अहो गालीलकरांनो, तुम्ही आकाशाकडे का पाहत उभे राहिला? तुम्हांपासून वर आकाशात घेतला गेला आहे तोच येशू, जसे तुम्ही त्याला आकाशात जाता पाहिले, तसाच येईल."
>
> मग ते यरुशलेमात परत आले..... (प्रेषित 1:7-12)

त्यादरम्यान वर स्वर्गामध्ये, ही वेळ होती की राजाला "गौरव व सन्मानाने मुकुटमंडित करावे" (स्तोत्रसंहिता 8:5; इब्री 2:9)





## दृश्य 69

# विजयाचा उत्सव

वैभवाची कल्पना करा. रंग. संगीत. हर्षोल्हास. लाखो देवदूत एकमेकांबरोबर बोलत आहेतः *राजा घरी येत आहे! परंतु तो वेगळा दिसेल. एक ज्याने मनुष्याला देवाच्या प्रतिमेमध्ये निर्माण केले तो कायम मनुष्याची प्रतिमा धारण करून असेल!*

जेव्हा स्वर्गीय नगरातील गडबड शांत होते.

अचानकपणे तुतारीच्या नादाच्या ईश्वर्यपूर्ण गीत द्वारे शांततेचा भंग होतो, त्यानंतर दुमदुमणाऱ्या आवाजासह  घोषणा होतेः

अहो वेशींनो, उन्नत व्हा; पुरातन द्वारांनो, उंच व्हा; म्हणजे प्रतापशाली राजा आंत येईल.
  हा प्रतापशाली राजा कोण?
बलवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धात पराक्रमी परमेश्वर तोच.
  हा प्रतापशाली राजा कोण?
सेनाधीश परमेश्वर, हाच प्रतापशाली राजा. (स्तोत्रसंहिता 24: 7-8, 10)

स्वर्गातील गर्जनेच्या प्रशंसेमुळे दार मोठे विस्तृत उघडे झाले आहे, येथे पराक्रमी येत आहे, कोकरा, युद्धाचे-व्रण घेऊन आलेला मनुष्याचा पुत्र-येशू! प्रशंसा करणाऱ्या असंख्य जणातून तो चालत आहे, त्याच्या पित्याच्या राजासनाकडे. वळत, आदामाच्या खंडणी भरून दिलेल्या वंशजांकडे तो पाहत आहे, आणि खाली बसत आहे.

नियुक्त सेवाकार्य पूर्ण केले गेले आहे.

नंतर, स्वर्गातील नागरिक त्यांच्या प्रिय राजा साठी एक नवीन गीत गात आहेतः

"तू ............... योग्य आहेस; कारण तू वधिला गेला होतास; आणि तू आपल्या रक्ताने सर्व वंश, भाषा, लोक व राष्ट्रे यांतले इसम आमच्या देवासाठी विकत घेतले आहेत." (प्रकटीकरण 5:9)

मग देवदूत राजासनाभोवती जमा झाले, देवाची स्तुति करीत, आणि हे म्हणत,

"वधलेला कोकरा ............... सन्मान, गौरव व स्तुति ह्यांचा स्वीकार करण्यास योग्य आहे!" (प्रकटीकरण 5:12)

पृथ्वीवर आज, आदामाचे अधिकतर वंशज हे अजूनही पाप व मृत्युच्या नाश होणाऱ्या सैतानाच्या राज्यात बंदिस्त आहेत. परंतु स्वतंत्रता ही उपलब्ध आहे. त्याचा मृत्यु, पुरले जाणे, आणि पुनरुत्थान द्वारे, प्रभु येशूने निर्णायक युद्ध जिंकिले आहे. त्या सर्वांना जे त्याजवर विश्वास ठेवतात, तो म्हणतो,

"तुमचे अंतःकरण अस्वस्थ होऊ नये; देवावर विश्वास ठेवा, आणि मजवरही विश्वास ठेवा. माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत; .................आणि मी जाऊन तुम्हांसाठी जागा तयार केली म्हणजे पुनः येऊन तुम्हांस आपल्याजवळ घेईन; यासाठी की जेथे मी आहे तेथे तुम्हीही असावे."

"येशूने त्याला म्हटले, मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याजवळ कोणी जात नाही." (योहान 14:1-3, 6)



## दृश्य 70

# राजा परत येत आहे

ह्या दिवसांतील एका दिवशी, जेव्हा जग हे त्याची वायफळ घोडदौड आणि खोट्या धर्मासह व्यस्त असेल, गौरवाचा राजा पृथ्वीवर परत येईल, परंतु एका नम्र गाढवावर नाही, ना ही की त्याची निंदा केली जावी आणि काट्याने मुकुटमंडित केले जावे.

पुनरुत्थित राजाने योहानाला भविष्यातील त्या दिवसाचे पूर्वावलोकन दिले आहे:

> नंतर मी स्वर्ग उघडलेला पाहिला; तो पाहा एक पांढरा घोडा आणि विश्वासू व सत्य असा म्हटलेला त्याजवर बसलेला एक स्वार माझ्या दृष्टीस पडला; तो नीतीने न्यायनिवाडा करितो, व लढाई चालवितो. त्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे व त्याच्या डोक्यावर पुष्कळ मुगुट होते..... देवाचा शब्द हे नाव त्याला देण्यात आले होते. स्वर्गातील सैन्ये पांढऱ्या घोड्यावर बसून पांढरी व शुद्ध अशी तागाची तलम वस्त्रे अंगावर घालून त्याच्यामागे चालत होती.....त्याच्या वस्त्रावर व त्याच्या मांडीवर हे नांव लिहिलेले आहे: राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभु. (प्रकटीकरण 19:11-14, 16)

जेव्हा राजा परत येतो, स्वर्गातून एक वाणी गर्जना करेल:

> "जगाचे 'राज्य' आमच्या प्रभूचे व त्याच्या ख्रिस्ताचे झाले, तो युगानुयुग राज्य करील!" (प्रकटीकरण 11:15)

राजाचे शत्रू त्याच्यासमोर वितळतील. मग तो सैतानाला बांधेल आणि थकलेल्या जगाला दाखवेल की नीतिमान राज्य हे कशा समान दिसते. पृथ्वीचा तो सर्वांत सुरेख समय असेल.

> तेव्हा परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्या दिवशी परमेश्वर तेवढा व त्याचे नाम तेवढे राहील. (संदेष्टा जखऱ्या 14:9)

न्यायाच्या दिवशी, प्रभु येशू हा न्यायाधीश असेल.

> तो धगधगीत अग्निरूप चक्रा सह एका अग्निज्वालामय आसनावर बसला, त्याच्यासमोरून अग्निप्रवाह वाहत होता. लाखो देवदूत त्याची सेवा करीत होते; लाखो त्याच्यासमोर उभे होते. मग न्यायसभा भरली; वह्या उघडल्या. (संदेष्टा दानीएल 7:9-10)

सैतान व अंधाराचे त्याचे राज्य यास "गंधकाच्या सरोवरात टाकण्यात येईल" (प्रकटीकरण 20:10). शेवटी, सर्पाचे डोके हे कायमचे ठेचले जाईल.

प्रकाशाच्या राज्याच्या नागरिकांसाठी, परमेश्वर त्यांच्यासाठी "एक नवीन स्वर्ग आणि एक नवीन पृथ्वी" निर्माण करेल......ते त्याचे लोक होतील, आणि परमेश्वर स्वतः त्यांच्याबरोबर असेल आणि त्यांचा देव होईल. तो त्यांच्या डोळ्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील; यापुढे मरण हे नाही; शोक, रडणे व कष्ट ही नसणार" (प्रकटीकरण 21:1, 3-4)

शेवटी, सर्वांची प्रार्थना जे त्यांच्या राजाला प्रेम करतात ती कायमच्या प्रत्यक्षतेमध्ये येईल.

> "तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो!" (मत्तय 6:10)

ही तुमची प्रार्थना आहे काय? गौरवाच्या राजासमोर तुम्ही नतमस्तक झाला आहात काय?

तो तुमचा राजा आहे काय?



# समाप्ती

मी तुम्हांस खचित खचित सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठविले त्याजवर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि त्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणातून जीवनात पार गेला आहे.

— येशू, गौरवाचा राजा (योहान 5:24)

तो जगात होता, व जग त्याच्या द्वारे झाले, तरी जगाने त्याला ओळखिले नाही......जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांस, म्हणजे त्याच्या नामावर विश्वास ठेवणायांस, त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.

— शुभवर्तमान (योहान 1:10, 12)

कथे मध्ये संदेश • 1

# त्यानंतर सदैव आनंदी

सर्व युगातील लोकांना प्रणय व वाचविणे याच्या काल्पनिक गोष्टी आणि  कथा ज्यांचा शेवट आनंदात होतो ते आवडतात. लोक अशा कथा सांगतात कारण एका सत्य देवाने मानवी हृदयात वाईटापासून सुटका करण्याची इच्छा व त्यानंतर सदैव आनंदात राहावे हे बनविले आहे. परंतु गौरवाच्या राजाची गोष्ट ही काल्पनिक गोष्ट नाही.




विश्वास ठेवण्यास बनविली जाणारी कथा ही पंधराशे शतकांपेक्षा अधिक काळात चाळीस संदेष्ट्यांद्वारे लिहिली जात नाही, परंतु देवाचे पुस्तक तसे लिहिले जाते. काल्पनिक कथा ही शेकडो भविष्यवाण्या, आणि पुरातत्व संशोधन द्वारे निश्चित केली जात नाही, परंतु देवाची कथा ही तशी केली जाते.




विश्वास ठेवण्यास बनविली जाणारी अद्‌भुत नायक कथा ही इतिहासाला दुभागणारा भाग नाही, परंतु येशू हा आहे. कल्पनाजाल हे आपले पाप व लज्जा काढू शकत नाही, आपल्याला देवाकडे आणणे, आणि आपल्याला त्याची प्रीति, आनंद व शांतीने भरलेले नवीन हृदय देऊ शकत नाही, परंतु येशू हे करू शकतो.

परंतु संदेष्ट्यांचे पवित्र शास्त्र पूर्ण करण्याद्वारे, येशू जो मशीहा याने आदामाच्या वंशजांना हे शक्य केले आहे की निर्माणकर्ता-राजाबरोबर कायमचे राहावे. परंतु सर्व जण हे त्याच्या राज्यात राहणार नाहीत.



ज्याप्रमाणे देवाने आदामाला पृथ्वीवरील बागेमध्ये राहण्याविषयी त्याचा एक नियम स्पष्ट केला होता, तसेच देवाने स्वर्गीय नगरात राहण्याविषयी आदामाच्या वंशजांना त्याचा एक नियम स्पष्ट केला आहेः

त्याच्यात काही निषिद्ध आणि अमंगळपणा व असत्य आचरणारा इसम यांचा प्रवेश होणारच नाही; तर कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात लिहिलेल्या लोकांचा मात्र होईल. (प्रकटीकरण 21:27)



कोकऱ्याचे जीवनाचे पुस्तक हे प्रत्येक व्यक्तीचे नाव, ज्यांनी आदामाच्या वेळेपासून, देवाच्या तारणाच्या मार्गावर विश्वास ठेवला आहे त्यांची स्वर्गीय नोंद आहे. गौरवाचा राजा त्याच्यामध्ये विश्वास ठेवण्यास आणि सैतान, पाप, मृत्यु व नरकापासून तुम्हांला सोडविण्यास त्याने जे केले आहे यासाठी तुम्हांला व तुमच्या कुटुंबावर दबाव आणणार नाही.

तेथे त्याच्या राज्यात कोणतीही अनिच्छुक प्रजा नसणार. परंतु कारण की राजाला हे नाही पाहिजे की कोणाचा नाश व्हावा, तो त्याचे पुस्तक, आमंत्रण, चेतावणी आणि एक आश्वासनासह संपवितोः

"जो कोणी तान्हेला आहे, त्याने यावे; आणि जो कोणी इच्छा करतो, त्याने जीवनाचे पाणी मोफत वरदान असे घ्यावे. या पुस्तकातील संदेशवचने ऐकणाऱ्या प्रत्येकाला मी निश्चयपूर्वक सांगतो की जो कोणी ह्यांत भर घालील त्याजवर ह्या पुस्तकात लिहिलेल्या पीडा देव आणील..........या गोष्टींविषयी साक्ष देणारा म्हणतो, हो; मी लवकर येतो."

"आमेन! ये, प्रभु येशू ये!" (प्रकटीकरण 22:17-20)

आदामाने पाप केल्यानंतर, त्याने देवाला काय म्हटले जेव्हा देव त्यास बागेमध्ये हाक मारीत आला? आदामाने लज्जापूर्वक उत्तर दिले,

"मी बागेत तुझा शब्द ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो." (उत्पत्ति 3:10)

परंतु आता, आदामाचे काही वंशज प्रभूचे आश्वासन की त्यांच्यासाठी पृथ्वीवर येणे यासाठी कशी प्रतिक्रिया देतात? ते आनंदाने उत्तर देतात,

"आमेन! ये, प्रभु येशू!" (प्रकटीकरण 22:20)


असे परिवर्तन कशामुळे झाले? पृथ्वीच्या न्यायाधीशासमोर उभे राहण्यासाठी काही लोक आता का घाबरत नाहीत? राजाला समारोसमोर पाहण्या विषयी ते इतके उत्साहित का आहेत?

हे याकारणासाठी आहे की ते त्याची कथा व संदेशावर विश्वास ठेवतात.

संदेष्टा यशयाने लिहिले,

आम्ही ऐकलेल्या वार्तेवर कोणी विश्वास ठेविला आहे? ........आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपआपला मार्ग धरिला होता; अशा आम्हां सर्वांचे पाप परमेश्वराने त्याजवर लादिले. (यशया 53: 1, 6)

यशयाने राजाच्या कथेचा तीन वाक्यांमध्ये सारांश केला:




1. आपल्याला समस्या आहे.

"आपण आपल्या स्वतःच्या मार्गासाठी देवाचा मार्ग सोडला."



2. परमेश्वराकडे उपाय आहे.

"परमेश्वराने आम्हां सर्वांचे पाप त्याजवर [त्याचा पुत्र] लादिले."



3. आपल्याकडे निवड आहे.

"आमच्या संदेशावर कोणी विश्वास ठेविला?"

तुम्ही राजावर विश्वास ठेवता काय?

> आपण मनुष्याची साक्ष स्वीकारतो, परंतु देवाची साक्ष ही मोठी आहे कारण ती देवाची साक्ष आहे, जी त्याने त्याच्या पुत्राविषयी दिली आहे. ....
>
> ज्याने देवाचा विश्वास धरिला नाही त्याने त्याला लबाड केले आहे; कारण जी साक्ष देवाने आपल्या पुत्राविषयी दिली आहे तिच्यावर त्याने विश्वास ठेविला नाही. ती साक्ष हीच आहे की देवाने आपल्याला सार्वकालिक जीवन दिले आणि हे जीवन त्याच्या पुत्रामध्ये आहे. ज्याला पुत्र आहे त्याला जीवन आहे; ज्याला देवाचा पुत्र नाही त्याला जीवन नाही.
>
> सार्वकालिक जीवन तुम्हांस आहे हे तुम्हांस कळावे म्हणून देवाच्या पुत्राच्या नामावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांस हे मी लिहिले आहे. (1 योहान 5:9-13)

होय, तुम्ही समजू शकता. तुम्ही अंदाज लावत राहावे असे राजा करीत नाही.

तुम्ही मनुष्याच्या धर्माकडे पाठ केली आणि देवाच्या साक्षीवर विश्वास ठेविला आहे काय? जर तसे आहे, तर मग तुम्ही सार्वकालिकता राजा बरोबर ....

त्यानंतर कायमचे आनंदात घालवाल.


## कथेचा संदेश • 2
# वाईट बातमी

जसे आपण ह्या पुस्तकाच्या प्रारंभी वाचतो, विश्वाच्या राजाने मनुष्याला त्याच्या स्वतःच्या प्रतिमे व स्वरूपानुसार निर्माण केले आहे. त्याने मनुष्याला त्याच्या गौरवासाठी बनविले आहे. लोक हे त्याचे विशेष खजाना, घनिष्ट मित्र व त्याच्या राज्यात पवित्र नागरिक असतील. परंतु प्रथम येथे परीक्षा घेण्याची वेळ असली पाहिजे.

परमेश्वर देवाने आदामाला मोठ्या परिणामासह एक लहान परीक्षा दिली. देवाने त्याला म्हटले की बागेतील एक झाड सोडून इतर सर्व झाडांची फळे खाण्यास तो मुक्त आहे. देवाने आदामाला काय होईल असे म्हटले जर त्याने हा एक नियम मोडला?




देवाने आदामाला त्याने प्रार्थना पठण, उपास करण्यास सुरुवात करावी, आणि पुष्कळ चांगली कृत्ये करावी की त्याच्या वाईट कृत्यांसाठी संतुलन करावे हे सांगितले काय? नाही! देव बोलला, "जर तू ह्या झाडाचे फळ खाल्ले तर तू खास मारशील" (उत्पत्ति 2:17).



आपल्याला ठाऊक आहे काय घडले. मनुष्याने त्याच्या निर्माता-राजाची अवज्ञा करण्याचे निवडले. आदाम व हव्वेने पाप केले. परंतु त्याच दिवशी ते मरण पावले काय? नाही. तर देवाचा म्हणण्याचा काय अर्थ होता जेव्हा त्याने म्हटले, "जेव्हा तू हे फळ खाशील तेव्हा तू खास मरशील?"

पवित्र शास्त्रानुसार, मृत्यूचा काय अर्थ आहे?



चित्राकडे पाहा. शाखेबरोबर काय घडत आहे? त्यास झाडापासून तोडल्यावर काय घडेल? ती जिवंत राहील काय? किंवा मृत होईल?

शाखा कदाचित तरीही जिवंत दिसत असेल, परंतु ती मृत होईल कारण ती तिच्या जीवनाच्या स्त्रोतपासून वेगळी केली आहे.

मृत्यूचा अर्थ वेगळे करणे. ही वाईट बातमी आहे.

जेव्हा आदाम व हव्वेने देवाच्या मार्गाऐवजी त्यांच्या स्वतःच्या मार्गाने जाण्याचे निवडिले त्यांनी  देवाबरोबरील संबंध गमाविले, जसे शाखा झाडापासून कापली गेली. देवाबरोबरचे त्यांचे संबंध मृत झाले. त्यांना आता त्याच्याबरोबर असणे नको होते. त्यांनी लपण्याचा प्रयत्न केला. आदाम व हव्वा हे आध्यात्मिकदृष्ट्या मृत झाले.

> तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव यांच्यामध्ये आडभिंतीप्रमाणे झाले आहेत; तुमच्या पातकांमुळे तो तुम्हांस दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही. (यशया 59:2)



आदाम व हव्वा शारीरिकदृष्ट्या सुद्धा मरू लागले. जसे शाखे वर पाने ताबडतोब सुकत नाही, तसेच शरीरे ज्यादिवशी पाप केले आहे ती मातीला जाऊन मिळत नाही. परंतु वृद्ध होण्याची प्रक्रिया सुरु झालेली असते. मृत्यु हा शत्रू होता ज्यातून ते वाचू शकत नव्हते.

परंतु वाईट बातमी आणखी खराब होते. जोपर्यंत परमेश्वर बचाव पुरवीत नाही, आदाम व हव्वा "सैतान व त्याच्या दूतांसाठी सार्वकालिक अग्नि तयार केलेला आहे" त्यामध्ये देवापासून सार्वकालिक वेगळेपणास तोंड देत होते. (मत्तय 25:41)

काही लोक नरक- अग्नीच्या सरोवराच्या कल्पनेची निंदा करतात जेथे जीव जे पापा द्वारे दुषित झालेले आहेत त्यांस तेथे सार्वकालिकतेमध्ये वेगळे केले जाईल. परंतु जे आपण समजत नाही त्याची निंदा




करणे हे ज्ञानीपण आहे काय? मानव म्हणून, आपण सार्वकालिकतेची कल्पना समजू शकत नाही. ते वेगळे परिमाण आहे.[8] लोकांनी संदेष्टा नोहाची सुद्धा निंदा केली जेव्हा तो तारू बनवीत होता आणि त्यांना येणाऱ्या जलप्रलयबद्दल चेतावणी देत होता, परंतु एकदा की तारवाचे दार बंद झाले आणि जलप्रलय आला, ते सत्य समजले ज्याची त्यांनी निंदा केली होती. त्याचप्रमाणे, ज्याक्षणी लोक नरकात प्रवेश करतात, ते त्याचा एकमेव तर्क समजतील.

> तेव्हा ते प्रभूच्या समोरून व त्याच्या सामर्थ्याच्या गौरवापासून दूर होऊन युगानुयुगाचा नाश हा दंड त्यांना मिळेल. (2 थेस्सलनी 1:9)

राजा त्याच्या विश्वाला कायमचे पापा द्वारे दुषित होऊ देणार नाही.


पाप हे आपल्या ग्रहावर सर्वात विनाशकारक शक्ती आणि समजेपलीकडील आपत्ती आहे. पाप हे सर्व वाईटाचे कारण आहे.



संसर्गजन्य आजारासारखे, आदामाच्या पापाने आपल्या सर्वांना संक्रमित केले आहे. जसे एका मोडलेल्या शाखेवरील प्रत्येक अंजीर व पान हे मृत आहे, तसेच आपण प्रत्येक जण आदामाच्या पापा द्वारे संक्रमित आहोत. आपण सर्व जण आदाम शाखेचा भाग आहोत.



> जेव्हा आदामाने पाप केले, पापाने जगात प्रवेश केला. आदामाच्या पापाने मृत्यु आणला, म्हणून मृत्यु सर्वांना पसरला, कारण सर्वांनी पाप केले आहे. (रोम. 5:12)



मोशेच्या दिवसांत मागे, लोकांना तीच चुकीची कल्पना होती जी लोकांना आज आहे. त्यांनी आशा केली की जर त्यांनी वाईटापेक्षा अधिक चांगले केले, तर परमेश्वर त्यांना न्यायाच्या दिवशी दया दाखवेल. त्यांचे चुकीचे विचार सुधारण्यासाठी, परमेश्वर ज्वालामय अग्नीत सीनाय डोंगरावर खाली आला आणि लोकांना दहा आज्ञा पाळण्यास दिल्या. जो कोणी हे दहा नियम पूर्णपणे पाळत नाही त्यास मृत्यूचा दोषी व त्यास पात्र आहे असे घोषित केले जाते.






दहा आज्ञा ह्या आरशाप्रमाणे आहे. जर तुमचे तोंड हे घाण आहे, आरसा तुम्हांला घाण पाहण्यास साहाय्य करतो, परंतु तो घाणीला काढू शकत नाही. त्याच प्रकारे, आज्ञा ह्या यासाठी दिल्या गेल्या नाही की आपल्याला देवाबरोबर योग्य असे बनवावे. आपण असहाय्य पापी आहोत एका परिपूर्ण तारणाऱ्याच्या गरजेमध्ये आहोत.

> कारण सर्वांनी पाप केले आहे आणि देवाच्या गौरवाला ते अंतरले आहेत. (रोम. 3:23)

वाईट बातमी ही आहे की आपण देवाच्या चांगुलपणाच्या परिपूर्ण प्रमाणा इतके योग्य ठरले जात नाही. चांगली बातमी ही आहे की इतिहासात येथे एक व्यक्ती आहे ज्याने हे केले आहे.

त्याचे नांव येशू आहे.

## कथे मध्ये संदेश • 3

# चांगली बातमी

परमेश्वर न्याय व दयेमध्ये परिपूर्ण आहे. न्यायाचा अर्थ की माझ्या पापा विरोधातील नियमशास्त्राचा पूर्ण दंड हा काढून घेतला आहे. दयेचा अर्थ की नियमशास्त्राचा दंड हा माझ्या विरोधातून काढून घेतला नाही.


आपल्याला शिक्षा केल्याशिवाय परमेश्वर आपल्या पापाला दंड कसे देऊ शकतो?

उत्तर हे प्रभू येशू ख्रिस्तामध्ये मिळते, जो आपल्याला सोडविण्यासाठी आला.



जुन्या कराराच्या वेळेत, येशू येण्याअगोदर, परमेश्वराने पापार्पणाचा नियम लावून दिला होता की पाप्यांना पाप व मृत्युच्या नियमशास्त्राकडून सोडवावे. परमेश्वराने आपल्या पापाची भरपाई म्हणून निष्पाप प्राण्यांचे रक्त स्वीकारले. हे अशा प्रकारे त्याने पाप्यांना शिक्षा न करिता पापाला दंड दिला. परंतु एक मनुष्यासाठी एक कोकरा हे उचित व्यवहार आहे काय? नाही. प्राण्याचे रक्त हे केवळ चित्रित करते ज्याची न्यायास खरेच गरज होती.

कोणत्या प्रकारचे रक्त जगाच्या पापाच्या कर्जाची भरपाई करू शकले असते? केवळ एका परिपूर्ण, अमर्यादित मनुष्याचे रक्त.




“प्रारंभी शब्द होता.....शब्द देही झाला; आणि कृपा व सत्य यांनी परिपूर्ण असून त्याने आम्हांमध्ये वस्ती केली; आम्ही त्याचे गौरव पाहिले ते गौरव पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे असावे असे होते.” (योहान 1:1, 14)





कोकऱ्याचे रक्त केवळ पापाला आवरण करू शकत होते. येशू हा ”देवाचा कोकरा, जो जगाचे पाप हरण करतो!” (योहान 1:29)






हाबेलाचे स्मरण करा? देवाने हाबेलाची पापे कोकऱ्यावर ठेवली. कोकरा हा हाबेलाचा तात्पुरता पाप-वाहक होता. येशू हा आपला कायमचा पाप-वाहक आहे. देवाने आपली सर्व पापे त्याजवर लादली.








हाबेलाच्या ठिकाणी कोकरा जो मारला गेला व जाळून राख केली गेली ते येशूचे चित्र होते ज्याने आपल्या पापांसाठी पूर्ण दंड भरला. त्यामुळेच, तो मरण पावण्यापूर्वी, येशूने विजयात आरोळी मारली, “पूर्ण झाले आहे!” (योहान 19:30)




न्यायाचे समाधान झाले आहे. दया ही उपलब्ध आहे.


> ही ती चांगली बातमी आहे जी तुम्हांला वाचवते जर तुम्ही त्यावर ठामपणे विश्वास ठेवता....ख्रिस्त आपल्या पापांकरिता मरण पावला, जसे पवित्र शास्त्र म्हणते. पवित्र शास्त्रानुसार त्यास पुरले गेले; व तिसऱ्या दिवशी त्याला उठविला गेले. (1 करिंथ 15:2-4)




अब्राहाम व त्याच्या पुत्राविषयी विचार करा. देवाने बलिदान करण्यासाठी त्यांना एका विशेष दूर अंतरावरील डोंगराकडे का पाठविले?






परमेश्वर त्या स्थळाविषयी तयारी करीत होता जेथ त्याचा स्वतःचा पुत्र जगाच्या पापांकरिता मरणार होता.


अब्राहामाने त्या डोंगराला "परमेश्वर पाहून देईल" असे नांव का दिले? कारण हे त्याच डोंगरावर देवाने पूर्ण व शेवटचे बलिदान पुरविले होते.





देवाने अब्राहामाच्या पुत्रासाठी काय पुरविले? एक एडका. देवाने न्यायापासून वाचविण्यासाठी तुम्हांला काय पुरविले आहे? येशू, देवाचा कोकरा.






मृत्यु व न्यायास तुम्ही घाबरता काय? येशू हा तुमचा तारणारा म्हणून जर तुम्ही त्याच्यामध्ये पूर्ण विश्वास ठेवला, तर तुम्हांला भिण्याची गरज नाही, कारण देवाने तुमच्या पापांकरिता त्याच्याकडून पूर्ण भरपाई प्राप्त केली आहे आणि त्यास पुन्हा जिवंत केले आहे.

आता आदाम व हव्वेबद्दल विचार करा. त्यांचे पाप व लाजेने त्यांना अंजिराच्या पानांनी झाकावयास लावले आणि त्यांना देवापासून लपावयास पाहिजे होते. त्याचा न्याय व दयेमध्ये, देवाने त्यांचे पाप उघडे केले आणि त्यांना अर्पण केलेल्या प्राण्यांच्या कातडीचे वस्त्र नेसविले. प्राण्यांच्या सांडलेल्या रक्ताने चित्रित केले जे त्यांच्या पापाला आवरण घालण्यास आवश्यक होते. आणि प्राण्यांच्या कातडीने चित्रित केले जे त्याच्या लाजेस आवरण घालण्यास आवश्यक होते.

आपण सर्व जण आपल्या पूर्वजांचे पाप व लाजमध्ये सहभागी आहोत. आपण देवाच्या नीतिमत्वाला उणे पडलो आहोत. आपण त्याच्याबरोबर राहण्यास पात्र नाहीत. चांगली बातमी ही आहे की वधस्तंभावर येशू ख्रिस्ताने आपले पाप व लाज घेतली. त्या अंधाऱ्या तासांच्या दरम्यान, ज्यास आपण पात्र होतो ते वेगळे होणे त्याने देवापासून अनुभविले. आणि मग तो मरण पावला. परंतु कारण की त्याने स्वतः काही पाप केलेले नव्हते, कबर त्यास जखडून ठेवू शकली नाही.


येशूचा मृत्यु व पुनरुत्थानाच्या कारणामुळे, देव तुम्हांला स्वच्छ करून व वस्त्र नेसवितोः त्याच्या नीतिमत्वाकरिता तुमची पापे अदलाबदली करतो.





> आपण सर्व जण पापाने संक्रमित व अशुद्ध झालो आहोत. आपण जेव्हा आपली नीतिमत्वाची कृत्ये प्रदर्शित करतो, ते केवळ घाणेरडया चिंध्या आहेत. (यशया 64:6)





> प्रभु माझा परमेश्वर मध्ये मी अति आनंदित आहे! कारण त्याने मला तारणाची वस्त्रे नेसविली आहेत आणि मला नीतिमत्वाच्या झग्याने आच्छादिले आहे. (यशया 61:10)

> ज्याला पाप ठाऊन नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्याकरिता पाप असे केले; यासाठी की आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे. (2 करिंथ. 5:21)

न्यायाच्या दिवशी, तुम्ही तुमच्या धार्मिक प्रयत्नांच्या चिंध्यामध्ये देवासमोर उभे राहणार काय?

किंवा तुम्ही ख्रिस्ताच्या शुद्ध नीतिमत्वामध्ये आच्छादन केलेले असे उभे राहणार?

# राजाला तुमचा प्रतिसाद

एका एकाकी जंगलातून तुम्ही स्वतः चालत आहात याची कल्पना करा. कोणाला कदाचित तुम्ही भेटाल-एक कोकरा किंवा एक सिंह?



त्याच्या पहिल्या येण्याच्या वेळी, गौरवाच्या राजाला कोकरा म्हटले आहे. तो नम्रतेत आला की पाप्यांना वाचवावे. जेव्हा राजा परत येईल, *त्यास सिंह म्हणतील*. तो वैभवात येईल की पश्चाताप न केलेल्या पाप्यांचा न्याय करावा.



जेव्हा येशू परत येईल, तेव्हा तुमचा तारणारा-राजाच्या उपस्थितीत तुम्ही आनंद कराल काय किंवा तुम्ही तुमचा न्यायाधीश-राजा समोर थरथर कापाल? हे सर्व काही देवाच्या संदेशावरील तुमच्या प्रतिसाद वर अवलंबून आहे.

जेव्हा येशूने प्रवास करणे व शिकविण्यास सुरुवात केली, त्याचे सुरुवातीचे काही शब्द हे,

"पश्चाताप करा आणि सुवार्तेमध्ये विश्वास ठेवा!" (मार्क 1:15)

"पश्चाताप" चा अर्थ देवाच्या राज्यात राहण्याच्या हक्कासाठी तुम्ही कशा मध्ये विश्वास ठेवता त्याविषयी तुमचे मन बदलणे. याचा अर्थ की तुमच्या स्वतःच्या मार्गावर विश्वास ठेवणे सोडा आणि देवाच्या मार्गावर विश्वास ठेवणे व ते पाळण्यास सुरुवात करा.

"सुवार्तेवर विश्वास ठेवा" याचा अर्थ तारणाऱ्यामध्ये तुमचा विश्वास ठेवा जो तुमच्या पापांकरिता मरण पावला आणि पुन्हा उठला की तुम्हांला नवीन जीवन द्यावे. परंतु याचा काय अर्थ आहे की कोणामध्ये तुमचा विश्वास ठेवणे?

चला पश्चिम आफ्रिकेकडील स्वतः-अनुभवलेल्या कथे द्वारे मला स्पष्ट करू द्या. हे दोन स्त्रिया, फातु आणि बिन्तु विषयी आहे.

दोघींना त्यांच्या डोळ्यात संक्रमण झालेले होते. फातु दवाखान्यात गेली. डॉक्टरांनी तिला डोळ्यात घालायचे रोगप्रतिबंधक औषध दिले. तिचे डोळे बरे झाले. बिन्तु एका परंपरागत बरे करणाऱ्याकडे गेली. त्याने त्याचे "औषध" तिच्या डोळ्यामध्ये घासले. तिचे डोळे पांढरे झाले आणि ती आंधळी झाली.

फातु व बिन्तु दोघींनाही विश्वास होता. दोन्ही स्त्रियांनी ज्यांवर ते विश्वास ठेवीत होते त्या बरे करणाऱ्या व्यक्तीकडे जाण्याद्वारे त्यांच्या विश्वासानुसार कार्य केले- परंतु त्याचा परिणाम हा किती वेगळा होता.


जेव्हा सार्वकालिकतेविषयी विचार येतो, प्रत्येक जण कशामध्ये किंवा कोणामध्ये तरी विश्वास ठेवतात. अनेक जण त्यांच्या आई-वडिलांच्या धर्मावर आशा ठेवून राहतात. काही त्यांच्याबरोबर राहतात जे म्हणतात की जीवन हे कबरेमध्ये संपते. इतर हे जीवन, मृत्यु व सार्वकालिकतेविषयी त्यांच्या स्वतःच्या कल्पनेसह असतात. शेवटी, एकच प्रश्न महत्वाचा असेलः तुम्ही सत्याला निवडले काय?

माझे म्हणाल तर, मी माझी निवड केली आहे. मी राजावर भरंवसा करतो, ज्याने म्हटले,


"प्रत्येक जण जो सत्याच्या आहे तो माझे ऐकतो." (योहान 18:37)

तोच एकमेव आहे ज्याच्याबरोबर मला कायमचे राहावयास पाहिजे. तोच एकमेव आहे "ज्याने मजवर प्रीति केली आणि माझ्या साठी स्वतःला देऊन टाकले" (गलती. 2:20)

तो केवळ एक राजा नाही. तो माझा राजा आहे!



पहिल्या मनुष्याला निर्माण केले होते की देवाची प्रतिमा प्रतिबिंबित करावी. ती प्रतिमा पापा द्वारे डागाळली गेली. येशू ख्रिस्त, "अदृश्य देवाची प्रतिमा" (कलस्सै. 1:15), आला की तुम्हांला नवीन जीवन द्यावे आणि तुम्हांमध्ये देवाची प्रतिमा पुनर्स्थापित करावी.



जर तुम्ही येशू ख्रिस्त, गौरवाचा राजा, मध्ये तुमचा विश्वास ठेवला आहे, तर मग, देवाच्या दृष्टीसमोर, तुम्ही येथून पुढे आदामात नाही. तुम्ही ख्रिस्तामध्ये आहात. तुम्ही स्वर्गाचे आवडते नागरिक आणि देवाचे एक प्रिय लेकरू आहात. तुम्ही देवाचे स्वतःचा खजाना आहात, जे त्याने त्याच्या स्वतःच्या पुत्राच्या रक्ताने खंडणी दिलेले आहे.

देवाच्या कुटुंबात नवीन जन्मलेले सदस्य म्हणून तुम्ही आता देवाला पिता असे म्हणू शकता. परंतु मोठ्या सौभाग्यासह मोठी जबाबदारी येते.

> तुम्ही आज्ञांकित मुले व्हा आणि अज्ञानावस्थेतील आपल्या पूर्वीच्या वासनांप्रमाणे वागू वर्तू नका; तर ज्याने तुम्हांस पाचारण केले तो जसा पवित्र आहे तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणात पवित्र व्हा. (1 पेत्र. 1:14-15)


ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून, तुम्हांला क्षमा, प्रीति करण्यास, आणि सर्व लोकांसाठी, तुमच्या शत्रुंसाठी सुद्धा प्रार्थना करावी म्हणून बोलाविले आहे. येशू म्हणतो,

> "तुमची एकमेकांवर प्रीति असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की तुम्ही माझे शिष्य आहा." (योहान 13:35)

जसे तुम्ही त्याच्या अधीन होता, प्रभु येशूचा आत्मा, जो तुमच्या अंतःकरणात आला जेव्हा तुम्ही शुभवर्तमानात विश्वास ठेविला, तो तुम्हांला पापावर विजय मिळविण्यात साहाय्य करेल आणि त्याचे पवित्र चारित्र्य प्रतिबिंबित करेल.

> पवित्र आत्मा आपल्या जीवनात अशा प्रकारचे फळ उत्पन्न करतोः प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन. (गलती 5:22-23)

राजाचे लेकरू म्हणून, तुम्हांला जीवनात एक नवीन उद्देश आहेः त्याचा सन्मान करावा. तुम्ही ह्या भटकलेल्या जगासाठी त्याचे राजदूत आहात. त्यास चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित करा. एके दिवशी तुम्ही त्याला समोरासमोर पाहाल, आणि मग तुम्ही "त्याच्यासारखे व्हाल" (1 योहान 3:2). तोपर्यंत, कोणत्याही वेळी त्याच्याबरोबर बोला. प्रत्येक परिस्थितीमध्ये त्याची स्तुति करा. इतरांबरोबर त्याची उपासना व सेवा करा जे त्यास व त्याच्या वचनावर प्रेम करतात. दररोज वचनाचा अभ्यास करा (लूक, योहान, प्रेषितांची कृत्ये व रोमकरांस पत्राने सुरुवात करा). पवित्र आत्मा हा तुमचा शिक्षक आहे. बायबल हे तुमचे आध्यात्मिक अन्न आणि सैताना विरुद्ध शस्त्र आहे, ज्यास हे नाही पाहिजे की तुम्ही येशू सारखा विचार, बोलणे, आणि कृत्य करावे. जितके अधिक तुम्ही वचनावर मनन करता तितकेच आध्यात्मिकदृष्ट्या तुम्ही बलशाली होता.



स्तोत्रसंहितेवरून हे चित्र मला आवडतेः

हरिणी जशी पाण्याच्या प्रवाहासाठी लुलपते तसा हे देवा, माझा जीव तुझ्यासाठी लुलपत आहे. (स्तोत्रसंहिता 42:1)

तुम्ही हे म्हणू शकता काय?

निवड ही तुमची आहे.

पॉल डी. ब्रॅमसन

resources@rockintl.org

# लाभदायक वैशिष्ट्ये

देवाने त्याच्या कृपे द्वारे तुमचे तारण केले जेव्हा तुम्ही विश्वास ठेवला. आणि तुम्ही यासाठी श्रेय घेऊ शकत नाही; हे देवापासून दान आहे. तारण हे आपण केलेल्या चांगल्या गोष्टींसाठी पुरस्कार नाही, आपल्यापैकी कोणीही याविषयी गर्व करू शकत नाही. कारण आपण देवाची श्रेष्ठ कलाकृती आहोत. त्याने ख्रिस्त येशूमध्ये आपल्याला नवीन असे बनविले आहे, म्हणजे आपल्यासाठी पूर्वी योजून ठेवलेल्या चांगल्या गोष्टी आपण करू शकावे.

यास्तव आपण विश्वासाने नीतिमान ठरविलेले आहो म्हणून आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपणांस देवाबरोबर असलेल्या शांतीचा लाभ घडो. ज्या कृपेत आपण आहो तिच्यात त्याच्याद्वारे आपला प्रवेशही विश्वासाने झाला आहे; आणि आपण देवाच्या गौरवाच्या आशेमुळे जयोत्सव करू.

— नवीन करारातून
(इफिस 2:8-10; रोम. 5:1-2)

# उजळणी प्रश्ने भाग 1• जुना करार

प्रत्येक 70 दृश्यांसाठी ही यादी एक किंवा दोन प्रश्न देते.
उत्तरे ही प्रत्येक संबंधित दृश्याच्या वचनात जुळलेली आहेत. गटाने अभ्यास करण्यासाठी ह्या पानांची नकल करण्याची स्वतंत्रता घ्या. अधिक माहितीसाठी भेट द्याः www.one-god-one-message.com

*दृश्य नंबर प्रश्न (प्रश्ने)*

1 • गौरवाच्या राजाला त्याची योजना पूर्ण करण्यासाठी हजारो वर्षे लागतील.
राजाविषयी हे तुम्हांला काय सांगते?

2 • बायबलच्या दोन मुख्य भागांची नांवे सांगा. ते एकमेकांपासून भिन्न कसे आहेत?

3 • पवित्र शास्त्रातील पहिल्या शब्दावर तुम्ही विश्वास ठेवता
काय (उत्पत्ति 1:1)? का किंवा का नाही?

4 • जरी जेव्हा परमेश्वर एकटाच अस्तित्वात होता, तो कधीही एकटा नव्हता.
हा वाक्या द्वारे तुम्ही काय समजता?

5 • देवाने ज्या गोष्टी केल्या आहेत त्यावरून आपण त्याच्याविषयी काय शिकू शकतो?

6 • काही मार्गांची नांवे द्या ज्यामध्ये देवाने मानवास प्राण्यांपासून भिन्न असे बनविले आहे.

7 • देवाने आदामाला का विचारले नाही की त्याला एदेन बागेमध्ये राहावयाचे आहे काय.

8 • पाप काय आहे? देवाने आदामाला काय घडेल असे म्हटले जर त्याने देवाच्या आज्ञा मोडली?
मृत्यूसाठी दुसरा शब्द काय आहे?

9 • आदामासारखे, हव्वेला ही देवाच्या प्रतिमेमध्ये निर्माण केले आहे. याचा काय अर्थ आहे?

10 • स्वर्गामध्ये उत्तम आकर्षण काय आहे?

11 • विश्वामध्ये पापाने प्रवेश कसा केला?

12 • जर मनुष्याने चांगले व वाईट याचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाल्ले तर काय घडेल म्हणून परमेश्वर बोलला होता? काय घडेल असे सैतानाने म्हटले होते?

13 • मानवी कुटुंबात पापाने प्रवेश कसा केला?

14 • पापाचा पहिला परिणाम काय होता? कोणत्या प्रकारे आदाम व हव्वेच्या पापाने त्यांचा आदर लज्जेसह बदलला?

15 • आदाम व हव्वा कशा प्रकारे मेले ज्या दिवशी त्यांनी पाप केले?
ते एका तुटलेल्या शाखेसारखे कसे झाले? (पान 160 सुद्धा पाहा.)

16 •काहीं नावे सांगा की पापाच्या शापाने मूळ निर्मितीला अस्तव्यस्त केले.

17 • तुम्हांला काय वाटते की देवाच्या गुप्त योजनेमध्ये तारणाऱ्याचा समावेश का केला जो एका स्त्रीचे संतान असेल (मानवी आई असेल, पण मानवी पिता नसेल)?

18 • आदाम व हव्वेचे पाप व लाज झाकण्यासाठी देवाने काय केले? देवाने त्यांना कसे दाखविले की तो न्याय, दया, व कृपेचा देव आहे?

19 • देवाने आदाम व हव्वेला एदेन बागेमधून बाहेर का घालविले?

20 • आदाम व हव्वेच्या पापाने त्यांच्या लेकरांवर कसा परिणाम केला? ते आपल्यावर व आपल्या कुटुंबावर कसा परिणाम करते? (पान 161 सुद्धा पाहा.)

21 • कोणत्या प्रकारचा कोकरा परमेश्वर स्वीकारेल की पाप्यांच्या ठिकाणी मरावे?

22 • प्रायश्चितचा अर्थ काय आहे? देवाच्या क्षमेच्या मार्गाला मृत्यूच्या भरपाईची आवश्यकता का आहे?

23 • देवाने हाबेलाच्या पापासह काय केले? काइनाच्या अर्पणामध्ये काय चूक होती?

24 • पश्चाताप करणे याचा अर्थ काय आहे? काइनाने काय करावे हे देवाला पाहिजे होते? काइनाने काय केले?

25 • नोहाच्या समयातील जगभरातील जलप्रलय देवाचा धीर व न्याय विषयी आपल्याला काय शिकविते?

26 • नोहा व त्याच्या कुटुंबाने तारवातून बाहेर आल्यावर प्रथम कोणती गोष्ट केली?

27 • बाबेलचा बुरुज कोणत्या प्रकारे खोट्या धर्माला स्पष्ट करतो?

28 • परमेश्वराने अब्राहामाला कोणते दोन मोठे अभिवचन दिले, जर तो परमेश्वरावर भरंवसा करेल व त्याच्या मागे चालेल?

29 • देवाने अब्राहाम व सारा यांना त्यांच्या पापांसाठी क्षमा का केली आणि त्यांना नीतिमान का घोषित केले?

30 • अब्राहामाच्या पुत्राने कोणता प्रश्न त्याच्या पित्याला विचारला जेव्हा ते बलिदान करण्याच्या डोंगराकडे जात होते?

31 • देवाने इसहाकला नवीन राष्ट्राचा पिता करण्याचे अभिवचन दिले होते. कारण अब्राहामाला ठाऊक होते की परमेश्वर खोटे बोलू शकत नाही, अब्राहामाने काय विचार केला की परमेश्वर काय करेल जेव्हा तो वेदीवर इसहाक चे अर्पण करेल?

32 • अब्राहामाने डोंगराला परमेश्वर पाहून देईल असे का म्हटले? त्या दिवशी अब्राहामाच्या पुत्राच्या ऐवजी तेथे कोकरा मरण पावला होता काय?

33 • देवाने अब्राहामाला जे दोन मोठे अभिवचन दिले होते ते त्याने कसे पूर्ण केले?

34 • जर आपण देवाच्या आज्ञा पाळण्याचा कठीण प्रयत्न केला, तर स्वर्गामध्ये देवासह राहण्यास आपण कधी पुरेसे चांगले होऊ शकतो काय? दहा आज्ञा ह्या आरशासारख्या कशा आहेत? कोणत्या प्रकारे आज्ञा आपल्याला दाखवितात की आपल्याला एक तारणाऱ्या ची गरज आहे?

35 • प्राण्याचे बलिदान जगाच्या पापाचे कर्ज का काढू शकले नाही?

36 • गुंडाळी मधून एक भविष्यवाणी निवडा आणि येणाऱ्या तारणाऱ्याकडे ती कशी इशारा करते ते सांगा.

# उजळणी प्रश्ने भाग 2 • नवीन करार

37 • देवाने चार लोकांना का उपयोगात आणले (केवळ एका व्यक्ती ऐवजी) की येशूविषयी शुभवर्तमान गोष्ट लिहावी?

38 • देवदूत गब्रीएलने येशूला देवाचा पुत्र का म्हटले?

39 • येशू नावाचा अर्थ काय आहे?

40 • येशूच्या जन्माच्या गोष्टीविषयी तुम्हांला उत्तम असे काय आवडते?

41 • देवदूताने मेंढपाळांना सांगितले, "तुमच्यासाठी एक तारणारा जन्मला आहे; तो ख्रिस्त प्रभु आहे." ही बातमी ऐकण्यासाठी मेंढपाळांनी इतके उत्साही का व्हावयाचे होते?

42 • मागी लोकांसाठी हे बरोबर होते काय की बाळ येशूची उपासना करावी? का किंवा का नाही?

43 • येशू इतर लेकरांपासून कोणत्या प्रकारे भिन्न होता?

44 • संदेष्टा योहानाचा संदेश त्याच्यापुर्वीच्या इतर सर्व संदेष्ट्यांच्या संदेशापासून कसा भिन्न होता? तुम्ही काय विचार करता की योहानाने येशूकडे इशारा का केला आणि म्हटले, "हा, पाहा, देवाचा कोकरा, जो जगाचे पाप हरण करतो?"

45 • ह्या दृश्याकडे पाहा आणि देवाचा आत्मा, देवाचा पुत्र, आणि स्वर्गातील पिता याविषयी पवित्र शास्त्रातून तुम्हांला जे काही माहित आहे ते सांगा.

46 • सैतान येशूला पापात पाडण्याचा प्रयत्न का करीत होता?

47 • यशया संदेष्ट्याच्या ग्रंथामधून वाचल्यावर, येशूने म्हटले, "तुम्ही ऐकत असता आज हे वचन पूर्ण झाले आहे!" त्याच्या शेजाऱ्यांना त्यामुळे राग का आला असे तुम्हांला वाटते?

48 • येशू पृथ्वीवर देवाचा हात कसा होता? येशू मुळे भुते का घाबरली होती?

49 • येशूने वादळाला आज्ञा दिल्यावर, "स्तब्धता! शांत हो!" शिष्यांनी म्हटले, "हा मनुष्य आहे तरी कोण? वारा व लाटा देखील त्याची आज्ञा मानतात!" येशू कोण आहे असा तुम्ही विचार करता?

50 धार्मिक पुढाऱ्यांनी येशूने निंदा केली आहे असा दोष का दिला?

51 येशूने म्हटले, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो मजवर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल." त्याने सत्य बोलले हे आपल्याला कसे कळेल?

52 • लोक जे दुसऱ्या दिवशी आणखी अन्ना साठी शोध घेत परत आले त्यांना येशूने काय म्हटले?

53 ह्या दृश्याची उजळणी करा आणि एक गोष्ट सांगा जी येशूने बोलली तिने तुम्हांला आश्चर्यचकित केले.

54 • संदेष्ट्यांनी मशीहाला "नीतिमत्वाचा सूर्य" म्हटले. येशूने स्वतःला "जगाचा प्रकाश" म्हटले. येशू जो मशीहा हा इतर संदेष्ट्यांपासून कसा भिन्न आहे?

55 • शिष्यांनी काय विचार केला की मशीहाने केले पाहिजे होते? मशीहा काय करण्यासाठी आला होता?

56 • प्रभु येशू एका शक्तिशाली युद्धाच्या-घोड्या ऐवजी नम्र गाढवावर स्वार होऊन यरुशलेमेत का आला?

57 • धार्मिक पुढारी येशूला काहीतरी चूक बोलण्यात का फसवू शकले नाही?

58 • प्रमुख याजक व यहूदी शासक का म्हणाले की येशूला मृत्युदंड द्यावा?

59 • पिलाताने येशूला मृत्यूचा दोषी का ठरविले?

60 • सैनिकांनी काट्यांचा मुकुट येशूच्या डोक्यात घुसविला कांटे हे आपल्याला कशा विषयी आठवण देतात?

61 • येशू द्वारे अब्राहामाच्या भविष्यवाण्या कशा पूर्ण झाल्या? देवा साठी तुम्ही किती महत्वाचे आहात?

62 • येशूच्या बाजूला दोन चोरांना वधस्तंभावर खिळलेले होते. आज एक नरकात आहे (परमेश्वरापासून कायमचा वेगळा केलेला) आणि दुसऱ्या हा स्वर्गात आहे (परमेश्वराबरोबर कायमचा). कशाने फरक केला होता?

63 • प्रभु येशू जेव्हा अंधारात वधस्तंभावर लटकलेला होता, स्वर्गातील पित्याने त्याजवर काय लादले होते? येशूने असे का म्हटले, “पूर्ण झाले आहे”? देवाने मंदिरातील पडदा का दुभागला.

64 • येशूचे अभिवचन की पुन्हा उठेन हे शिष्यांनी आठवले काय? दुष्ट धार्मिक पुढाऱ्यांनी त्याचे अभिवचन आठवले काय?

65 • रविवारी सकाळी स्त्रिया जेव्हा कबरेजवळ आल्या तेव्हा त्यांना काय मिळाले? धार्मिक पुढाऱ्यांनी रिकामी कबरेविषयी काय केले? जर मी पूर्णपणे येशू जो देवाचा कोकरा याजमध्ये विश्वास ठेवला जो माझ्या पापांसाठी मरण पावला आणि पुन्हा उठला, तर मला मृत्यूला घाबरण्याची गरज आहे काय?

66 • अम्माऊसच्या मार्गावर दोन प्रवाश्यांना ते निर्बुद्धी आहेत असे प्रभु येशूने का म्हटले?

67 • पुनरुत्थित तारणारा जेव्हा खोलीमध्ये दिसला, थोमाने त्यास म्हटले, “माझा प्रभु आणि माझा देव!” थोमा बरोबर किंवा चूक होता काय की येशूला प्रभु व देव म्हणावे? का?

68 • येशू स्वर्गात परत गेल्यावर त्याने त्याच्या शिष्यांना काय करण्यास सांगितले होते?

69 • गौरवाचा राजा कोण आहे? त्याच्याविषयी तुम्ही काय विचार करता?

70 • राजा जेव्हा परत येईल, तुम्ही आनंदी व्हाल किंवा घाबराल काय? का?

# संदर्भ

**दृश्यांच्या मागे:** [1]ज्यावेळेस *वंडरलैंड मधील ॲलीस* हे जवळजवळ 200 भाषांमध्ये, पवित्र शास्त्र, संपूर्ण किंवा काही भागामध्ये, 2, 500 पेक्षा अधिक भाषांमध्ये भाषांतरित केले गेले आहे.

[2]बायबल हे पुरातत्वशास्त्र, धर्मनिरपेक्ष इतिहास, पूर्ण झालेल्या भविष्यवाण्या, आणि जवळजवळ दोन हजार वर्षांपासून अधिक काळामध्ये लिहिलेल्या जटील गोष्टीचे परिपूर्ण सातत्य द्वारे निश्चित केले जाते.

**दृश्य 2:** [3]राजा हा विश्वाचा केवळ निर्माणकर्ता आणि सांभाळणारा नाही, तो ह्या पुस्तकाचा लेखक व  रक्षणकर्ता सुद्धा आहे. मृत समुद्राकडील गुंडाळी आजचे जुन्या कराराचे वचन मानते की तेच वचन ख्रिस्ताच्या समया पूर्वी अस्तित्वात होते. नवीन कराराचे वचन हे हजारो प्राचीन हस्तलिखिते, ख्रिस्तानंतर सुरुवातीच्या शतकांतील अनेक तारखांद्वारे  वैध ठरविले जाते. प्रसिद्ध दावा की मूळ वचन हे मनुष्या द्वारे हेरफेर केलेले व भ्रष्ट केलेले आहे यात काहीही वास्तविक आधार नाही. एक परमेश्वर एक संदेश, अध्याय 3 पाहा. www. one-god-one-message.com

**दृश्य 5:** [4]देवाच्या गुणवैशिष्ट्यात सखोलपणे पाहण्यासाठी जसे सृष्टि निर्माण करण्याच्या सहा दिवसांत दिसले, एक परमेश्वर एक संदेश, अध्याय 8 पाहा.

**दृश्य 6:** [5]कारण देव एक आहे, तर तो का म्हणतो, “चला आपण आपल्या स्वरुपात मनुष्य निर्माण करू......?” उत्तर हे त्याच्या जटील ऐक्यतेमध्ये मुळावलेले आहे. पवित्र शास्त्रात, “देव” साठी इब्री शब्द हा एलोहीम आहे, जे अनेकवचनी नाम आहे. “देव एक आहे” वाक्यामध्ये “एक” हा शब्द एखाद आहे, जे संयुक्त ऐक्यता दर्शवू शकते. सार्वकालिकतेमध्ये, देवदूत किंवा मनुष्य बनविण्यापूर्वी, देवाने स्वतः मध्येच संगतीचा आनंद घेतला- त्याचा शब्द/पुत्र आणि पवित्र आत्म्याबरोबर. “देव किती महान आहे-आपल्या समजेपलीकडील आहे!” (संदेष्टा ईयोब 36:26)

**दृश्य 7:** [6]तेच रासायनिक घटक जे शरीराला घडवितात ते सर्व पृथ्वीच्या मातीमध्ये आहेत. ही वास्तविकता विज्ञान द्वारे मानली गेली नाही आता सध्या पर्यंत. ज्यावेळेस अधिकतर शास्त्रज्ञ त्यांचे ज्ञान निरीक्षण व सिद्धांत (मनुष्यांच्या कल्पना) वर आधारित करतात, जे विश्वास ठेवतात त्यांचे ज्ञान हे निरीक्षण व प्रकटीकरण (देवाचे वचन) वर आधारित आहे.

**दृश्य 11:** [7]सैतानाच्या उगमविषयी अधिक माहितीसाठी, एक परमेश्वर एक संदेश, अध्याय 11 पाहा.

**दृश्य 16**: [8]अग्नीचे सरोवर, सार्वकालिक दंड देण्याचे ठिकाण, हे आपल्या मनाला अन्यायी किंवा अकारणीय असे वाटते, कदाचित आपण देवाच्या परिपूर्ण पवित्रता, मनुष्याच्या सार्वकालिक स्वभाव, पापाची गंभीरता, आणि सार्वकालिकतेची कल्पना यांस अजून समजलेले नाही. अगदी शब्द सार्वकालिकता हे आपल्या मानसिक क्षमतेवर भारी होते, कारण आपल्या संदर्भाची रचना ही वेळ आहे. सार्वकालिकता ही शाश्वत आहे. देव ज्याने वेळ निर्माण केली तो त्याने बंदिस्त नाही (2 पेत्र. 3:8-9). सार्वकालिकता ही वर्षांनी बनलेली नाही. त्यास एक सार्वकालिकता आता असा विचार करा. ज्याक्षणी पापी त्या अटळ स्तर मध्ये प्रवेश करतो, तेव्हा ते त्याच्या पवित्र तर्काची समज प्राप्त करतील.

**दृश्य 17:** [9]खंडणी भरणे (किंवा विमोचन देणे) याचा अर्थ की आवश्यक किंमत भरून पुन्हा विकत घेणे. एक परमेश्वर एक संदेशच्या अध्याय 18 मध्ये लेखक त्याच्या बालपणाच्या गोष्टीसह हे स्पष्टकरीत आहे:

कॅलीफोर्नियामध्ये लहान मुलगा म्हणून मोठे होत असताना, माझ्याकडे एक लहान कुत्री होती. मी तिला जेवण देत असे, मी तिची काळजी घेत असे आणि तिच्याबरोबर खेळत असे. ती सर्वत्र माझ्यामागे येत असे आणि उत्साहित होत असे जेव्हा मी शाळेवरून घरी येत असे. परंतु तिच्यात एक चूक होती. कधीकधी ती शेजाऱ्यांच्या येथे फिरत राहायची, जरी ती परत येत असे. जोपर्यंत एके दिवशी, मी शाळेवरून घरी आलो, परंतु माझी कुत्री माझे स्वागत करण्यास तेथे नव्हती. झोपण्याच्या वेळीही, ती कोठेही दिसली नाही. पुढील दिवशी माझ्या पित्याने सुचविले की स्थानिक प्राण्यांचे आश्रयस्थान यांना फोन करावा, एक ठिकाण जेथे रस्त्यावरील मांजरी व कुत्रे काही वेळासाठी ठेवत असत. ज्या प्राण्यांना घेण्यास कोणी आले नाही त्यांना मारून टाकत असत. मी त्या आश्रयस्थानास फोन केला. होय, त्यांच्याकडे एक लहान कुत्री होती जे मी बोललो होतो त्याप्रमाणे तिचे वर्णन होते. नगराच्या कुत्री धरणाऱ्यांनी तिला घेऊन गेले होते. माझी कुत्री स्वतःला वाचविण्यात असहाय्य होती. जर कोणी तिला सोडविण्यास आले नसते, तर तिला मारून टाकण्यात आले असते. मी त्या आश्रयस्थानकडे गेलो.

मी माझ्या कुत्रीला घेणारच होतो! परंतु समोरच्या टेबलावरील अधिकाऱ्याने मला सांगितले की जर मला तिला परत घ्यावयाचे आहे तर मला दंड भरला पाहिजे. कुत्र्याने रस्त्यावर मोकळे फिरणे हे नियमाच्या विरोधात होते.

मी दंड भरला आणि माझ्या कुत्रीला सोडले गेले. त्या घाण पिंजऱ्यामधून बाहेर आल्यावर ती किती आनंदी झाली होती आणि पुन्हा त्याच्याबरोबर होती जो तिची काळजी घेत होता! तिची खंडणी भरण्यात आली होती.

माझ्या लहरी कुत्र्याला परत एकदा विकत घेण्याचा बालपणाचा अनुभव हा आपल्या स्वतःच्या परिस्थितीची पुसट शी कल्पना आपल्याला देतो. उद्धट, दोषी पापी असे, आपल्याला आपल्या पापांच्या दंडापासून, पाप व मृत्युच्या नियमापासून आपल्या स्वतःला सोडविण्याचा काहीही मार्ग नव्हता,

आपल्याला तारणाऱ्याची गरज आहे जो खंडणीची किंमत भरू शकतो.

**दृश्य 23:** [10]हे शक्य आहे की देवाने जसे संदेष्टा मोशे, शलमोन व एलीया यांच्या दिवसांत केले तसे करण्याद्वारे हाबेलाच्या अर्पणास त्याची मान्यता दाखविली: "परमेश्वरापासून अग्नि निघाला व त्याने वेदीवरील होमबली व वपा ही भस्म केली." (लेवीय 9:24; 2 इतिहास 7:1; 1 राजे 18:38)

**दृश्य 30 व 61:** [11]मोरिया याचा अर्थ प्रभूचा निवडलेला. हे ते क्षेत्र होते जेथे यरुशलेम हे नंतर बांधले गेले. आज, डोंगर मोरिया हे ठिकाण आहे जेथे शलमोनाचे मंदिर एकदा स्थिर होते (2 इतिहास 3:1). त्यापासून फार दूर नाही, त्याच डोंगराच्या रांगामध्ये "एक ठिकाण आहे ज्यास कवटीचे स्थान म्हणतात" (लूक 23:33).

**दृश्य 36:** [12]पूर्ण झालेली भविष्यवाणी बायबलला जगातील इतर सर्व पुस्तकांपेक्षा वेगळे ठेवते. भविष्यातील घट नांचे संदेष्ट्यांचे भाकीत, त्यापुढे इतिहासात त्यांची पूर्णता, हा एक मार्ग आहे ज्याद्वारे देवाने त्याचा संदेश वैध केला आहे. सुरुवातीपासून ते शेवट, प्राचीन वेळेपासून जे अजून व्हायचे आहे ते अगोदरच कळविणे" हे केवळ परमेश्वर करू शकतो (यशया 46:10). येशू मशीहाने म्हटले, "हे मी तुम्हांला आता म्हणजे हे होण्यापूर्वी सांगतो, यासाठी की जेव्हा हे होईल तेव्हा तुम्ही विश्वास धरावा की मी तो आहे" (योहान 13:19). एक परमेश्वर एक संदेश, अध्याय 5 पाहा.

**दृश्य 41:** [13]ख्रिस्त हा इब्री शब्द मशीहासाठी हेल्लेणी शब्द आहे, याचा अर्थ एक जो निवडलेला.

14इतिहासात घटनांच्या तारखा लिहिणे हे येशू ख्रिस्त जन्मला त्या वर्षावर आधारित आहे. उदाहरणार्थ, संदेष्टा अब्राहाम हा जवळजवळ ख्रिस्त पूर्व 2000 वर्षांपूर्वी (ख्रिस्ताचा जन्म होण्याच्या 2, 000 वर्षांपूर्वी) जन्मला होता. हे पुस्तक (गौरवाचा राजा) हे इसवीसन 2011 (ख्रिस्ताचा जन्म झाल्यावर 2, 000 वर्षांपेक्षा जास्त वर्षानंतर) मध्ये लिहिले गेले आहे. एडी [AD] हे अन्ना डोमिनी साठी संक्षेप मध्ये आहे, लैटीन मध्ये आपल्या प्रभूच्या वर्षात. अनेक आज बीसीइ [BCE] (सामान्य काळा अगोदर) आणि सीइ [CE] (सामान्य काळ) असे वापरतात की संक्षेपाक्षर पासून ख्रिस्त काढून टाकावा, परंतु इतिहासाचा दुभागणारा बिंदू हा अजूनही येशू ख्रिस्ताचा जन्म आहे.

**दृश्य 43:** [15]"हा सुतार नाही काय? हा मरीयेचा पुत्र आणि याकोब, योसेफ, यहूदा व शिमोन यांचा भाऊ हाच आहे ना? ह्याच्या बहिणी आपल्याबरोबर राहत नाही काय?" आणि ते त्याजविषयी अडखळले." (मार्क 6:3) कारण योसेफ हा त्याचा शारीरिक वडील नव्हता, येशू त्याचे भाऊ व बहिणी बरोबर केवळ त्याच्या आईच्या बाजूने नातेवाईक होता. येशू हा देवाचा पुत्र व मनुष्याचा पुत्र होता. संदर्भ 19 पाहा (दृश्य 52).

**दृश्य 43 व 58:** [16]वल्हांडणाच्या भोजनास प्रत्येक वर्षी, यहूदी लोक त्या घटनेला आठवत होते जे मोशेच्या दिवसांत घडले होते जेव्हा ते मिसर देशात गुलाम होते. त्यांच्या पूर्वजांनी कोकरा मारला होता आणि रक्त त्यांच्या घराच्या दारबाह्याला लावले होते कारण देवाने बोलले होते, "जेव्हा मी रक्त पाहीन, तेव्हा मी तुम्हांला ओलांडून जाईन" (निर्गम 12:13). मध्यरात्री परमेश्वराने प्रत्येक घरातील प्रथम जन्मलेले सर्व पुत्र मारून टाकले जेथे दारबाह्यावर कोकऱ्याचे रक्त नव्हते. परमेश्वराने ह्या घटनेचा उपयोग केला की त्याच्या लोकांना 400 वर्षांच्या गुलामगिरीतून वाचवावे.

**दृश्य 45:** [17]स्वर्गाची ही बाजू, आपण देवाचे त्रैक्यत्व कधीही पूर्णपणे समजणार नाही. शेवटी, तो परमेश्वर आहे. एक गोष्ट जी आपण सर्व जण समजतो, तथापि, काहीतरी की तीन च्या अस्तित्वाची कल्पना आहे, तरीही एक आहे. आपले जग हे एका-मध्ये-तीन ऐक्यतेने भरलेले आहे: वेळ: यामध्ये भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ आहे. अवकाश: लांबी, रुंदी, उंची. मनुष्य: आत्मा, जीव, शरीर. अणु: इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, न्यूट्रॉन. आपला सूर्य सुद्धा त्रैक्य-एकता आहे. आपण स्वर्गीय शरीराला सूर्य म्हणतो, त्याचा प्रकाश हा सूर्य आहे, आणि त्याची उष्णता हा सूर्य आहे, तरीही सूर्य हा एक आहे. तसेच हे परमेश्वराबरोबर आहे जो सार्वकालिक पिता, सार्वकालिक पुत्र आणि सार्वकालिक पवित्र आत्मा आहे. जसे प्रकाश व उष्णता हे सूर्यापासून निघतात, तसेच देवाचा पुत्र (शब्द) व देवाचा पवित्र आत्मा हे देवापासून निघतात, तरीही "परमेश्वर एक आहे" (अनुवाद 6:4). दृश्य 4 व संदर्भ 5 (दृश्य 6) सुद्धा पाहा. देवाच्या जटील एकता व येशूचे मानवी व दैवी स्वभाव वर अधिक माहितीसाठी, एक परमेश्वर एक संदेश, अध्याय 9 व 17 वाचा. तरीही उत्तम हे, योहानाचे शुभवर्तमान वाचा.

# संदर्भ

**दृश्य 47:** [18]मशीहाचा अर्थ एक जो निवडलेला किंवा, अधिक अक्षरशः, अभिषिक्त जण. पूर्वेला प्राचीन समयामध्ये, जेव्हा एक नवीन राजाचा राजाभिषेक होत असे, एक याजक किंवा संदेष्टा हे त्याच्या डोक्यावर एक विशेष अभिषेकाचे तेल ओतत असे हे दाखविण्यासाठी की तो आता राज्याचा नवीन शासक आहे. येशू हा मनुष्या द्वारे अभिषेक केलेला नव्हता, परंतु स्वयं पवित्र आत्म्या द्वारे अभिषेक झालेला होता (दृश्य 45 पाहा).

**दृश्य 52:** [19]येशूने स्वतःला नेहमी मनुष्याचा पुत्र असे संबोधिले. तो नेहमीच देवाचा पुत्र होता, परंतु तो मनुष्याचा पुत्र झाला होता. देवाचा पुत्र म्हणून तो शब्द आहे जो देवाबरोबर प्रारंभी होता (योहान 1:2' उत्पत्ति 1:3), परंतु मनुष्याचा पुत्र म्हणून तो शब्द जो देही झाला होता, एक ज्यास देवाने निवडले होते की जगाचा तारणारा-न्यायाधीश-राजा व्हावे. (योहान 1:14; दानीएल 7:13-14).

**दृश्य 56:** [20]परुशी हे आवेशी यहूदी पंथाचे सदस्य होते. त्यांच्यापैकी काही दिवसातून सहा वेळा प्रार्थना करीत होते, वर्षाच्या तीन महिने उपास करीत, आणि त्यांच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा गरिबांना देत (लूक 18:9-14). परंतु हे सर्व काही पोकळ विधी होते. ते धार्मिक होते, परंतु त्यांना परमेश्वर ठाऊक नव्हता आणि ते त्याला प्रेम करीत नव्हते.

**दृश्य 68:** [21]प्रभु येशू ख्रिस्तामधील विश्वासणाऱ्यांसाठी, बाप्तिस्मा हा एक मार्ग होता की त्याच्या मागे चालण्याच्या निवडीची घोषणा करावी. पाण्यात बुडविले जाणे हे पापाला काढून टाकीत नाही. ते येशूसह त्याचा मृत्यु, पुरणे, आणि पुनरुत्थानात व्यक्तीची ओळख चिन्हित करते. पाण्याचा बाप्तिस्मा सुद्धा जुन्या जीवनाचा शेवट आणि ख्रिस्तामध्ये नवीन जीवनाची सुरुवात चित्रित करते.

[22]देवाचा पुत्र स्वर्गात गेल्यावर जास्त दिवस झाले नसतील तेव्हा, देवाचा आत्मा खाली आला की प्रत्येक पुरुष, स्त्री व लेकरे जे शुभवर्तमानामध्ये विश्वास ठेवतात त्यांच्या अंतःकरणात राहावे. नवीन करारातील प्रेषितांची कृत्ये पुस्तक खळबळजनक गोष्टीची नोंद करते की पवित्र आत्म्याने शिष्यांना सामर्थ्य कसे दिले की येशूचे चारित्र्य प्रतिबिंबित करावे आणि त्याचा संदेश राष्ट्रांना कळवावा. देवाचा तारणाचा मार्ग हा बदललेला नाही. जर तुम्ही त्याच्या संदेशावर विश्वास ठेवण्याची निवड करता-की तुम्ही एक पापी आहात पवित्र परमेश्वरापासून वेगळे केलेले आहात आणि पापाच्या शिक्षेपासून स्वतःला वाचविण्यात असहाय्य आहात आणि हे की येशू ख्रिस्ताने तुमची शिक्षा वधस्तंभावर घेतली, त्यास पुरले गेले, आणि मृत्यूमधून तो पुन्हा उठला-तर मग तुम्ही सुद्धा पवित्र आत्म्याचे दान प्राप्त कराल. याचा अर्थ हा आहे की विश्वाचा राजा स्वयं येईल की तुमच्या अंतःकरणात राहावे. तो मग तुमचा नवीन स्वामी, पिता व मित्र होईल. पवित्र शास्त्र म्हणते, “तुम्हीही सत्याचे वचन म्हणजे तुमच्या तारणाची सुवार्ता ऐकल्यानंतर, त्याजवर विश्वास ठेविला, आणि निजजनांच्या मुक्तीसाठी आपल्या वतनाचा विसार असा जो देऊ केलेला पवित्र आत्मा याचा शिक्का, देवाच्या महिम्याची स्तुति व्हावी म्हणून तुम्हांस मिळाला” (इफिस 1:13-14). आत्मा हा देवाची शास्वती आहे की जे काही त्याने अभिवचन दिले आहे ते सर्व तो आपल्याला देईल आणि हे की त्याने आपल्याला विकत घेतले आहे की त्याच्या स्वतःचे लोक असावे. हे केवळ आपल्यासाठी आणखी एक कारण आहे की आपल्या गौरवी देवाची स्तुति करावी. परमेश्वर हा एक मोठा, अद्‌भुत राजा आहे आणि त्यास संपूर्ण सार्वकालिकतेमध्ये त्याच्याबरोबर एक मोठे, अद्‌भुत कुटुंब असणार. तुम्ही तेथे असणार काय?

## सखोल जाणे


# एक परमेश्वर एक संदेश



गौरवाच्या राजासारखे, एक परमेश्वर एक संदेश तुम्हांला संदेष्ट्यांच्या वचनात एका प्रवासावर नेते, परंतु एका सखोल मार्गाने जसे ते इतर जगिक दृष्टीकोन बरोबर बायबलच्या संदेशाची तुलना करते. अनेक प्रश्ने जी गौरवाच्या राजामध्ये अनुत्तरीत आहेत ती एक परमेश्वर एक संदेश मध्ये उत्तरीत केली आहेत.

ज्यावेळेस गौरवाचा राजा मोठ्याने वाचण्यास जवळजवळ तीन तास घेते, एक परमेश्वर एक संदेश बारा तास घेते.

व्यक्तिगत अनुभव, प्रश्ने विचारणाऱ्यांकडून ईमेल, आणि इतिहासाच्या सत्य कथेला नव्याने पुन्हा एकदा सांगणे हे सर्व काही एकत्र विणण्यात, हे पुस्तक जीवनाच्या मोठ्या प्रश्नांवर पुन्हा विचार करण्यासाठी एक रचना पुरविते.




- लेखकः पी. डी. ब्रॅमसन | स्पष्टीकरण करणाराः डी. सी. ब्रॅमसन
- प्रकाशकः रॉक आंतरराष्ट्रीय

हे पुस्तक सत्याची खाण आहे; लिहिण्याची शैली ही एकमेव आहे; हे मानवी रुचीने भरलेले आहे.

—विल्यम मॅक-डोनाल्ड, बिलीवर्स बायबल भाष्यलेख चे लेखक

हे हेरगिरीची कथेसारखे वाटते, जे एका अर्थाने तसेच आहे.

— कॅनडा मध्ये वाचक, थिओ

हे पुस्तक वाचल्यावर बायबलमधील तर्काचा अर्थ लागतो आणि माझ्या मनाला ते समजते. त्याने माझ्या मध्ये रुची निर्माण केली आहे की बायबल वाचावे.

— मोहम्मद, मध्य पूर्वीय बातमीदार

www.rockintl.org/resources

रॉक आंतरराष्ट्रीय सादर करते

# गौरवाचा राजा

## चित्रपट

गौरवाच्या राजाच्या पुस्तकाचे शब्द-न शब्द सादरीकरण

**1 कथा 2 भागात. 70 दृश्ये 15 मालिकेमध्ये.**

| | | | |
|---|---|---|---|
| **भाग 1: जुना करार: राजा त्याच्या योजनेचे भाकीत करतो** | 1 तास 47 मिनिटे | | |
| 1. प्रस्तावना | दृश्ये 1-3 | ~ | 10:40 |
| 2. सृष्टि निर्माणकर्ता आणि त्याची सृष्टि | दृश्ये 4-9 | ~ | 19:04 |
| 3. वाईटाचा प्रवेश | दृश्ये 10-15 | ~ | 15:10 |
| 4. पापाचा शाप आणि देवाचे अभिवचन | दृश्ये 16-19 | ~ | 11:57 |
| 5. बलिदानाचा मार्ग | दृश्ये 20-24 | ~ | 14:58 |
| 6. मनुष्याची बंडखोरी आणि देवाचा विश्वासूपणा | दृश्ये 25-27 | ~ | 9:05 |
| 7. देवाची योजना पुढे जाते | दृश्ये 28-32 | ~ | 14:04 |
| 8. नियमशास्त्र आणि संदेष्ट्ये | दृश्ये 33-36 | ~ | 12:20 |
| **भाग 2: नवीन करार: राजा त्याची योजना पूर्ण करतो** | 1 तास 55 मिनिटे | | |
| 9. राजाचा प्रवेश | दृश्ये 37-42 | ~ | 20:16 |
| 10. राजाचे चरित्र | दृश्ये 43-47 | ~ | 15:32 |
| 11. राजाची सत्ता | दृश्ये 48-51 | ~ | 14:02 |
| 12. राजाचे नियुक्त सेवाकार्य | दृश्ये 52-56 | ~ | 15:24 |
| 13. राजाचे अधीन होणे | दृश्ये 57-61 | ~ | 14:50 |
| 14. राजाचे बलिदान आणि विजय | दृश्ये 62-65 | ~ | 13:53 |
| 15. राजाचे शुभवर्तमान आणि गौरव | दृश्ये 66-70 | ~ | 18:26 |
| *आपला परमेश्वर किती महान आहे (अरबी मध्ये गाईले)* | *श्रेय* | ~ | 2:45 |

*"चित्रपटाने गोष्टी अशा प्रकारे स्पष्ट केल्या की मी समजू शकलो." एली, 7*

*"माझ्या सर्व भावनांसह मी कथा अनुभविली जसे काही मी येथे प्रत्यक्ष होतो." लिडिया, 21*

*"विश्वामधील काही सखोल प्रकटीकरणे सरळ पण सामर्थ्यशाली मार्गाने स्पष्ट करते!" डीक, 74*

**गौरवाचा राजा अभ्यासक्रम**




रंगीत पुस्तक | स्पष्टीकरण केलेले अभ्यासासाठी मार्गदर्शन | बहुभाषिक चित्रपट | चित्र असलेले पुस्तक

www.king-of-glory.com

संदेष्ट्यांच्या

पवित्र शास्त्रातून

# गौरवाचा राजा

सर्व वयोगटातील लोकांना प्रणयकथा आणि सुटका, आनंदी शेवट असलेल्या कथा, योजना जेथे चांगले हे वाईटावर विजय मिळविते हे आवडते. संदेष्ट्यांची प्राचीन लिखाणे ही प्रणय व सुटकेच्या मूळ कथा सांगतात-जेथे चांगले हे वाईटावर अगदी अनपेक्षित मार्गाने विजय मिळविते.

ही पुरातन, पुरातन कथा त्याच्या रुबाबदार चरित्र व भव्य योजना एक राजा व त्याच्या गुप्त योजनेविषयी आहे की त्याच्या बंडखोर प्रजेला अंधाराच्या राज्यातून सोडवावे व त्यानंतर कायमचे आनंदात, प्रकाशाच्या त्याच्या राज्यात त्याच्यासह जगण्यास योग्य असे करावे.

पण ही कथा खरोखर घडली आहे का? किंवा ही केवळ आणखी एक काल्पनिक कथा आहे? स्पष्ट उत्तरासाठी सादर करण्याचे मुद्दे हे दाखविते- व -सांगते.

कथेचा अनुभव घ्या. राजाला भेटा. आणि निर्णय घ्या.



## वैशिष्ट्ये

- संदेष्ट्यांची कथा व संदेश 70 दृश्यांमध्ये
- 70 पूर्ण पान चित्रे
- साधे शब्द
- गहन सत्य
- लाभदायक वैशिष्ट्ये
- उजळणी प्रश्ने
- चित्रपट मालिकेतील एका भागाचे मार्गदर्शक
- सर्व वयोगटातील व संस्कृतीच्या प्रेक्षकांसाठी

धर्म/बायबलसंबंधी अभ्यास/संदेष्ट्यांच्या सत्य घटना / प्रेरणादायक / तरुण

ISBN 978-81-7820-493-2

9 788178 204932

₹ 300/-

www.king-of-glory.com